अकोला । सोमवार
दि. २८ जुलै २०२५
वर्ष : १९ अंक : १४८
पाने : ८ + ४

दैनिक
# अजिंक्य भारत
बातम्यांचा गतिमान पाठलाग

www.ajinkyabharat.com
स्वागत मूल्य ३ रुपये



गिलचे सर्वात खास शतक
(पान ७ वर)

## महत्त्वाचे

### सत्य परेशान हो सकता है, पराजित नही- मुंडे



**परळी:** सरपंच संतोष देशमुख हत्याप्रकरण गेल्यावर्षी इतके तापले की त्याचा फटका धनंजय मुंडे यांना आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यांचा निकटवर्तीय वाल्मिक कराड यात दोषी सिद्ध झाल्यानंतर, विरोधकांकडून धनंजय मुंडेंवर अनेक आरोप करण्यात आले. इतकेच नव्हे तर यामुळे सामाजिक नाचक्की झाली ती वेगळीच! मात्र धनंजय मुंडे यांनी या प्रकरणावर आतापर्यंत मौन बाळगले होते, पण आता पाहिल्यांदाच ते याबद्दल व्यक्त झाले. वंजारी समाजाच्या राज्यस्तरीय अधिवेशनात त्यांच्यावर झालेल्या आरोपांबद्दल ते बोलत होते. नियतीने आणि न्यायव्यवस्थेने न्याय दिला. ज्यांनी कटकारस्थान केलं, त्याच्या विरोधातच लाख रुपयाचा दंड झाला. सत्य परेशान हो सकता है, पराजित नही. असे ते पुढे म्हणाले.

### रोहिणी खडसेंवर चित्रा वाघ यांचा हल्लाबोल



**मुंबई:** शरद पवार गटाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांचे पती प्रांजल खेवलकर यांना ड्रग्ज पार्टी प्रकरणात अटक होताच खडसे यांची चांगलीच कोंडी झाली आहे. या घटनेमुळे रोहिणी खडसे यांच्या राजीनाम्याची मागणी खडसे विरोधकांकडून केली जात आहे. ज्यात भाजप नेत्या चित्रा वाघ यांनीही रोहिणी खडसे यांच्यावर हल्लाबोल केला आहे. चित्रा वाघ यांनी एक ट्विट करत रोहिणी खडसेंचा समाचार घेतला आहे, सोबत सुप्रिया सुळे यांना देखील लक्ष्य केले आहे. यांच्या दिव्याखालीच अंधार असल्याचे चित्रा वाघ यांनी पोस्ट मध्ये लिहिले. चित्रा वाघ यांनी आणखीन एक ट्विट करत व्हिडिओच्या माध्यमातून रोहिणी खडसे, संजय राऊत तसेच महायुती सरकारला विरोध करणाऱ्या सर्वांचा चांगलाच समाचार घेतला आहे. तसेच ड्रगविरोधी मोहीम आणखी तीव्र करण्याची मागणी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

### त्यात राजकारण पाहणे योग्य नाही- फडणवीस



**मुंबई:** ठाकरे गटाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांचा आज ६५ वा वाढदिवस साजरा झाला. यादरम्यान उद्धव ठाकरे यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी मनसे प्रमुख राज ठाकरे अनेक वर्षांनंतर मातोश्रीची पायरी चढले. ठाकरे गट आणि मनसेच्या युतीच्या चर्चा सुरु असताना उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवशी राज ठाकरे यांनी त्यांची भेट घेणे, हे युतीचे संकेत असल्याचे बोलले जात आहे. ज्यावर अनेक राजकीय नेत्यांनी आपापल्या प्रतिक्रिया दिल्या. मात्र आता, या भेटीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही प्रतिक्रिया दिली आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, उद्धवजींचा जन्मदिवस आहे, त्यांना शुभेच्छा द्यायला राज ठाकरे गेले होते ही आनंदाची गोष्ट आहे. आमच्याही शुभेच्छा उद्धव ठाकरेंना आहेत. वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी गेल्यावर त्यात राजकारण पाहणं योग्य नाही.

# मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी; ६ जणांचा मृत्यू!

**हरिद्वार: दि. २७ वृत्तसंस्था**

**उत्तराखंडमधील पवित्र शहर हरिद्वार, त्याठिकाणच्या मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला असून, अनेक जण जखमी झाल्याचे सांगण्यात येत आहे. मुख्य मंदिराकडे जाणाऱ्या मंदिर मार्गाच्या पायऱ्यांवर ही चेंगराचेंगरी झाली.**

## आठ महिला,सात मुलांसह २८ जखमी







दर्शनासाठी भाविकांची मंदिराच्या आवारात आणि पायऱ्यांवर गर्दी झाली होती. रांग हळू हळू पुढे सरकत होती. याच सुमारास विजेची तार तुटल्याची अफवा पसरली आणि चेंगराचेंगरी झाली. करंटवाली तार सीढियोंपर गिरी है असं ओरडत कोणीतरी आलं आणि चेंगराचेंगरी सुरू झाल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. या चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला आणि २८ जण जखमी झाले. जखमींमध्ये आठ महिला आणि सात मुले आहेत. जखमींपैकी पाच जणांची प्रकृती गंभीर आहे.

मंदिराच्या इमारतीत जाण्या - येण्यासाठी एकच मार्ग आहे. या मार्गावरुन चालत ये - जा करावी लागते. यामुळे त्याच मार्गावर चेंगराचेंगरी सुरू झाल्यावर मोठ्या प्रमाणात जीवितहानी झाली. अफवा पसरली आणि प्रत्येकजण स्वतःला वाचवण्यासाठी मिळेल त्या वाटेने धावत सुटले. यामुळे गोंधळ झाला, चेंगराचेंगरीत सहा जणांचा मृत्यू झाला आणि २८ जण जखमी (पान २ वर)

### विद्युत तार तुटल्याची अफवा

डीएम मयूर दीक्षित यांनी अपघाताविषयी माहिती देताना, फोटो आणि व्हिडिओंद्वारे आम्हाला आढळले की कोणीतरी विजेची तार तुटल्याची अफवा पसरवली, तर जखमी किंवा मृतांना पाहून आम्हाला असे कोणतेही संकेत मिळाले नाहीत. चेंगराचेंगरीला कारणीभूत असलेल्या अफवा कोणी पसरवल्या याची आम्ही चौकशी करू आणि कॅमेरे आणि इतर मार्गांनी चौकशी करण्यासाठी दंडाधिकारी चौकशी स्थापन केली जाईल. ६ जणांच्या मृत्यूची पुष्टी झाली आहे, असे म्हटले आहे.

### न्यायदंडाधिकारी चौकशी करणार

चेंगराचेंगरी प्रकरणी न्यायदंडाधिकारी चौकशी करतील. अहवाल आला की दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई केली जाईल, असे उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सांगितले. चेंगराचेंगरीतील मृतांच्या नातलगांना नियमानुसार प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत दिली जाईल. तसेच जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपयांची मदत दिली जाईल; असेही उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी म्हणाले.

## तात्काळ बॅकसीट ड्रायव्हिंग बंद करा...

### सरकारचा एअर इंडियाला थेट इशारा





**मुंबई: दि. २७ वृत्तसंस्था**

१७१ संदर्भातील दुर्घटना आणि त्यानंतर घडलेल्या घटनांक्रमामुळं देशातील विमान सुरक्षा व्यवस्थेवर अनेक प्रश्न उपस्थित केले जात होते. याच पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टाटा सन्स आणि एअर इंडियाचे चेअरमन एन चंद्रशेखरन यांना थेट इशारच दिला आहे. सरकारने स्पष्ट केलं आहे की, एअर इंडियाच्या विभागात बॅकसीट ड्रायव्हिंग म्हणजेच पडद्यामागून निर्णय घेण्याची संस्कृती संपवण्यात यावी.

नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू, सचिव समीर कुमार सिन्हा आणि डीजीसीए प्रमुख फैज अहमद किदवई यांनी शुक्रवारी एन चंद्रशेखरन यांची भेट घेतली. यावेळी सुरक्षासंबंधीत विविध विभाग जसे, ट्रेनिंग, इंजिनियरिंग, मेंटेनेंस आणि ऑपरेशन कंट्रोल सेंटर यासारख्या प्रमुख सुरक्षा-संबंधित विभागांमध्ये स्पष्ट अधिकार आणि जबाबदारीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. अधिकाऱ्यांच्या मते, अनेक प्रकरणांमध्ये निर्णय दुसरे कोणीतरी घेत असताना ते तिसऱ्याकडून घेतले जात असतात. ही व्यवस्था धोकादायक आहे आणि ती तात्काळ रद्द करण्याची गरज

एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, एअर इंडियाकडे टाटा आणि सिंगापूर एअरलाइन्ससारख्या भागीदारांसह स्वतःला पुन्हा स्थापित करण्याची सुवर्णसंधी आहे. सरकार सर्व भारतीय विमान कंपन्यांना मदत करू इच्छिते आणि या संकटावर मात करण्यासाठी एअर इंडियाला पाठिंबा देत आहे. सरकारच्या म्हणण्यांनुसार, आज भारतात इंडिगो आणि एअर इंडिया असे दोन मोठ्या कंपन्या आहेत. जे लोक जागतिक स्तरावर देशाला अभिमानास्पद कामगिरी करू शकतात तेच अंतर्गत आव्हानांवर मात करू शकतात.

आहे. एका वृत्त संस्थेने दिलेल्या वृत्तानुसार, एअर इंडियामध्ये बऱ्याच काळापासून अशी परिस्थिती दिसून येत आहे, की जेव्हा जेव्हा चूक होते तेव्हा प्रत्यक्षात निर्णय घेणारे लोक पुढे येत नाहीत. उलट, क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांना बळीचा बकरा बनवले जाते. क्रू शेड्युलिंगमध्ये अनियमितता आढळल्याबद्दल डीजीसीएने आधीच तीन अधिकाऱ्यांना काढून टाकले आहे आणि जर (पान २ वर)

## चोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्णयुगांपैकी एक होता- नरेंद्र मोदी

**तामिळनाडू: दि. २७ वृत्तसंस्था**

गंगाईकोंडा चोलापुरम मंदिर हे तामिळनाडूच्या अरियालूर जिल्ह्यात स्थित एक ऐतिहासिक मंदिर आहे, या मंदिरात आज राजेंद्र चोला प्रथम यांच्या जयंतीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची विशेष उपस्थिती लाभली. या दरम्यान नरेंद मोदी यांनी भारतात शेकडो वर्षापूर्वी होऊन गेलेल्या चोल सम्राज्याविषयी आणि त्यांच्या ऐतिहासिक वास्तूंविषयी आपले मत व्यक्त केले. यावेळी कार्यक्रमाला संबोधित करताना चोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्ण युगांपैकी एक होता, असे म्हणत भारताच्या



पंतप्रधान मोदींनी रविवारी चोलकालीन भगवान बृहदेश्वर मंदिरात पूजा केली. यावेळी ते वैदिक आणि शैव तिरुमुराई जप तसेच प्रार्थना करताना दिसले. गंगेच्या पवित्र पाण्याने भरलेला कलश त्यांनी यावेळी अभिषेकासाठी आणला होता. हिंदू परंपरेनुसार वेष्टी (धोतर), पांढरा शर्ट आणि गळ्यात अंगवस्त्र परिधान करून त्यांनी मंदिराच्या आतील भागात प्रदक्षिणा घातली. पंतप्रधान मोदींनी चोल शैव धर्म आणि स्थापत्यशास्त्रावरील भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या प्रदर्शनालाही यादरम्यान भेट दिली.

सुवर्ण ऐतिहासिक संस्कृतीचे गुणगान गायले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कार्यक्रमाला संबोधित केले. या दरम्यान ते म्हणाले की हे मंदिर एक प्रकारे महान चोल राजाची पूजनीय भूमी आहे. इतिहासकारांचा असा विश्वास आहे की (पान २ वर)

## बिहारमधील मतदार याद्या पडताळणीविषयी आज सुनावणी

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**



बिहारमधील मतदार याद्या पडताळणीला याआधीच सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले आहे. त्या आव्हान याचिकांवर उद्या (सोमवार) महत्वपूर्ण सुनावणी होणार आहे.

बिहारमध्ये पुढील काही महिन्यांत विधानसभा निवडणूक होईल. अशात त्या राज्यातील मतदार याद्यांची पडताळणी करण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. त्यावरून मोठे राजकीय वादंग निर्माण झाले. पडताळणी प्रक्रियेमुळे मोठ्या संख्येने मतदार त्यांचा मतदानाचा हक्क बजावण्यापासून वंचित राहतील, असा आक्षेप विरोधकांनी घेतला. काही राजकीय पक्षांनी आणि संघटनांनी पडताळणीच्या निर्णयाला आव्हान देणाऱ्या याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केल्या. त्यावर १० जुलैला प्राथमिक स्वरूपाची सुनावणी झाली. त्यावेळी न्यायालयाने मतदारांसाठी आधार, रेशन कार्ड आणि मतदार ओळखपत्र ग्राह्य धरण्याचा विचार करावा, अशी सूचना निवडणूक आयोगाला केली. तसेच, पडताळणी प्रक्रिया सुरू ठेवण्याची (पान २ वर)

## मुलांच्या मृत्यूनंतर शिक्षकांविरुद्ध एफआयआर

**झालावाड: दि. २७ वृत्तसंस्था**

राजस्थानमधील झालावाड जिल्ह्यातील पिपलोडी गावात शुक्रवारी झालेल्या दुःखद शाळेच्या दुर्घटनेनंतर, गावकरी आणि मृत मुलांच्या कुटुंबियांच्या तक्रारीवरून मुख्याध्यापक आणि चार शिक्षकांविरुद्ध निष्काळजीपणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या दुर्घटनेत सरकारी उच्च प्राथमिक शाळेत वर्गाची भिंत आणि छत कोसळल्याने सात मुलांचा मृत्यू झाला आणि २१ जण जखमी झाले. या घटनेने संपूर्ण राज्य हादरले.

झालावाड पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अद्याप एफआयआरमध्ये कोणाचेही नाव स्पष्टपणे लिहिलेले (पान २ वर)

## ऑपरेशन सिंदूरनंतर मोठा निर्णय; — लष्कराचे युद्धतंत्र बदलणार!—

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

चीन आणि पाकिस्तानकडून वाढता संयुक्त लष्करी धोका भारतासाठी चिंतेचा विषय बनला आहे. नुकत्याच झालेल्या ऑपरेशन सिंदूर दरम्यान या धोक्याची तीव्रता पुन्हा एकदा अधोरेखित झाली. याच पार्श्वभूमीवर, भारतीय लष्कराने सीमेवर अधिक जलद आणि प्रभावी हल्ला चढवण्यासाठी काही नवीन रुद्र सर्व-शस्त्र ब्रिगेड आणि भैरव लाइट कमांडो बटालियनची स्थापना करण्याचा निर्णय घेतला आहे.



कारगिल विजय दिनानिमित्त द्रास येथे बोलताना लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी लष्कराच्या या आधुनिकीकरणाची घोषणा केली. ते म्हणाले की, लष्कराला भविष्यासाठी सज्ज करण्यासाठी ही महत्त्वपूर्ण पावले उचलली जात आहेत. आम्ही शांततेची संधी दिली, पण त्यांनी (पाकिस्तानने) भ्याडपणा दाखवला. त्याला आम्ही शौर्यानेच उत्तर दिले. ऑपरेशन सिंदूर हा आमचा निश्चय, आमचा संदेश आणि आमचे प्रत्युत्तर आहे, अशा शब्दांत जनरल द्विवेदी यांनी पाकिस्तानला खडसावले. भविष्यात कोणतीही आगळीक खपवून घेतली जाणार नाही, असा थेट इशाराही त्यांनी (पान २ वर)

## आयुष्मान स्कूल मिशन आता देशात राबविणार

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

केंद्र सरकार देशातील २६ कोटी शालेय मुलांचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य शाळेतच तपासणार आहे. आयुष्मान भारत शालेय आरोग्य अभियानाची पहिली चाचणी त्रिपुरामध्ये यशस्वी झाली आहे. याअंतर्गत, शाळेत १८ वर्षांपर्यंतच्या मुलांचे आरोग्य निरीक्षण ३० पॅरामीटर्सवर करण्यात आले. यामध्ये दुखापत, हिंसाचार, अपमान, असुरक्षित संबंध, मानसिक आणि भावनिक विकार, आक्रमकता, हाडांचे विकार, दुबळेपणा-लठ्ठपणा, डोळ्यांची दृष्टी, त्वचेचे आजार, अशक्तपणा इत्यादींचा समावेश होता. यामुळे मुलांचे वेळेवर समुपदेशन आणि वैद्यकीय चाचण्यांचा मार्ग मोकळा झाला.

# १२ बनावट पासपोर्ट, १६२ वेळा परदेश दौरा!

## ३०० कोटींचा घोटाळा: बोगस राजदूत हर्षवर्धन जैनचा पर्दाफाश

**नवी दिल्ली: दि. २७ वृत्तसंस्था**

खोट्या राजदूताच्या साजेशीर वेषात जगभर फिरत, परदेशी गुंतवणूक, नोकऱ्या व बिझनेस डीलचे आमिष दाखवून शेकडो लोकांची फसवणूक करणाऱ्या हर्षवर्धन जैन या व्यक्तीचा गूढ आणि गूढपणाने भरलेला आर्थिक घोटाळा उघडकीस आला आहे.

उत्तर प्रदेशच्या विशेष दलाने हर्षवर्धन जैन याला अटक केली असून, सध्या त्याच्या घोटाळ्याच्या चौकशीचा व्याप वाढताना दिसून येत आहे. हर्षवर्धन जैन (वय ४७) याने २००५ ते २०१५ या कालावधीत तब्बल १६२ वेळा परदेशात प्रवास केला. त्यात युएईमध्ये ५४ वेळा आणि यूकेमध्ये २२ वेळा प्रवास केला गेला. या प्रवासांच्या आडून





### अहसान अली सय्यद आणि अदनान खशोग्गी यांच्याशी संबंध

जैनच्या या आर्थिक कारस्थानामध्ये हैदराबादचा असलेला आणि तुर्कीचे नागरिकत्व स्विकारलेला अहसान अली सय्यद हा मुख्य सहकारी होता. या दोघांनी मिळून परदेशी कंपन्यांना गुंतवणुकीचं आमिष दाखवून, त्यांच्याकडून पैसे उकळले. स्वित्झर्लंडमधील आर्थिक अडचणीत असलेल्या कंपन्यांना टार्गेट करून, त्यांच्याकडून पैसे घेतले. पोलिसांच्या माहितीनुसार, जैनचा संबंध कुप्रसिद्ध सौदी शस्त्रास्त्र व्यापारी अदनान खशोग्गी याच्याशीही होता. २००२ ते २००४ या दरम्यान खशोग्गी याने थेट जैनच्या खात्यात २० कोटी रुपये जमा केले होते, त्याचा वापर नेमका कुठे झाला याची चौकशी केली जात आहे.

त्याने अनेक बोगस व्यवहार आणि आर्थिक फसवणूक केली असल्याचं समोर आलं आहे. जैनने स्वतःला वेस्टार्कटिका, सेबोर्गा, लॅडोनिया आणि पॉल्व्हिया या अज्ञात मायक्रोनेशन्सचा राजदूत घोषित करून, गाझियाबादमधील एका आलिशान बंगल्या मधून "खोटं दूतावास" चालवलं होतं. या बंगल्यावर परदेशी राष्ट्रांचे झेंडे, राजदूत म्हणून वापरण्यात येणाऱ्या नंबर प्लेट्स असलेली लक्झरी गाड्या आणि विविध पदव्या लावून तो लोकांना फसवत होता. त्याने "बारन ऑफ वेस्टार्कटिका" अशीही पदवी वापरली होती. जैनशी संबंधित २५ शेल कंपन्या युके, युएई, मॉरिशस आणि कॅमेरूनमध्ये नोंदवण्यात आल्या होत्या, असे चौकशीत समोर आले (पान २ वर)



## सिव्हिल ड्रेसमधील लोकांची माझ्यावर पाळत- खेवलकर

**पुणे : दि. २७ वृत्तसंस्था**

खेवलकर यांच्याकडे एकही गोष्ट सापडली नाही. ही कारवाई राजकीय द्वेषातून केली जात आहे. धूळफेक करण्यासाठी खोटा गुन्हा दाखल केला आहे, असा आरोप वकिलांनी केला. या प्रकरणात पोलिसांनी पाच पुरुष आणि दोन महिलांना ताब्यात घेतले असून, पुढील तपास सुरू आहे. मात्र खेवलकर यांच्या वकिलांनी न्यायालयाकडे तातडीने जामिनासाठी अर्ज केला आहे. राजकीय हस्तक्षेपामुळेच ही कारवाई झाल्याचा पुनरुच्चार करत, खेवलकर यांना न्याय मिळावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

माझ्यावर केवळ राजकीय संबंधांमुळे कारवाई केली जात आहे. मला अडकवले जात आहे, माझ्याकडे कोणताही प्रतिबंधित पदार्थ नव्हता, असा ठाम दावा प्रांजल खेवलकर यांनी केला आहे. खराडीतील रेव्ह पार्टी प्रकरणात अटक केलेल्या खेवलकर यांच्या वतीने आज (दि.२७) न्यायालयात झालेल्या सुनावणीत खेवलकर यांच्या वकिलांनी बाजू मांडली.

रेव्ह पार्टी प्रकरणात अटक करण्यात आलेल्या प्रांजल खेवलकर यांच्या वतीने आज न्यायालयात झालेल्या सुनावणीत, त्यांच्या वकिलांनी पोलिसांच्या कारवाईवर गंभीर प्रश्न उपस्थित केले. खेवलकर यांच्यावर कोणताही गुन्हा दाखल नाही, त्यांच्याकडे कोणतीही अंमली पदार्थ किंवा अवैध वस्तू सापडलेली नाही.

तरीही त्यांना अडकवले जात आहे, असा दावा खेवलकर यांच्या वकिलांनी केला. माझ्या राजकीय ओळखीमुळेच मला लक्ष्य केले जात आहे. केवळ राजकीय कारणांमुळे माझ्यावर खोटा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. माझ्याकडे कोणताही प्रतिबंधित पदार्थ आढळला नाही. तरीही मला अडकवले जात आहे. मी कुणालाही फोन केलेला नाही. माझ्यावर लादलेले आरोप निराधार आहेत.

यापूर्वीही सिव्हिल ड्रेसमध्ये काही लोक माझ्यावर पाळत ठेवून मला अडकवण्याचा प्रयत्न करत होते, असा आरोप खेवलकर यांनी केला आहे.

प्रांजल खेवलकर यांना याआधीही तीन वेळा अडकवण्याचा प्रयत्न झाला आहे. यातील एकही कलम लागू होत नाही, असा आरोप वकिलांनी केला. पोलिसांनी घटनास्थळी येऊन व्हिडिओ शूटिंग केले. यावर कारवाई झाली पाहिजे.

## पान 1 वरून...

### मनसा देवी मंदिरात चेंगराचेंगरी...

झाले. मृतांमध्ये आणि जखमींमध्ये प्रामुख्याने उत्तर प्रदेश आणि बिहारचे नागरिक आहेत. सर्व जखमी झालेल्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. प्रशासनाने चेंगराचेंगरी प्रकरणी चौकशीचे निर्देश दिले आहेत. सीसीटीव्ही फूटेज आणि प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेली माहिती याआधारे तपास सुरू आहे. अफवा कोणी पसरवली याचा शोध घेण्याचे काम सुरू आहे. दोषींवर कारवाई केली जाणार आहे. या अपघातात जखमी झालेल्या एका व्यक्तीने नेमका हा प्रकार कसा घडला याविषयी माहिती देताना,अचानक मोठी गर्दी झाली अन् त्यातून ही दुर्घटना झाली असल्याचे म्हटले आहे. उत्तराखंडमधील हरिद्वार याठिकाणी मानसा देवी मंदिरात चेंगराचेंगरीत जखमी झालेल्या बिहारमधील एका व्यक्तीने एका वृत्तसंस्थेला माहिती देताना, त्याठिकाणी खूप गर्दी होती. या प्रक्रियेत मी तिथे पडलो आणि तिथे अनेक लोक जखमी झाले. मी मानसा देवीकडे जात होतो. त्याठिकाणी अचानक मोठी गर्दी झाली. चेंगराचेंगरीत सर्व लोक पडले, या दरम्यान मी पडलो आणि माझा हात तुटला.अशी माहिती दिली. या अपघाताची माहिती देताना एसएसपी प्रमोद सिंह डोवाल यांनी, आम्हाला रात्री ९ वाजता पोलिस नियंत्रणातून ही माहिती मिळाली की मानसा देवी मुख्य रस्त्यावर खाली काही लोक जखमी झाल्याची बातमी आली आहे. जखमींना पोलिस दलाने तात्काळ रुग्णालयात आणले. सुमारे ३५ लोकांना येथे आणण्यात आले होते. त्यापैकी ६ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाली आहे. आतापर्यंत यामागील मुख्य कारण समोर आले आहे. मंदिर रस्त्यापासून सुमारे १०० मीटर खाली पायऱ्यांजवळ विजेचा धक्का लागल्याच्या अफवेमुळे चेंगराचेंगरी झाली. आम्ही याची नेमकी कारणे शोधत आहोत. आम्ही या प्रकरणाची अधिक चौकशी करत आहोत, असे म्हटले आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी घटनेवर दुःख व्यक्त केले आहे. त्यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्स वर पोस्ट केले आणि लिहिले की, हरिद्वारमधील मनसा देवी मंदिर रस्त्यावर चेंगराचेंगरी झाल्याची अत्यंत दुःखद बातमी मिळाली आहे. यूके एसडीआरएफ, स्थानिक पोलिस आणि इतर बचाव पथके घटनास्थळी पोहोचली आहेत आणि मदत आणि बचाव कार्यात गुंतली आहेत. मी या संदर्भात स्थानिक प्रशासनाशी सतत संपर्कात आहे आणि परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात आहे. सर्व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी मी माता राणीकडे प्रार्थना करतो.

### बिहारमधील मतदार याद्या ...

परवानगीही दिली. आयोगाने नुकताच त्या प्रक्रियेचा पहिला टप्पा मार्गी लावला आहे. त्यानंतर सुमारे ६५ लाख मतदारांची नावे विविध कारणांवरून याद्यांमधून वगळली जाऊ शकतात, असे संकेत मिळत आहेत. त्यामुळे उद्या होणाऱ्या सुनावणीला आणखीच महत्व प्राप्त झाले आहे.

### चोल साम्राज्याचा काळ ...

चोल साम्राज्याचा काळ हा भारताच्या सुवर्णयुगांपैकी एक होता. चोल साम्राज्याने भारताला लोकशाहीची जननी म्हणण्याची परंपरा देखील पुढे नेली. इतिहासकार लोकशाहीच्या नावाखाली ब्रिटनच्या मॅग्ना कार्टाबद्दल बोलतात. परंतु अनेक शतकांपूर्वी चोल साम्राज्यात लोकशाही पद्धतीने निवडणुका होत असत. इतर ठिकाणे जिंकल्यानंतर सोने, चांदी किंवा पशुधन आणणाऱ्या अनेक राजांबद्दल आपण ऐकतो. परंतु राजा चोलाने गंगेचे पाणी आणले.

### तात्काळ बॅकसीट ड्रायव्हिंग बंद करा...

निष्काळजीपणा सुरू राहिला तर एअरलाइन बंद होऊ शकते असा इशारा दिला आहे. त्या व्यतिरिक्त सरकारने एअर इंडियाकडून त्यांच्या गुडगाव परिसरात जुन्या क्रॅश झालेल्या विमानांचे भाग जसे की सीट्स, फ्लाइट डेटा रेकॉर्डर इत्यादी प्रदर्शित करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे, की या गोष्टी त्यांना नकारात्मकतेने भरतात आणि ते कंपनीच्या प्रतिमेसाठी आणि मनोबलासाठी हानिकारक आहे. त्याव्यतिरिक्त सरकारने एअर इंडियाकडून त्यांच्या गुडगाव परिसरात जुन्या क्रॅश झालेल्या विमानांचे भाग जसे की सीट्स, फ्लाइट डेटा रेकॉर्डर इत्यादी प्रदर्शित करण्यावरही प्रश्न उपस्थित केले आहेत. कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे की या गोष्टी त्यांना नकारात्मकतेने भरतात आणि ते कंपनीच्या प्रतिमेसाठी आणि मनोबलासाठी हानिकारक आहे. सरकारचा असा विश्वास आहे की सकारात्मक वातावरण निर्माण करणे महत्वाचे आहे. म्हणून ती सुरक्षितता भीतीचे प्रतीक म्हणून नव्हे तर प्रेरणा म्हणून घेतली जाते.

### मुलांच्या मृत्यूनंतर शिक्षकांविरुद्ध ....

नाही. पण तपास सुरू आहे, त्यामुळे कोणालाही ताब्यात घेतले गेलेले नाही. हा गुन्हा डांगीपुरा पोलिस ठाण्यात नोंदवण्यात आला आहे. भारतीय दंड संहितेच्या कलम १०६ आणि २९० अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निष्काळजीपणामुळे झालेल्या मृत्यूची या कलमांखाली चौकशी केली जाते. शाळा व्यवस्थापनाने पोलिसांना सांगितले की त्यांना इमारतीत कोणतेही गंभीर बांधकाम दोष किंवा धोक्याचे चिन्ह यापूर्वी आढळले नव्हते. तथापि, वाचलेल्या विद्यार्थ्यांनी सांगितले की, अपघाताच्या काही तास आधी वर्गात भिंतींवरून लहान दगड पडत होते. त्याबद्दल विद्यार्थ्यांनी शिक्षकांना सतर्क केले होते. परंतु शिक्षकांनी त्यांना शांत बसण्यास सांगितले. मग इशारा देऊनही कारवाई का केली गेली नाही असा प्रश्न निर्माण होतो. घटनेचे गांभीर्य लक्षात घेता, जिल्हाधिकाऱ्यांनी पाच सदस्यांची चौकशी समिती स्थापन केली आहे. त्याचे नेतृत्व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी करतील. ही चौकशी समिती अपघातामागील सर्व तथ्यांची सखोल चौकशी करेल.

### ऑपरेशन सिंदूरनंतर मोठा ...

दिला. देशवासीयांचा विश्वास आणि सरकारने दिलेल्या सामरिक स्वायत्ततेमुळेच लष्कराने एक सुनियोजित आणि निर्णायक प्रत्युत्तर दिले, असेही ते म्हणाले. लष्कराकडे सध्या शत्रूच्या हद्दीत खोलवर जाऊन कारवाई करण्यासाठी १० पॅरा-स्पेशल फोर्सेस आणि ५ पॅरा (एअरबर्न) बटालियन आहेत. यांच्या जोडीला आता नवीन भैरव लाइट कमांडो बटालियनची स्थापना केली जात आहे. या बटालियन अत्यंत चपळ आणि घातक असतील. टप्प्याटप्प्याने अशा ४०-५० भैरव बटालियन उभारण्याची योजना आहे. जनरल द्विवेदी म्हणाले, चपळ आणि घातक भैरव युनिट्स सीमेवर शत्रूला आश्चर्याचा धक्का देण्यासाठी सज्ज आहेत. याशिवाय, लष्कराच्या हवाई संरक्षण क्षमतेतही मोठी वाढ केली जात आहे. चीन सीमेवरील उंच भागांमध्ये हवाई संरक्षणासाठी ८,१६० कोटी रुपये खर्चून आकाश प्राइम या जमिनीवरून हवेत मारा करणाऱ्या क्षेपणास्त्रांच्या दोन नवीन रेजिमेंट तैनात केल्या जाणार आहेत. तसेच, ३६,००० कोटी रुपये खर्चून क्विक रिॲक्शन सरफेस टू एअर मिसाइल प्रणालीच्या तीन रेजिमेंटही दाखल होणार आहेत. आकाश प्राइम २५ किलोमीटरच्या पल्ल्यातील शत्रूची विमाने, हेलिकॉप्टर आणि ड्रोन नष्ट करू शकते. ऑपरेशन सिंदूर दरम्यान पाकिस्तानने वापरलेल्या तुर्की बनावटीच्या ड्रोन आणि चिनी क्षेपणास्त्रांना रोखण्यात भारताच्या हवाई संरक्षण प्रणालीने महत्त्वाची भूमिका बजावली होती. आता या नव्या प्रणालींमुळे ही क्षमता अधिकच वाढणार आहे.

### १२ बनावट पासपोर्ट, १६२ वेळा ...

आहे. यामध्ये 'स्टेट ट्रेडिंग कॉर्पोरेशन लि.', 'ईस्ट इंडिया कंपनी यूके लि.', 'आयलंड जनरल ट्रेडिंग को. ', आणि 'इंदिरा ओव्हरसीज लि. (मॉरिशस)' यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे त्याच्या नावे परदेशात १० बँक खाती असल्याचं निष्पन्न झालं आहे यातील ६ युएईमध्ये, ३ यूकेमध्ये आणि १ मॉरिशसमध्ये आहेत. त्याच्या बंगल्यावर छापा टाकल्यानंतर, पोलिसांना सेबोर्गा, लेडोनिया आणि इतर मायक्रोनेशन्सच्या नावाने तयार केलेले १२ बनावट राजनैतिक पासपोर्ट मिळाले. त्याने अनेक भारतीय आणि परदेशी कंपन्यांना मोठ्या कर्जाचे आमिष दाखवून, त्यांच्याकडून पैसे उकळले आणि त्यातून ३०० कोटी रुपयांचा आंतरराष्ट्रीय आर्थिक घोटाळा केला, असं तपास यंत्रणांचं म्हणणं आहे.

# लाडक्या बहीणीचा गैरफायदा घेणाऱ्यांवर कारवाई करणार

पुणे, दि. २७ वृत्तसंस्था



मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना चांगल्या भावनेने तयार केलेली आहे. या योजनेचा गैरफायदा घेतलेल्यांवर कारवाई करण्यात येणार आहे. यात काही पुरुषांनी गैरफायदा घेतल्याचे आढळून आल्यास त्यांच्याकडून लाभ घेतलेली सर्व रक्कम वसूल करण्यात येणार आहे. रक्कम परत करण्यास मदत न करणाऱ्या पुरुषांवर कारवाई करण्यात येणार आहे, असा इशारा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिला आहे. पुण्यात एका कार्यक्रमानिमित्त आलेले असताना अजित पवारांनी पत्रकारांशी बोलताना विविध विषयांवर भाष्य केले. लाडक्या बहिणींना प्रत्येक महिन्याचे पैसे दिले जात आहे. या योजनेत नोकरी करीत असलेल्यांची नावे वगळण्यात आली आहेत. नियमात न बसणारी नावे जसजशी पुढे येतील तसतशी ती वगळण्यात येतील. या योजनेत पुरुषांचे नाव येण्याचे कारण नाही. ही योजना पुरुषांची नाही, असेही अजित पवार यांनी नमूद केले आहे. धनंजय मुंडे कृषिमंत्री असताना त्यांच्यावर आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करण्यात आले होते. याच प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने त्यांना क्लीनचीट दिली आहे. इतर बाबतीमध्ये अजून न्यायालयाकडून चौकशीचा अहवाल आलेला नाही. अहवाल सकारात्मक असल्यास व ते दोषी नसल्यास त्यांना पुन्हा संधी देण्याचा विचार करण्यात येणार असल्याचे स्पष्ट करीत पवार यांनी मुंडे यांना पुन्हा मंत्रिपद देण्याबाबतचे संकेतच जाहीर केले आहेत. कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्याशी सोमवारी किंवा मुंबईत आधी चर्चा करून त्यांचे म्हणणे जाणून घेणार आहे. त्यानंतर राज्याच्या प्रमुखांशी चर्चा करून त्याबाबतचा योग्य तो निर्णय घेणार असल्याचेही पवार यांनी सांगितले आहे. कुस्ती संघटनेतील वाद थांबले पाहिजे. कुठल्याही क्रीडा संघटनेत दोन संघटना असा वाद नको. स्पर्धा भरवल्यानंतर खेळाडूंना त्रास होतो. स्पर्धेचे आयोजन व्यवस्थित झाले पाहिजे या दृष्टीने प्रयत्न व्हायला हवेत. संघटनांच्या वादाबाबत महाराष्ट्र ऑलिम्पिक असोसिएशन शहानिशा करणार आहे. अखिल भारतीय ऑलिम्पिक संघटनेशी कोणती संघटना संलग्न आहे हे पाहण्यात येणार आहे, असेही पवार यांनी सांगितले आहे.

## राज ठाकरे 'मातोश्री'वर दाखल; उद्धव ठाकरेंची गळाभेट घेत दिल्या शुभेच्छा



मुंबई, दि. २७ वृत्तसंस्था

मनसे प्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना ठाकरे गटप्रमुख उद्धव ठाकरे यांची आज पुन्हा एकदा भेट झाली आहे. अर्थात यामागे कारणही खास आहे. आज उद्धव ठाकरेंचा ६५ वाढदिवस आहे. यासाठी उद्धव ठाकरे यांना शुभेच्छा देण्यासाठी राज ठाकरे मातोश्रीवर दाखल झाले आहेत. राज ठाकरे यांच्यासोबत मनसे नेते बाळा नांदगावकर, नितीन सरदेसाई हे मातोश्रीवर पोहोचले असून संजय राऊत, अंबादास दानवे यांनी त्यांचे स्वागत केले आहे. राज ठाकरे येताच उद्धव ठाकरे यांनी त्यांची गळाभेट घेतली. हे दृश्य पाहून कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरेंना पुष्पगुच्छ देऊन शुभेच्छा दिल्या. मराठीच्या प्रश्नावरुन झालेल्या मनोमिलनानंतर ठाकरे बंधूंच्या या नव्या भेटीने राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे.

## प्रयागराजनंतर रेल्वेची नाशिक कुंभमेळ्यासाठी तयारी

नाशिक, दि. २७ वृत्तसंस्था



कुंभमेळ्यानिमित्त जिल्ह्यातील नाशिकरोड, देवळाली, ओढा, खेरवाडी आणि कसबे सुकेणे या पाच रेल्वे स्थानकांचा कायापालट होणार आहे. यात देवळाली स्थानकात स्थिरीकरण, देखभाल दुरुस्ती व वाहनतळासाठी प्रत्येकी दोन मार्गिका तयार करण्यात येतील. नाशिकरोड रेल्वे स्थानकात सध्याच्या २२ बोगींऐवजी २४ बोगी असणाऱ्या रेल्वेगाडीच्या वाहनतळासाठी दोन मार्गिका विकसित केल्या जातील. फलाट क्रमांक एकचाही विस्तार होणार आहे. या विकासामुळे वेगवेगळ्या दिशांना रेल्वेगाडी थांबविणे (शेवटचे स्थानक) आणि नव्याने तिचा प्रवास सुरू करणे (उगमस्थान) म्हणून करण्यास मदत होणार आहे. २०२७ मध्ये नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे कुंभमेळा होणार आहे. यावेळी मागील कुंभमेळ्यापेक्षा ५० पट अधिक म्हणजे तब्बल तीन कोटी भाविक सहभागी होण्याचा अंदाज आहे. हे लक्षात घेत रेल्वे मंत्रालयाने प्रयागराजच्या धर्तीवर मोठी तयारी सुरू केली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि राज्यमंत्री रवनीतसिंह बिट्टू यांनी घेतलेल्या आढावा बैठकीत मध्य रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी नियोजन आणि अंमलबजावणीची माहिती सादर केली.रेल्वे स्थानकात भाविकांची ये-जा सुलभ व्हावी म्हणून प्रवाशांना थांबण्यासाठी मोठी जागा उपलब्ध राहील, असे नियोजन केले जात आहे. केंद्रीकृत नियंत्रण केंद्र स्थापन केले जाईल.

## मराठीची धास्ती अन् दुबेंची दांडी; महाराष्ट्र सदनात येणे टाळले

मुंबई, दि. २७ वृत्तसंस्था



राज्यात हिंदी-मराठी भाषेच्या वादादरम्यान भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांनी थेट मराठीविरुद्ध दंड थोपटले. इतकेच काय तर 'पटक पटक के मारेंगे' असं विधान केले. त्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आक्रमक भूमिका घेत, निशिकांत दुबे यांना प्रत्युत्तर दिलं होतं. त्यानंतर महिला खासदारांनी निशिकांत दुबे यांना संसदेच्या लॉबीमध्ये घेरावर धरलं. त्यावेळी दुबे यांनी तेथून पळ काढला होता. त्यांच्या या विधानामुळेच आता ते अडचणीत सापडले आहेत. यानंतर आता निशिकांत दुबे यांना संसदरत्न पुरस्कारकडे पाठ फिरवावी लागली आहे. महाराष्ट्र सदनामध्ये शनिवारी संसदरत्न पुरस्कारांचे वितरण झाले. या पुरस्काराच्या मानकऱ्यांमध्ये भाजपचे खासदार निशिकांत दुबे यांचाही समावेश होता. पण, शनिवारी सदनातील या कार्यक्रमाला दुबेंनी दांडी मारली. लोकसभेत उत्कृष्ट कामगिरीसाठी संसदरत्न पुरस्कार २०२५ जाहीर झाला असून, यंदा १७ खासदार आणि दोन संसदीय स्थायी समित्यांचा सन्मान करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सात खासदारांनी या यादीत स्थान मिळवून राज्याचा गौरव वाढवला आहे. यामध्ये राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) नेत्या सुप्रिया सुळे, शिवसेना (ठाकरे गट) नेते अरविंद सावंत, शिवसेनेचे श्रीरंग अप्पा बारणे आणि नरेश म्हस्के, काँग्रेसच्या वर्षा गायकवाड, भाजपाच्या स्मिता उदय वाघ आणि मेधा कुलकर्णी यांचा समावेश आहे. संसदरत्न पुरस्कार मिळालेल्या १७ खासदारांमध्ये भर्तृहरी मेहताब, रवी किशन, निशिकांत दुबे, एन. के. प्रेमचंद्रन, प्रवीण पटेल, विद्युत बरन मेहतो, दिलीप सैकिया, चरणजीतसिंह चन्नी आदींचा समावेश होता. पुरस्कारांचे वितरण केंद्रीय संसदीय कामकाजमंत्री किरेन रिजिजू यांच्या हस्ते झाले. या समारंभाला निशिकांत दुबे गैरहजर राहिले. लोकसभेतील लॉबीमध्ये झालेल्या कोंडीनंतर महाराष्ट्र सदनात जाऊन पुन्हा अडचणीत सापडण्याची भीती वाटल्यानेच दुबेंनी संसदरत्न पुरस्कार स्वीकारण्यासाठी येणे टाळले असल्याची चर्चा महाराष्ट्र सदनामध्ये रंगली होती.

## शेतकऱ्यांची बँकेच्या कर्जावरील संपूर्ण व्याजमाफीची मागणी

नाशिक, दि. २७ वृत्तसंस्था

### छगन भुजबळांकडून तोडगा काढण्याचे आश्वासन



जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कर्जावरील संपूर्ण व्याजमाफीच्या मागणीसाठी शेतकरी आंदोलकांनी अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांची भेट घेतली. या वेळी भुजबळ यांनी मंगळवारी (ता. २९) उपमुख्यमंत्री व अर्थमंत्री अजित पवार आणि सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांच्याशी चर्चा करून यातून मार्ग काढण्याचे आश्वासन दिल्याची माहिती शेतकरी आंदोलकांनी दिली. शेतकरी समन्वय समिती आणि आदिवासी सहकारी संस्थेच्या शेतकऱ्यांनी श्री. भुजबळ यांनी येथे भेट घेत निवेदन सादर करत आपल्या मागण्या मांडल्या. समितीचे अध्यक्ष भगवान बोराडे, आदिवासी सहकारी संस्थेचे राज्याध्यक्ष कैलास बोरसे, दिलीप पाटील, रमेश बोरस्ते, बाळासाहेब बोरस्ते, सुधाकर सुनील नाठे, अशोक बोरसे यांच्यासह शेतकरी उपस्थित होते. निवेदनात म्हटले आहे, की जिल्हा बँकेने ५६ हजार शेतकऱ्यांच्या जमिनी जप्तीची कारवाई सुरू केली असून, सहकार कायद्याचा दुरुपयोग होत आहे.१ जून २०२३ पासून ७८६ दिवसांहून अधिक काळ नाशिक जिल्हाधिकारी कार्यालयासमोर (सिव्हिल हॉस्पिटल) धरणे आणि उपोषण सुरू आहे. याबाबत शासनाशी वारंवार पत्रव्यवहार आणि मुख्यमंत्र्यांसह इतर मंत्र्यांच्या भेटी घेण्यात आल्या आहेत. राज्य शासनाने ४ जुलै २०२५ ला २०२५-२६ साठी नवीन सामोपचार योजना जाहीर केली, ज्यामध्ये एक लाखापर्यंत दोन टक्के, १-५ लाखापर्यंत चार टक्के, पाच-दहा लाखांपर्यंत पाच टक्के आणि दहा लाखांवरील कर्जासाठी सहा टक्के व्याज आकारले जाणार आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा सर्वसाधारण सभेत विरोध केला असून, संपूर्ण व्याजमाफी आणि मुद्दलाचे दहा हप्त्यांत परतफेडीची मागणी केली. भुजबळ यांनी ही मागणी शासनापुढे मांडून तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. तसेच, राज्य शासन लवकरच कर्जमाफीचा निर्णय घेणार असल्याचेह त्यांनी सांगितले.

## जळगावात हतनूरचे १८ दरवाजे उघडले
### तापी काठावरील गावांना सतर्कतेचा इशारा



जळगाव , दि. २७ वृत्तसंस्था

पाणलोट क्षेत्रातील जोरदार पावसानंतर तापीवरील हतनूर धरणाचे ४६ पैकी १८ दरवाजे रविवारी सकाळी एक मीटरने उघडण्यात आले. विदर्भासह मध्य प्रदेशातील पावसामुळे अचानक आवक वाढल्याने हतनूर धरणाचे विसर्ग वाढविण्याचा निर्णय पाटबंधारे विभागाने घेतला असताना, तापी नदीला पूर आला आहे. प्रशासनाने नदी काठावरील गावांना त्यामुळे सतर्कतेचा इशारा दिला आहे.जिल्ह्यात जुलैचा शेवटचा आठवडा सुरू असूनही समाधानकारक पावसाचा अद्यापही अनुभव आला नसल्याने शेतकरी आणि नागरिकांमध्ये काहीशी चिंता निर्माण झाली आहे.

## अन्वी जायभाये जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धेमध्ये प्रथम



दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

अकोला, दि. २७ :२६ जुलै २०२५ रोजी एचआयव्ही एड्स विषयावर युवावर्गामध्ये जनजागृती होण्याच्या दृष्टीने शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे जिल्हास्तरीय प्रश्नमंजूषा स्पर्धा घेण्यात आली. युवावर्गामध्ये किशोरवयीन वयामध्ये होणारे बदल, वेगवेगळे आजार, नवीन तंत्रज्ञान याविषयी प्रश्नमंजुषेचे आयोजन करण्यात आले. जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषमध्ये जिल्ह्यातील २० शाळांनी सहभाग नोंदविला. भविष्यात युवापिढीने समोर येऊन दुर्धर आजारासंबंधी कार्य करावे, रुग्णासंबंधी आपुलकी ठेवावी, त्यांना सर्वतोपरी मदत करावी ही या प्रश्नमंजुषेमागची संकल्पना होती. या प्रश्नमंजुषेमध्ये प्रभात किड्स येथील अन्वी जायभाये प्रथम, समर्थ विद्यापीठ येथील श्रावण भाकरे द्वितीय तर नोवेल स्कूल येथील रितेश घुगे व प्रभात किड्स येथील रैवत देशपांडे याना एकत्रित तृतीय क्रमांक देण्यात आला. जिल्हास्तरीय प्रश्नमंजुषेमधील प्रथम विजेते १२ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या अनुषंगाने राज्यस्तरीय प्रश्नमंजुषेकरिता जाणार आहेत. कार्यक्रमाच्या सफलतेकरिता जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालय येथील राम बोबडे, योगेश पोतदार, सचिन शिवरकर, सुमेरा परवीन, जगदीश आंबेकर, संध्या देशपांडे यांनी सहकार्य केले.

## विश्वमांगल्य स्वनाथ परिषद चिंतन बैठक

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

### हर बच्चे को माँ या संकल्पनेवर आधारित उपक्रम



अकोला, दि. २७ : दि.२३ जुले रोजी बिर्ला रोड येथील विश्वमांगल्य स्वनाथ परिषद कार्यालयात परिषदेची हर बच्चे को माँ या संकल्पनेवर आधारित चिंतन बैठक आयोजित करण्यात आली. हर बच्चे को मा या संकल्पनेवर आधारित स्वनाथ बालकांना स्वनाथ माता मिळवून देणे व त्यामार्फत त्या बालकांच्या शिक्षण, स्वास्थ्य, संस्कार, सुरक्षा आणि रोजगार या विषयावर काम करणे मागील वर्षभरापासून अकोल्यात सुरु आहे. याला अकोल्यातील सुशिक्षित, सुजाण मातांनी भरभरून प्रतिसाद दिला. आता या संकल्पनेवर आधारित देशव्यापी योजनेला सुरुवात पुढील महिन्यापासून होणार असल्याने हर बच्चे को माँ या संकल्पनेचे मार्गदर्शन प्रशांत हरताळकर यांनी सांगितले. त्यांच्या उपस्थितीत चिंतन बैठकीचे आयोजन करण्यात आले. त्यात एकूण ६० स्वनाथ माता व नागरिक उपस्थित होते.आम्ही सुमारे ६९ स्वनाथ मुलांसोबत काम करायला सुरुवात केली. त्यापैकी सुमारे ५० मुलांच्या मातांनी त्यांच्या गावांना आणि घरांना भेट दिली आणि मुलांची परिस्थिती आणि आव्हाने प्रत्यक्ष जाणून घेतली. मे महिन्यात मामाच्या गावाला जाऊ या नावाचे तीन दिवसांचे निवासी शिबिर आयोजित करण्यात आले होते. आम्ही हे काम पाच स्तंभांवर आधारित केले आहे: १. शिक्षण २. आरोग्य ३. संस्कृती ४. सुरक्षा ५. स्वयंरोजगार. जरी मे महिन्याच्या शिबिरानंतर जुलैपर्यंत थेट बैठका होऊ शकल्या नाहीत, तरीही अनेक माता फोनद्वारे त्यांच्या मुलांशी संपर्कात राहिल्या. काही काळाचा फरक होता हे खरे आहे, परंतु पण आतापर्यंतच्या कामाने एक मजबूत पाया घातला आहे. आता प्रश्न असा आहे, आपल्या सर्वांना माहिती आहे की हे फक्त अकोल्याबद्दल नाही. प्रशांत हरताळकर यांचे ध्येय आहे- अनाथाश्रममुक्त अकोला आणि नंतर अनाथाश्रममुक्त भारत. एकट्या अकोल्यात सुमारे २०,००० अनाथ मुले आहेत. ही संख्या देशभरात ३ कोटींहून अधिक आहे. म्हणून हे मोठे काम पद्धतशीरपणे करणे आवश्यक आहे. तरच हे मोठे काम पद्धतशीर, नियोजित आणि व्यावसायिक पद्धतीने पुढे नेले जाऊ शकते. गेल्या काही महिन्यांत हरताळकर यांनी देशातील अनेक राज्यांचा दौरा केला आहे जेथे ते महिला आणि बाल विकास मंत्रालयाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना, प्रतिष्ठित स्वयंसेवी संस्थांना भेटले आहेत. नामांकित एनजीओ संस्था, विद्यापीठे आणि एनआयपीसीसीआयडी सारख्या राष्ट्रीय संशोधन संस्थांशी संवाद साधला. आम्ही ही कल्पना गुजरात,त्रिपुरा, राजस्थान, मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र यासारख्या राज्यांमधील सरकारांपर्यंत पोहोचवत आहोत आणि सर्वात उल्लेखनीय गोष्ट म्हणजे - अकोलाचा पायलट प्रोजेक्ट ही संस्था देशातील सर्वात शक्तिशाली आणि अग्रगण्य संस्था म्हणून उदयास आली आहे. आता सरकार, प्रशासन, समाजसेवा आणि संशोधन क्षेत्रातील अनेक लोक अकोल्याला येऊन हे काम प्रत्यक्ष पाहू इच्छितात. म्हणूनच, अकोला पॅटर्न राष्ट्रीय मॉडेल बनण्यासाठी अकोला टीमला बळकटी देण्याची गरज आहे. या विषयावर एकत्रितपणे चिंतन करून कार्यक्रमाची रचना, कार्यपद्धती ठरविण्यात आली. अकोला पॅटर्न संपूर्ण देशासाठी एक आदर्श म्हणून कसा सादर करू शकतो यावर विचार करण्यात आला. शेवटी - आपण प्रत्येक स्वनाथ मुलाला मातृप्रेम, संरक्षण आणि सहवास कसा प्रदान करू शकतो. हर बच्चे को माँ - हा केवळ एक संकल्प नाही तर राष्ट्र उभारणीची प्रक्रिया आहे. या चिंतन बैठकीचे संचालन हर बच्चे को माँ या प्रकल्पाच्या संयोजिका पल्लवी कुळकर्णी, प्रास्ताविक आरती लड्डा व संपूर्ण विषय प्रशांत हरताळकर यांनी अतिशय मार्मिकपणे मांडला. बैठकीला रेखा खंडेलवाल, वृषाली जोशी, विजय जानी, गणेश काळकर, कल्पना भुतडा, माणिक नेरकर, सोना साबळे, वंदना जकाते, सरिता शर्मा, सोनाल ठाकर, उज्वला मुळावकर, विजयना रायपुरे, ज्योती पटवर्धन, चित्र बापट, पुष्पा वानखेडे, अर्चना शर्मा सह मोठ्या प्रमाणात मातृशक्ती उपस्थित होती.

## थोडक्यात

### विजापूर चकमकीत चार नक्षलवादी ठार



**रायपूर :** छत्तीसगडमधील विजापूरमध्ये शनिवारी संध्याकाळी सुरक्षा दल आणि नक्षलवाद्यांमध्ये मोठी चकमक झाली. या संघर्षात चार नक्षलवादी ठार झाल्याचे बस्तर रेंजचे पोलीस महानिरीक्षक सुंदरराज पी. यांनी सांगितले. ही चकमक जिल्ह्याच्या नैर्ऋत्य वनक्षेत्रात झाली. गोपनीय सूत्रांकडून नक्षलवाद्यांच्या उपस्थितीची माहिती मिळाल्यानंतर सुरक्षा दलांनी शोधमोहीम सुरू करत चार नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. चकमकीच्या ठिकाणाहून चार नक्षलवाद्यांचे मृतदेह हस्तगत करण्यात आले आहेत. याशिवाय, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणात इन्सास आणि एसएलआर सारख्या अत्याधुनिक रायफल देखील जप्त करण्यात आल्या आहेत. रात्री उशिरापर्यंत परिसरात शोधमोहीम सुरूच होती. अधूनमधून गोळीबार सुरू होता. या वर्षाच्या सुरुवातीपासून छत्तीसगडमध्ये एकूण २२५ नक्षलवादी मारले गेले असून त्यापैकी २०८ बस्तर विभागातील विजापूर, बस्तर, कांकेर, कोंडागाव, नारायणपूर, सुकमा आणि दंतेवाडा या सात जिल्ह्यांमधील आहेत. ही आकडेवारी सुरक्षा दलांच्या कारवाईचे मोठे यश मानले जात आहे.

### पंतप्रधान मोदींचा तामिळनाडू दौरा खास



**नवी दिलली :** पंतप्रधान मोदी परदेश दौरा करून तामिळनाडूच्या दौऱ्यावर येणार आहेत. त्यांचा दौरा खूप खास आहे कारण आज सम्राट राजेंद्र चोल प्रथम यांची जयंती आहे. तसेच देशाचे माजी राष्ट्रपती डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांची पुण्यतिथी देखील आहे. राजेंद्र चोल प्रथम आणि कलाम दोघेही तामिळनाडूशी खूप जवळून जोडलेले होते. आदि तिरुवादिराईचा दिवस देखील आहे, ज्याचे तमिळ संस्कृतीत खूप महत्त्व आहे. आज तिरुचिरापल्ली याठिकाणी पंतप्रधान गंगाईकोंडा चोलापुरममध्ये चोल राजवंशाचे राजा राजेंद्र चोलन यांच्या सहस्राब्दी समारंभात सहभागी होत आहेत, हे देखील खास आहे कारण पुढील वर्षी तमिळनाडूमध्ये विधानसभा निवडणुका आहेत, ज्याचा भाजपला फायदा होऊ शकतो.
आजचा कार्यक्रम जगातील सर्वात जुन्या भाषांपैकी एक असलेल्या तमिळ भाषा आणि संस्कृतीला जागतिक स्तरावर प्रोत्साहन देण्याच्या पंतप्रधान मोदींच्या संकल्पाशी जोडला जाऊ शकतो. संसदेत सेन्गोलची स्थापना, तमिळ काशी संगम, परदेशात तमिळ भाषेचा प्रचार हे त्यांच्या त्याच संकल्पाचे भाग आहेत.पंतप्रधान मोदींच्या या प्रयत्नातून भाजपला राजकीय फायदा मिळू शकतो, परंतु तामिळनाडूमध्ये चांगली कामगिरी करणे हे अजूनही पक्षासाठी एक मोठे आव्हान आहे.

### दाऊद टोळीशी संबंधित गुंडाला शस्त्र पुरवणाऱ्याला गुजरातमधून अटक

**मुबई :** दाऊद टोळीशी संबंध असल्याचा संशय असलेला आरोपी सरवर खानला शस्त्र पुरवणाऱ्याला गुजरातमधून अटक करण्यात आली. दीपक नंदकिशोर शर्मा (३२) असे अटक आरोपीचे नाव आहे. आरोपीविरोधात यापूर्वीही नऊ गुन्हे दाखल आहेत.गुन्हे शाखेच्या तपासानुसार, आरोपी शर्मा याची ठाणे कारागृहात सरवर खानसोबत ओळख झाली होती. सरवर खानने अपहरण करण्यासाठी वापरलेले पिस्तुल शर्माने दिल्याचा आरोप आहे.गुन्ह्यात आधीच अटकेत असलेल्या आरोपींच्या चौकशीतून मिळालेल्या माहितीच्या आधारे, पोलिसांनी शर्माला गुजरातमधून शोधून काढले आणि त्याला मुंबईत आणण्यात आले आहे. अमली पदार्थ तस्करीचा गुन्हा असलेल्या साजिद इलेक्ट्रिकवाला आणि त्याचा साथीदार शब्बीर सिद्दीकी यांचे मुंबईतून अपहरण करण्यात आले होते.सरवर खानने खंडणीची मागणी करताना इलेक्ट्रीकवाला यांच्या कपाळावर पिस्तूल ठेवले होते. ती पिस्तूल शर्मा याच्याकडे सापडली असून त्याच्याकडून पाच जिवंत काडतूसांसह ती जप्त करण्यात आली आहे. शर्माला यापूर्वी २०२१ मध्ये दहिसरमधील गोळीबार प्रकरणात अटक करण्यात आली होती. तो ठाणे कारागृहात सुमारे सात महिने होता. त्याचदरम्यान त्याची सरवर खानसोबत ओळख झाली होती.

# देशाच्या विकासासाठी भारतीय तत्वज्ञानावर आधारित शिक्षण प्रणाली आवश्यक

## मोहन भागवत यांचे मोठे विधान

**नवी दिल्ली, दि.२७ वृत्तसंस्था**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी,''देशातील शिक्षण व्यवस्था वसाहतवादी विचारांच्या दीर्घकालीन प्रभावाखाली विकसित झाली आहे. तसेच विकसित राष्ट्रासाठी भारतीय तत्वज्ञानावर आधारित पर्याय तयार करण्याची गरज आहे.'' असे म्हटले आहे.
आरएसएसशी संलग्न शिक्षा संस्कृती उत्थान न्यासने आयोजित केलेल्या राष्ट्रीय चर्चा बैठकीच्या दुसऱ्या दिवशी प्रतिनिधींना संबोधित करताना भागवत यांनी हे विधान केले. यावेळी बोलताना, ''यासाठीचा दृष्टिकोन गंभीर, वास्तववादी आणि पूर्णपणे भारतीय आधारित असावा. शिक्षा संस्कृती उत्थान न्यासने जारी केलेल्या निवेदनानुसार, त्यांनी असेही म्हटले आहे की शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्यांनी त्यांच्या कामात प्रवीण असले पाहिजे, इतरांसाठी एक उदाहरण बनले पाहिजे आणि एकमेकांशी चांगले संबंध राखले पाहिजेत जेणेकरून सर्वजण एकत्रितपणे देशाला पुढे नेऊ शकतील'' असे त्यांनी म्हटले.
पुढे त्यांनी, ''शिक्षा संस्कृती उत्थान न्यास रविवारी संध्याकाळी येथे राष्ट्रीय शिक्षण परिषद 'ज्ञान सभा' आयोजित करेल, ज्याला भागवत संबोधित करतील. संघटनेने एका प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे की, सोमवारी या परिषदेचे औपचारिक उद्घाटन होईल'' असेही सांगितले.दरम्यान, एका निवेदनात, संघटनेने असा दावा



केला आहे की, भारतीय तत्वज्ञानावर आधारित शिक्षण प्रणाली सामाजिक सुधारणा आणि राष्ट्रीय प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. 'चिन्मय इंटरनॅशनल फाउंडेशन'चे मुख्यालय वेल्यानाड, पिरावोम येथील आदि शंकरा निलयम येथे झालेल्या संस्थेच्या राष्ट्रीय विचारमंथन बैठकीच्या दुसऱ्या दिवशी शिक्षण संस्कृती उत्थान न्यासचे राष्ट्रीय सरचिटणीस अतुल कोठारी यांनी हे विधान केले.
कोठारी यांनी 'ज्ञान सभे'चे महत्त्व सांगत असा दावा केला की भौतिक प्रगतीसोबतच ''आपण खूप गंभीर सामाजिक, सांस्कृतिक आणि पर्यावरणीय आव्हानांनाही तोंड देत आहोत''. भागवत यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीला संबोधित करताना त्यांनी नैतिक मूल्यांचा ऱ्हास, महिलांवरील वाढती हिंसाचार आणि पर्यावरणीय समस्या बिघडणे हे एका खोल सामाजिक संकटाचे लक्षण असल्याचे वर्णन केले.

# अगोदर पत्रकारांना पेन्शन, आता स्वच्छता कर्मचाऱ्यांना मोठी भेट

## नितीश कुमार यांनी केली आणखी एक घोषणा

**पटना, दि.२७ वृत्तसंस्था**

बिहार विधानसभा निवडणुकीपूर्वी मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी भेटवस्तूंचा वर्षाव केला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी स्वच्छता कर्मचाऱ्यांना आनंदाची बातमी दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी याविषयी बोलताना, ''स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी बिहार सरकारकडून एक आयोग स्थापन केला जाणार आहे. हा आयोग स्वच्छता कर्मचाऱ्यांशी संबंधित सर्व मुद्द्यांवर सरकारला सूचना देणार आहे असेही त्यांनी म्हटले.
मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी सोशल मीडियावर पोस्ट करताना, 'मला हे कळवण्यास आनंद होत आहे की बिहार राज्यातील स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हक्कांचे आणि हितांचे संरक्षण, कल्याण, पुनर्वसन, सामाजिक उत्थान, तक्रारींचे निवारण आणि विविध कल्याणकारी योजनांचे निरीक्षण सुनिश्चित करण्यासाठी, मी बिहार राज्य सफाई कर्मचारी आयोग स्थापन करण्याचे निर्देश दिले आहेत. हे आयोग स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या हिताचे, त्यांच्या हक्कांचे



संरक्षणाशी संबंधित सूचनांबाबत सरकारला सूचना देईल आणि स्वच्छता कामात गुंतलेल्या लोकांशी संबंधित कल्याणकारी योजनांचा आढावा घेईल आणि त्या अंमलात आणण्यासाठी योग्य ती कारवाई करेल.' असे त्यांनी म्हटले आहे.
मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी पुढे लिहिले की, 'बिहार राज्य सफाई कर्मचारी आयोगात एक अध्यक्ष, एक उपाध्यक्ष आणि पाच सदस्य असतील, ज्यापैकी एक महिला/ट्रान्सजेंडर असेल. राज्यातील स्वच्छता कार्यात सहभागी असलेल्या समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यात आणि त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक विकासात हे आयोग महत्त्वाची भूमिका बजावेल.'
विधानसभा निवडणुकीपूर्वी नितीश कुमार यांनी शनिवारी पत्रकारांसाठी एक मोठी घोषणा केली होती. त्यांनी इंस्टाग्रामवर पोस्ट करून लिहिले की, 'मला हे कळवण्यास आनंद होत आहे की बिहार पत्रकार सन्मान पेन्शन योजनेअंतर्गत, आता सर्व पात्र पत्रकारांना दरमहा ६ हजार रुपयांऐवजी १५ हजार रुपये पेन्शन रक्कम देण्याचे निर्देश विभागाला देण्यात आले आहेत. तसेच, बिहार पत्रकार सन्मान पेन्शन योजनेअंतर्गत पेन्शन मिळवणाऱ्या पत्रकारांच्या मृत्यूच्या बाबतीत, त्यांच्या अवलंबित पती/पत्नीला आयुष्यभर दरमहा ३ हजार रुपयांऐवजी १० हजार रुपये पेन्शन रक्कम देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. लोकशाहीत पत्रकारांची महत्त्वाची भूमिका आहे. ते लोकशाहीचे चौथे स्तंभ आहेत आणि सामाजिक विकासात त्यांची महत्त्वाची भूमिका आहे.

# अनिल अंबानींच्या कंपन्यांवर पुन्हा छापे

## 'ईडी'ची सलग तिसऱ्या दिवशी कारवाई

**मुंबई, दि.२७ वृत्तसंस्था**

रिलायन्स समूहाचे अध्यक्ष अनिल अंबानी यांच्या कंपन्यांविरोधात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मुंबईत सुरू केलेली शोध कारवाई शनिवारी तिसऱ्या दिवशी सुरू राहिली. अनेक ठिकाणी टाकण्यात आलेल्या छाप्यांदरम्यान अनेक दस्तऐवज आणि संगणकीय उपकरणे सापडल्याचे ईडीकडून सांगण्यात आले.
तीन हजार कोटी रुपयांच्या बँकेच्या कर्जाशी संबंधित आर्थिक गैरव्यवहार प्रकरण आणि कोट्यवधी रुपयांच्या वित्तीय अनियमिततांचे आरोप याची चौकशी करण्यासाठी ईडीने २४ जुलैला अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांविरोधात छाप्यांची कारवाई सुरू केली. आर्थिक गैरव्यवहार प्रतिबंधक कायद्याअंतर्गत (पीएमएलए) ही शोध कारवाई सुरू करण्यात आली असून मुंबईतील ३५पेक्षा जास्त ठिकाणी शोध घेतला जात आहे असे सूत्रांनी सांगितले.
अनिल अंबानींच्या मालकीच्या समूह



कंपन्यांनी २०१७ ते २०१९ या कालावधीत येस बँकेकडून साधारण तीन हजार रुपयांचे कर्ज घेतले होते. मात्र, ती रक्कम बेकायदा पद्धतीने अन्य कामांसाठी वापरण्यात आल्याचा आरोप ईडीने ठेवला आहे.या समूहाच्या 'रिलायन्स पॉवर' आणि 'रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर' या दोन कंपन्यांनी गुरुवारी रोखे बाजाराला या कारवाईबद्दल कळवले आहे. मात्र, या कारवाईचा आपले व्यावसायिक कामकाज, आर्थिक कामगिरी, समभागधारक, कर्मचारी आणि अन्य संबंधितांवर काहीही परिणाम झाला नसल्याचे त्यांनी स्टॉक एक्सचेंजला कळवले आहे.

# आठ लाख झोपडीधारकांच्या सर्वेक्षणाचे आव्हान

## ३१ डिसेंबरपर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे सरकारचे आदेश



**मुंबई, दि.२७ वृत्तसंस्था**

झोपडीधारकांची पात्रता निश्चिती पारदर्शकपणे व्हावी यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने झोपडीधारकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार आतापर्यंत १३ लाख ७९ हजार ०८६ झोपड्यांपैकी ५ लाख ७५ हजार १३६ झोपड्यांमधील झोपडीधारकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण पूर्ण झाले आहे. तर ८ लाख ३ हजार ९५० झोपड्यांमधील झोपडीधारकाचे बायोमेट्रीक सर्वेक्षण बाकी आहे.
आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांनी ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत सर्वेक्षण पूर्ण करण्याचे आदेश झोपु प्राधिकरणाला दिले आहेत. त्यामुळे पाच महिन्यात ८ लाख झोपडीधारकांच्या बायोमेट्रीक सर्वेक्षणाचे आव्हान झोपु प्राधिकरणासमोर आहे. हे आव्हान पेलण्यासाठी बायोमेट्रीक सर्वेक्षण करणाऱ्या संस्थांची वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे.
त्यानुसार नुकत्याच संस्थांच्या नियुक्तीसाठी निविदा काढण्यात आल्या आहेत. तर दुसरीकडे मनुष्यबळात वाढ करण्यात येत असून झोपडीधारकांचे योग्य सहकार्य मिळावे यासाठी जनजागृती मोहिमेवरही भर देण्यात आला आहे.
झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील परिशिष्ट-२ मध्ये अर्थात झोपडीधारकांच्या पात्रता निश्चितीत गैरप्रकार होत असल्याचा आरोप सातत्याने होतो. त्यामुळे पात्रता निश्चितीत पारदर्शकता आणण्यासाठी झोपडीधारकांचे बायोमेट्रीक सर्वेक्षण करण्याचा निर्णय २०१६ मध्ये झोपु प्राधिकरणाने घेतला.

# थायलंड-कंबोडिया तात्काळ युद्धबंदीसाठी वाटाघाटी करण्यास तयार

## डोनाल्ड ट्रम्प यांची मोठी घोषणा

**वाशिंग्टन, दि.२७ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी, थायलंड आणि कंबोडियाचे नेते लवकरच परस्पर युद्धबंदीसाठी भेटतील'' अशी मोठी घोषणा केली आहे. गेल्या तीन दिवसांपासून दोन्ही देशांमध्ये सीमेवर हिंसक संघर्ष सुरू आहेत, ज्यामध्ये आतापर्यंत ३० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे आणि सुमारे १.३ लाख लोक बेघर झाले आहेत.
राष्ट्रपती ट्रम्प सध्या स्कॉटलंडच्या दौऱ्यावर आहेत. ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावर माहिती दिली आहे. यामध्ये त्यांनी थायलंडचे कार्यवाहक पंतप्रधान फुमथम वेचायचाई आणि कंबोडियाचे पंतप्रधान हुन मानेट यांच्याशी स्वतंत्र चर्चा केली आहे.




ट्रम्प यांनी दोघांनाही इशारा दिला की,''जर युद्ध सुरूच राहिले तर अमेरिका त्यांच्यासोबत व्यापार करार करणार नाही.''पुढे ट्रम्प यांनी लिहिले की, ''दोन्ही देशांना तात्काळ शांतता हवी आहे आणि ते समेटासाठी तयार आहेत. दोन्ही नेते लवकरच युद्धबंदीसाठी एकत्र काम करतील.'' मात्र व्हाईट हाऊस किंवा दोन्ही देशांच्या दूतावासांनी अद्याप या संभाषणाची पुष्टी केलेली नाही.आसियानचे अध्यक्ष आणि मलेशियाचे पंतप्रधान अन्वर इब्राहिम यांनीही संघर्ष थांबवण्यासाठी युद्धबंदीचा प्रस्ताव मांडला आहे. कंबोडियाने या प्रस्तावाला उघडपणे पाठिंबा दिला आहे, तर थायलंडने म्हटले आहे की त्यांनी 'तत्वतः तो स्वीकारला आहे'.८१७ किमी लांबीच्या थायलंड-कंबोडिया सीमेच्या अनेक भागांवर दीर्घकाळ वाद आहे. विशेषतः प्रेह विहार आणि ता मोन थॉम सारख्या ११ व्या शतकातील प्राचीन हिंदू मंदिरांबद्दल, दोन्ही देशांचा दावा आहे की हे त्यांच्या हद्दीत आहेत. १९६२ मध्ये, आंतरराष्ट्रीय न्यायालयाने प्रेह विहार मंदिराला कंबोडियाचा भाग मानले, परंतु थायलंडने हा निर्णय पूर्णपणे स्वीकारला नाही.

# हाथरसमध्ये मुलाच्या वयाच्या मुलासोबत ३ मुलांची आई फरार

**हाथरस , दि.२७ वृत्तसंस्था**

उत्तर प्रदेशातील हाथरसमध्ये एक विचित्र प्रेमकहाणी समोर आली आहे. येथे तीन मुलांची आई तिच्याच मुलाच्या वयाच्या एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलासोबत घरातून पळून गेली आहे. पोलिस दोघांचाही शोध घेत आहेत. हे प्रकरण हाथरसच्या चंदपा क्षेत्रातील अल्हेपूर चुरसैन गावातील आहे.गावातील रहिवासी राजेंद्र यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी आपल्या लहान मुलीचे लग्न अलीगडच्या जलाली येथील जयपाल यांच्या घरी लावून दिले होते. जयपाल आणि त्यांची पत्नी पूनम यांना तीन मुले आहेत. नात्यामुळे पूनमचे राजेंद्र यांच्या घरी नेहमी येणे-जाणे होते.याचदरम्यान, पूनमची ओळख राजेंद्र यांच्या १४ वर्षीय मुलाशी झाली. भेटीगाठी वाढल्या आणि त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. अखेर दोघांनी घरातून पळून जाण्याचा निर्णय घेतला. पीडित वडील राजेंद्र यांनी आरोप केला आहे. .की, पूनमनेच त्यांच्या मुलाला फूस लावून पळवून नेले आहे.

# तेजप्रताप यादवांकडून अपक्ष निवडणूक लढण्याची घोषणा

**,महुआ, दि.२७ वृत्तसंस्था**

बिहार सरकारचे माजी मंत्री आणि राजद प्रमुख लालू प्रसाद यादव यांचे पुत्र तेजप्रताप यांना नुकतेच पक्षातून काढून टाकण्यात आले होते. त्यानंतर त्यांचे राजकीय भवितव्य धोक्यात आल्याचे म्हटले जात होते. मात्र आता तेजप्रताप यादव यांनी स्वतःची राजकीय टीम स्थापन करण्याची घोषणा केली आहे. त्यांनी यावेळीही विधानसभा निवडणूक लढवणार असल्याचे सांगितले. तेजप्रताप यादव यांनी महुआ विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार असल्याची मोठी घोषणा केली आहे.
तेजप्रताप यादव यांनी



निश्चितपणे सांगत,''ते कोणताही नवीन पक्ष स्थापन करत नाहीत. त्यांनी सांगितले की त्यांची एक टीम आहे, ज्याचे नाव टीम तेजप्रताप यादव आहे. हा राजकीय पक्ष नाही तर एक खुलं व्यासपीठ आहे. ज्याठिकाणी सर्वांना सामील होण्याची आणि काम करण्याची संधी मिळेल'' असे म्हणत त्यांनी आपल्या नव्या राजकीय इनिंगची सुरुवात केली आहे.राजदमधून काढून टाकण्यात आलेले नेते तेजप्रताप यादव यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीविषयी बोलताना,''टीम तेजप्रताप यादव हे जनतेपर्यंत पोहोचण्याचे व्यासपीठ आहे. यावेळी काका नितीश कुमार मुख्यमंत्री होणार नाहीत. जो कोणी सरकार बनवेल, जर ते तरुणाई, रोजगार, शिक्षण आणि आरोग्याबद्दल बोलतील तर तेजप्रताप यादव त्यांच्यासोबत पूर्ण ताकदीने उभे राहतील. आम्ही महुआमधून निवडणूक लढवू, अनेक विरोधक आहेत, त्यांना खाज सुटत आहे.'' असे म्हणत त्यांनी विरोधकांवर निशाणा साधला आहे.त्यासोबतच त्यांनी पुढे बोलताना भावनिक आवाहनही केले.

# डोनाल्ड ट्रम्प यांचे कमला हॅरिसवर गंभीर आरोप ; अध्यक्षीय निवडणुकीत झाला होता मोठा 'खेळ'?

**वॉशिंग्टन , दि.२७ वृत्तसंस्था**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प नेहमीच त्यांच्या विरोधकांवर हल्लाबोल करत असतात. आता नेहमीप्रमाणे त्यांच्याकडून पुन्हा एकदा इतका विरोधकांवर निशाणा साधला आहे. यावेळी त्यांच्या निशाण्यावर राष्ट्रपती पदाच्या उमेदवार असलेल्या कमला हॅरिस आल्या आहेत. ट्रम्प यांनी यावेळी ,''या राष्ट्राध्यक्ष निवडणुकीत कमला हॅरिसने जाहिरातींवर खूप पैसे खर्च केले, नियमांकडेही दुर्लक्ष केले गेले' असल्याचा मोठा दावा केला आहे.
राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या सोशल मीडियावर एका पोस्ट शेअर करताना,''मी डेमोक्रॅट्सचे किती पैसे देणे बाकी आहे ते पाहत आहे, त्यांनी स्वतः कबूल केले आहे की त्यांच्या पक्षातील गायिका बियॉन्सेला ११ दशलक्ष डॉलर्स देण्यात आले होते, तेही फक्त एका जाहिरातीसाठी. खर्चाच्या नावाखाली ओप्रावर तीन दशलक्ष डॉलर्स खर्च



करण्यात आले होते, कमी दर्जाच्या अँकर अल शार्प्टनला ६ लाख डॉलर्स देण्यात आले होते. हे निरुपयोगी खर्च रेकॉर्ड बुकमध्ये चुकीच्या पद्धतीने दाखवण्यात आले होते. जाहिरातींसाठी पैसे देणे परवानगी नाही, ते पूर्णपणे बेकायदेशीर आहे'' असे म्हणत त्यांनी मोठे दावे केले आहेत.
पुढे, राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी कमला हॅरिसचा उल्लेख करत, ''जर नेते स्वतःला मान्यता मिळवण्यासाठी लोकांना पैसे देऊ लागले तर तुम्ही कल्पना करू शकता का? सर्व काही संपेल. कमला आणि इतर सर्व लोकांनी ज्यांना एंडोर्समेंट पैसे मिळाले आहेत त्यांनी कायदा मोडला आहे. सर्वांवर कारवाई झाली पाहिजे.'' असा आरोप करत त्यांनी कमला हॅरिस यांच्यावर टीका केली आहे. ट्रम्प केवळ नेत्यांनाच लक्ष्य करत नाहीत तर त्यांनी मोठ्या अमेरिकन सेलिब्रिटींनाही आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले आहे. अशा परिस्थितीत, येत्या काळात हा वाद खूप वाढू शकतो.
अध्यक्ष ट्रम्प यांनी हल्लाबोल अशा वेळी केला आहे जेव्हा ते स्वतः जेफ्री एपस्टाईन प्रकरणात अडकत आहेत. ट्रम्प यांनी तर त्या तपासाला पूर्णपणे राजकीयदृष्ट्या प्रेरित म्हटले आहे. ज्या फायली ट्रम्प एकेकाळी उघड करण्याचे आश्वासन देत होते, त्या आता त्यांची सर्वात मोठी डोकेदुखी बनल्या आहेत.

हे पत्र मालक,मुद्रक,प्रकाशक आणि **मुख्य संपादक तिक्ष्णगत सुगत वाघमारे** यांनी भास्कर प्रिंटिंग प्रेस एन.एच.६ बोरगाव मंजू येथे मुद्रित करून दै.अजिंक्य भारत, सुगत भवन,बारा ज्योतिर्लिंग मंदिराजवळ, रणपिसेनगर, अकोला येथे प्रकाशित केले.* **कार्यकारी संपादक-रूबेन डी.वाळके (*पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची)** आरएनआय-MAHMAR/2009/35271

आपले पत्र या मेलवर पाठवावे, आम्ही त्याला प्रसिद्धी देऊ
ajinkyabharat23@gmail.com

# संपादकीय...

## धक्कादायक निकाल

११ जुलै २००६ रोजी मुंबईच्या उपनगरी रेल्वे गाड्यात बॉम्बस्फोट झाला त्यावेळी महाराष्ट्राच्या दहशतवादविरोधी पथकाची नुकतीच स्थापना करण्यात आली होती. या पथकाकडे या दहशतवादी घटनेचा तपास सोपविण्यात आला. पथकाने २०१५ मध्ये विशेष मकोका न्यायालयात अटक करण्यात आलेल्या १२ आरोपींविरूद्ध यशस्वीपणे खटला चालविला. साखळी स्फोटप्रकरणी दहाहून अधिक आरोपींची ओळख पटली होती, मात्र त्यांना अटक करता आली नाही. ते अजूनही फरार आहेत. त्यांना अटक झाली असती तर कट व त्याची अंमलबजावणी याबाबतची माहिती उघड होऊ शकली असती. या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या पाच आरोपींना विशेष न्यायालयाने मृत्यूदंड आणि सात आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. आता दहा वर्षानंतर उच्च न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले आहे. या निकालाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली असली तरी याचा अर्थ आपल्या फौजदारी न्यायव्यवस्थेत काही तरी फार मोठे चुकते आहे. हे आरोपी निष्पाप होते तर जवळजवळ १९ वर्षे त्यांना तुरूंगात डांबून ठेवणे आपण न्याय्य ठरवू शकतो? आणि ते त्या सामूहिक हत्याकांडासाठी जबाबदार असलेल्या दहशतवादी टोळीचे सदस्य होते, तर त्यांना शिक्षा न देता मुक्त का सोडण्यात आले? हे प्रश्न विशेषतः पोलीस, सरकारी वकील, न्यायालये आणि कारागृह यांच्याविषयी ज्यांच्या मनात किंतु आहे, अशा सामान्य नागरिकांच्या मनात अस्वस्थता निर्माण करणारे आहेत. देशात सुरक्षित वातावरण हवे, यासाठी काम करणाऱ्या सर्वांसाठी हा निकाल म्हणजे एक धोक्याची घंटा आहे. शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराधाला शिक्षा होऊ नये यांचे वारंवार स्मरण कायदा व न्यायाच्या क्षेत्रांत करून दिले जात असते, परंतु कोणत्याही दहशतवाद्याला सुटका मिळू नये हेसुद्धा तितकेच महत्त्वाचे आहे. त्यामुळेच प्रश्न असा उपस्थित होतो की, अखेर मुंबईतील १८० हून अधिक निष्पाप प्रवाशांना कोणी मारले आणि ८०० हून अधिक जण कोणामुळे जखमी झाले? त्याहीपेक्षा मोठा प्रश्न असा की, पीडितांना न्याय मिळवून देण्यात पोलीस आणि त्यांची बाजू मांडणारे वकील मंडळ कसे आणि का अपयशी ठरले असावे? कोणतीही दहशतवादी घटना घडल्यावर पोलिसांवर तात्काळ तपास पूर्ण करण्यासाठी प्रचंड दबाव येतो. राजकीय नेतृत्वही अशा वेळी अस्वस्थ होते. मात्र प्रत्यक्ष कार्यरत असलेल्या अधिकाऱ्यावर फारसा दबाव टाकला जात नाही. त्यांना दहशतवाद्यांचा माग काढण्याची मोकळीक दिली जाते. अटक झालेले आरोपी तपास अधिकाऱ्यासमोर अनेकदा वेगवेगळ्या प्रकारची माहिती देतात. तपास अधिकारी पडद्यामागे राहून शांतपणे काम करीत असतात. काही अधिकारी चुकू शकतात आणि तपासात काही उणीवा राहू शकतात. पण दहशतवादविरोधी पथकासारख्या विशेष पथकांमध्ये आणि विविध गुन्हे शाखामध्ये काम करणारे अधिकारी न्यायालयीन छाननीला तोंड देऊ शकतील असे ठोस पुरावे मिळविण्यासाठी खूप मेहनत घेतात. प्रसंगी विशेष अत्यंत निष्णात सरकारी वकिलांची मदत घेऊन या अडचणीवर मात करतात. त्यामुळेच मुंबई बॉम्बस्फोटांच्या या प्रकरणात सर्व आरोपी निर्दोष सुटणे या गोष्टीबाबत फौजदारी न्यायव्यवस्थेतील प्रत्येक घटकाने सखोल चिंतन करणे आवश्यक आहे. तपासातील त्रुटी दूर करणे, आरोपपत्र दाखल करण्याआधी सुसंगता आणणे आणि वेळच्यावेळी कायदेशीर सल्ला घेणे यासाठी अधिकाऱ्यांना नीट प्रशिक्षण द्यायला हवे. तरच भविष्यात गंभीर खटल्यांबाबत असे घडणे आपण रोखू शकतो. २००६ मधील खटल्याचा निकाल २०२५ म्हणजे तब्बल १९ वर्षांनी लागणे आणि अटक करण्यात आलेले सगळे आरोपी निर्दोष सुटणे हे फक्त खेदजनक नाही तर आपली व्यवस्था पूर्णपणे कोलमडलेली असल्याचे निदर्शक आहे. आता तरी आपण सत्य परिस्थितीकडे डोळे उघडून बघायला हवे. जिच्या तपासामुळे शिक्षा होण्याचे प्रमाण ९५ टक्क्यांहून अधिक आहे, ती राष्ट्रीय तपास यंत्रणा ही आजच्या या चिंताजनक परिस्थितीत आशेचा किरण ठरत आहे. तिला स्वतंत्रपणे व मूळ उद्दिष्टांवर लक्ष केंद्रित करीत काम करू दिले तर ती निश्चितच दहशतवाद्यांना तसेच देशाच्या सुरक्षिततेला धोका ठरणाऱ्यांना शिक्षेपर्यंत नेऊ शकेल. खरे तर एनआयने त्यांच्या ठरलेल्या कामाच्या पलीकडे जाऊन राज्याराज्यांच्या दहशतवादविरोधी पथकांना आणि इतर विशेष पथकांना प्रशिक्षणही द्यायला हवे. देशातील एकंदरीत परिस्थिती पाहता राजकीय पक्ष हस्तक्षेप करून या संस्थेचे स्वातंत्र्य आणि अधिकार कमी करू शकतात, अशी आपणास भीती वाटते. मुंबई उच्च न्यायालयाच्या निकालावडे फौजदारी न्यायव्यवस्थेच्या सर्व घटकांनी दर्जेदार तपास होणे आणि वेळेवर खटल्याची सुनावणी होणे यासाठीचे आव्हान म्हणून बघितले पाहिजे. मुंबई साखळी बॉम्बस्फोट प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाने सर्व आरोपींना निर्दोष मुक्त केले परंतु या निकालाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली. आता या विषयावर विधी क्षेत्रात जोरदार चर्चा सुरु आहे परंतु उच्च न्यायालय या निकालापर्यंत कसे पोहोचले याचाही गांभीर्याने विचार होण्याची गरज आहे, अन्यथा याच निकालाचा आधार घेवून भविष्यातही अनेक आरोपी असेच निर्दोष सुटण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## स्मृती गंध

मन वाऱ्याच्या वेगाने
त्यात पावसाची धार

मेघ बरसती रंग
मन झाले ओलेचिंब
भुलल्या राजसाची
स्मृती प्रत्येकच थेंब

श्वासा भेटीचाच गंध
मना अनंत तरंग
त्या मिलनाच्या लहरा
अन् पावसाच्या धारा

थेंब हळवा फकीर
मन त्यात बेफिकीर
आठोणीचा तो पसारा
मन फुलवी पिसारा

ना गरिबी श्रीमंती
तेथे अनाहुत नांदी
थेंब क्षणाचे सोबती
मनी अनंताची नाती

ग्रीष्मातली धग अन्
आस भेटीची उदार

-सुनिल ढोकणे
तुलसी नगर मूर्तिजापूर

## ॥ अभंगवाणी ॥

- प्रवीण हटकर
८०५५२१३२८१

लगाम लावतो
आपलेपणाला ।
नसते मनाला
सीमा जरी ॥

मनाला नसतो
आकार उकार ।
मन निराकार
ब्रम्ह आहे ॥

आपलेपण हे
मनातून येते ।
ते कधी नसते
वरतून ॥

वास्तविकता नि
कल्पनेच्या पार ।
मन आविष्कार
असतो या ॥



प्रासंगिक

सौ. प्रांजल रायपुरे
शास्त्रीनगर अकोला

# श्रावण आला

हसरा नाचरा, जरासा लाजरा श्रावण आला श्रावण आला..
श्रावण आपणास जीवनाचा मूळ स्तोत्र बदलून टाकतो. श्रावणातील प्रत्येक दिवसाला वाराचे महत्त्व आहे. उत्तमात उत्तम सात्विक आहाराची ओढ लावणारा जीवाची शिवाशी भेट करणारा हा क्षण असतो. आनंद निर्भिक करणे सात्विकता दर्शविते.. कधीतरी स्वतः कडे बघावं काहीतरी करावं स्वतःच्या अंतरंगात रंगून जावं थोडी तरी विश्रांती स्वतः साठी घ्यावी .असं या श्रावणात वाटते. व्रत करणे म्हणजे काय?. उपवास म्हणजे जवळ अगदी जवळ राहणे सण ,व्रत यातून आपण देवांना काहीतरी देत नसतो. उलट त्यांच्यातील गुण आपल्या अंगी उतरविण्याचा प्रयत्न करतो. मुळात देवी, देवतांसाठी उपवास करायचे नसता.. ते आपल्यावर संस्कार करण्यासाठी असतात.. श्रावणातील प्रत्येक वाराला महत्त्व आहे ''मंगळागौर'' हे मनाशी थकलेल्या स्त्रियांच्या श्रीश्रुततेसाठी एक आनंदी विरंगुळा असतो. या दिवशी भरपूर अन्नदान करतात कुठेतरी कोणी कष्टी जर घरी आला तर दमलेल्या शरीराला, थकलेल्या मनाला आधार देण्यासाठी इतकं अन्नदान केले पाहिजे. श्रावणात शुक्रवारी जीवती पूजन'' मातृत्वाची पूजा केली जाते. मातृत्व, संस्कार जीवती पूजेतून केला जातो. गरीब स्त्री मुलांना गरजू वस्तू देऊनही या पूजनीय सोहळा आनंदित करते. दर शनीवारी अलौकिक बुद्धी मनशांतीसाठी मारुतीरायाचे पूजन करतात मारुतीरायाला लघु रुद्र अभिषेक करतात.. अनेक स्त्रीया सूर्याला नमून दिवसभर मैन पाडतात. शरीरातील खूप मोठी ऊर्जा मौनाने वाढते. मनातील मर्म समजू शकतो श्रीकृष्ण म्हणजे आनंद स्वानंद देणारा संपूर्ण मानवता एकजूटेत टिकवणारा श्रेष्ठ, राजा ,पुत्र ,सारथी असा हा श्रीकृष्ण सोहळा आपण जन्माष्टमी सोहळा म्हणून साजरा करतो..

मनावर व शरीरावर उत्तम संस्कार करण्यासाठी सर्वात उत्तम चातुर्मास ठरतो संपूर्ण श्रावणातील वृत्त वैकल्पे डोळसपणे पार पाडून .आपली कार्यप्रणाली जीवनशक्ती या श्रावण मानसी प्रस्थापित करू शकतो..

श्रावणाच्या आगमनात मन न्हाहून जाते. हृदय भरून येते. किती सुंदर सुंदर कविता या श्रावणात होते. प्रेमाचं नातं जोडूनिया जाते .सुखदुःखाच सारण मिटल्या जाते .अग सखी एक सांगू सणवार व्रत, वैकल्ये सर्व सणांची उधळण याच श्रावण पासून होते ..सृष्टीची उत्पत्ती स्त्रीनेच केली भारत माता तीच बनली या पृथ्वीतलावर बारा मास आहेत त्यातील श्रावण महिन्याला श्रेष्ठ वाटणारा महिना. किती छान किती गोड पावसाच्या सरीत टिंब टिंब आवाज सर्वत्र ओलाईत जमिनीतील सुगंध काही औरच नजरांना असतो... श्रावणाच्या भेटीत चाहूल लागे मनी आठवणीचा भंडार आठवते क्षणी. मायेच्या पांघरण्यात भिजून गाते गाणी. वाट पाहते मी ग येणार श्रावण सरी .चिव चिव ,काव ,काव पक्षांचे थवे गार गार हवेत उंच उंच उडावे. पिवळे तांबूस ऊन पडते. हिरवळ दाटे चोहीकडे. ओहळ निर्झर गातात मंजुळ गाणी. वसुंधरा जणू भरजरी शालूच नेसते. क्षितिजाच्या पलीत इंद्रधनुष्य दक्ष गवताच्या पातात मोर नाचतो .मस्त .रंग बावरा श्रावण आला मनावर उपचाराची जादू करून गेला .कळत नकळत श्रावण फुललेल्या फुलासारखे मनाला उत्तेजित, उत्साही करून गेला. श्रावण आला श्रावण आला श्रावणासाठी आतुरता ओथंबून जाते. शिकवणारा श्रावण सरून गेल्यावरही श्रावणाची झिज उरात तशीच राहते.. गीतांना छंद देणार अंग अंग फ ुलकीत करणारा सुहासिनीचा आणि कवीचा लाडका श्रावण कधी येते, कधी मुक्ते, कधी कळतच नाही. या श्रावण प्रियतेचा तर कुठेच गाथाही नाही. झीम्याचे दिवस फ ुगड्याच्या रात्री मंगळागौरीचा जागर उपासाची खिचडी पंचमीच्या लाह्या आणि किती काय काय श्रावण मासी ....फुललेल्या निसर्गाच्या साथीत सणांची ललकारी देत आलेला श्रावण मास म्हणजे निसर्ग पूजेचा दानधर्माचा आणि व्रतवैकल्याचा मास या



श्रावण मासात निसर्गदेवता जणू सगुण रूप घेऊन साकार होते ती मंगळागौरीच्या रूपात आपल्या सौभाग्याच्या रक्षणासाठी नव विवाहा लग्नानंतरची पहिली पाच वर्षे या मंगळागौरीची पूजनेचा वसा घेतात विविध रंगी फूल तसेच सोळा प्रकारची पत्री वाहून देवीची पूजा केली जाते झिम्मा फुगडी ,कोंबडा गाठोड, अशा विविध प्रकारच्या खेड्यांनी गाण्यांनी जागरण केल्या जाते .नव्या जुन्या मैत्रिणी एकत्र यायच्या सासर माहेर वर खेळायची गाणी गायची.. उखाण्यातून सूक्त गुण प्रकट करायच्या सुरुवातीच्या काळात आमंत्रणाची वाट न बघता ज्यांच्या घरी मंगळागौरीला जायचं त्या घरातील भगिनी खेळात सामील होत . काहीच नावीन्यता नव्हती सर्वत्र एकत्र येऊन आनंदाने मोठ्या थाट्याने हा सण साजरे करत एकंदरीत काय या खेळा मागची रचना आहे ती आकर्षक आहे. संसार सांभाळत आला गेला पाहुणा हे सारं बघता अतिशय उत्तेजनाने हा खेळ माझ्या सखी रंगवतात पूर्वीच्या काळी लहान वयातच लग्न होत असत एकत्र कुटुंबात अनेक प्रकारच्या बंधनात राहत लागत असे. अशावेळी या सासुरवाशींना थोडीशी मोकळीक मिळावी आपल्या समवयस्कर मैत्रिणीबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी करता याव्यात यासाठी मंगळागौरीचा जागरण केल्या जाते..पण आज काळ बदलला आहे स्त्रियांना शिक्षण स्वातंत्र आणि संधी मिळाल्यास स्त्री अर्थजणासाठी बाहेर पडू लागल्या, आणि हळूहळू आपल्या या मंगळागौरीला वेळ मिळत नाही.. याकरणामुळे लोप होऊ लागला... टीव्ही वाहिन्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम झाला ,आणि या लाटेत परंपरा केवळ वेळ मिळत नाही या कारणामुळे लोप होऊ लागल्या ..टीव्ही वाहिन्यांचं सांस्कृतिक आक्रमण मनावर इतकं झालं आणि या लाटेत पारंपारिक खेळ, खेळण्याऐवजी नुसत्या गप्पा मारणं ,चित्रपट बघणं मंगळागौरीचा जागरण करणं ही केवळ औपचारिकता उरली ..

खरंतर तनाला, मनाला समृद्ध करणारे निरोगी ठेवणारे सर्वांग सुंदर व्यायाम प्रकार यासाठी चार ,चौघी एकत्र येऊन होणारी विचारांची देवाण-घेवाण आणि यातून होणारी करमणूक म्हणजेच हे पारंपारिक खेळ होय.. परंपरा नाहीशी होणार का असा प्रश्न अजूनही पडतो? आपण किती आधुनिक असलो तरी श्रावण मास आला की वातावरण एक वेगळच वळण स्पष्टपणे जाणवू लागते .कधी नटू, कधी साधेपणा हा महिना व्रत वैकल्ये आणि परंपरा जपण्याचा प्रयत्न करतो. अगदी खेड्या गावातही पेरणी झाल्याने रोप येईपर्यंत कारभारी शेतावर जात नाही. त्यामुळे कारभारणीही निवांत असतात पण हा निवांतपणा त्यांना खायला उठतो त्यामुळे मग त्या श्रावणातले सणवार जोरदार साजरी करतात.. श्रावणातील नागपंचमी, नारळी पौर्णिमा, जन्माष्टमी बैलपोळा, हे सण उत्सवा बरोबरच अध्यात्मिक शिकवण देणारे आहेत. नागासारखा प्राणी शेतकऱ्याचा मित्र आहे. शेतीतील उंदीर खाण्याचे काम करून नाग पंचमी रक्षण करतात सापांना आणि नागांना पाहिल्याबरोबर आपण खूप घाबरतो खरं म्हणजे!.. आपण त्यांच्या वाटेत गेलो तरच ते आपल्याला त्रास देतात. उगीचच डंक मारीत नाही .याचा उपयोग या सणानिमित्त स्वतः करून घ्यायचं असतो .राब राब राबणारा शेतकरी मृगजळ पावसातही आनंदी होतो. तो माझा शेतकरी घनदाट मेघ गरजते तृप्त अश्रूत दिसतो तो माझा शेतकरी..

श्रावणात पचनशक्ती मंद असते म्हणून या ऋतूमध्ये पचनशक्तीवर्धक आहार घ्यावा उन्हाळ्यात वाढलेली वृक्षता म्हणजे कोरडेपणा व पावसाळ्यातील गारठा यामुळे वात वाढतो.. वनस्पती ,धान्य, पाणी यात अंमलता वाढत असल्यामुळे पित्त साचण्याकडे कल असतो. म्हणून या ऋतूत हलका पचनशक्ती वर्धक आहार घ्यावा एकंदरीत काय लंघन करावे.. उदाहरणार्थ सर्व प्रकारच्या लाह्या त्यांचे पदार्थ पचवण्यास अत्यंत हलके पौष्टिक आहेत ज्वारी राजगिरा नागली बाजरी साडीच्या लाह्या वापरल्या जातात कुरकुरे पॉपकॉर्न टाळावेत.. तांदुळाचे पदार्थ पिठलं, भात, खिचडी, घावन, डाळीचं काढणं ,कडी हे पदार्थ खावेत. मठ ,पडवळ घेवडा दुधी, गोबी भेंडी या भाज्यांचा वापर जास्त करावा हिंग लसूण जिरे, मिरे ओवा पुदिना सुंठ हे सर्व पदार्थ मसाले आवर्जून वापरावे ओल्या सुख्या चटण्या पेरू चिकू याचा वापर जास्त करावा पचावयास जड पदार्थ उसळी मोड ,आलेली धान्य कंदमुळे ,मिठाई ,आंबवलेले पदार्थ डोसा ,इडली ढोकळा, ब्रेड पाव आणि टरबूज ,काकडी ,भरपूर पाणी असलेले पदार्थ मात्र या ऋतूत खाऊ नये. कर्टुले ही भाजी आषाढी बारसला विठ्ठलाचा प्रसाद माणून ग्रहण करावी लागते. वास्तविक पाहता कर्टुले दिसायला खूप कडक दिसतात पण शरीराला खूप गुणकारी औषधेच काम करतात.. आपल्यातील ग्रीष्मिता कमी करण्यासाठी ही भाजी या महिन्यात खावी.. अंबाळी या भाजीचे खूप महत्त्व आहे ही भाजी वाळून जर ठेवली तर केव्हाही भाजीची भाकर म्हणून खाऊ शकतो श्रावणातील पूजक भाजी सर्व देवतांना नैवेद्यात याच भाजीचा समावेश होतो. भाद्रपातील गणपती, महालक्ष्मी, श्रावणातील नवनाथ, यांच्या नैवेद्याची पूर्ती केवळ याच भाजीने होते कधी कुठेही भाजी सहज मिळते. अळूची भाजी काही काही भाज्या श्रावणातच खाव्या लागतात शरीरातील दाहा शांततेसाठी अळूची भाजी श्रावण मासात खावी या सर्व भाज्या हिरवाई धरतीतच उगवते नंतर तिथेच लीन पावते. असा हा श्रावण मास खूप काही देऊन जाते शेवटी एवढेच सांगते श्रावण मास तू जरी गेला तरी चाहूल तुझ्याच भेटीची मंद ,सुगंध आनंद देणाऱ्या या सरीची असा माझा मित्र ललकारी ठोकत येतो तो पण जाताना देवाण-घेवाण करूनच जातो..



दिन विशेष

नितीन श्रीवास्तव
मो. ९४२१४९४०४०

# नागपंचमी आणि पत्ते, जुगार यांचा काडीचा संबंध नाही

नागपंचमी हा श्रावण महिन्यातील एक महत्वाचा सण आहे. या दिवशी घरोघरी नागाची पूजा करून नागदेवतेला प्रसन्न करण्याची प्रथा आहे. कालिया नागाचा पराभव करून यमुना नदीच्या पात्रातून भगवान श्रीकृष्ण सुरक्षित वर आले तो दिवस श्रावण शुद्ध पंचमीचा होता. त्या दिवसापासून नागपूजा प्रचारात आली असे मानले जाते. अशी आख्यांकिका आहे की, एका शेतकऱ्याच्या नांगराच्या फाळाने नागिणीची तीन पिल्ले मृत्युमुखी पडली व त्यामुळे नागदेवतेचा कोप झाला अशीही समजूत प्रचलित आहे. त्यामुळे या दिवशी शेतकरी आपल्या शेतात नांगरत नाही. कोणीही खणत नाही, घरी कोणीही भाज्या चिरायच्या नाही, तवा वापरायचा नाही व कुटायचे नाही असे काही नियम पालन करण्याची प्रथा आहे. प्राचीन भारतीय लोकांनी नागाला देवत्व देऊन त्याला पुजेचा विषय बनवला. आपला भारत देश कृषिप्रधान देश आहे. कृषी संस्कृतीत नागाच्या पूजनाचे महत्त्व विशेष आहे. नाग आणि साप हे शेताचे रक्षणकर्ते आणि शेतकरी बांधवांचा मित्र मानला जातो. या दिवशी महिला घराची स्वच्छता करतात, जमिनी शेणाने सारवितात, अंगणात रांगोळी काढतात, नागाची चित्रे भिंतीवर काढतात आणि त्याची पूजा करतात. काही ठिकाणी नागाच्या वारुळापाशी महिला गाणी म्हणत जातात आणि वारुळाची पूजा करतात. भारताच्या काही प्रांतात नागपंचमीला जिवंत नागाची पूजा होते दूध-लाह्या ह्या माणसाच्या आवडीच्या गोष्टी नागांना दिल्या जातात, पण ते त्यांचे अन्न नाही हे लक्षात ठेवले पाहिजे. प्राचीन अनेक दशकापासुन पिढ्यान पिढ्या नागपंचमीच्या दिवशी पत्ते खेळायची प्रथा आहे. परंतु असा कोणताच धार्मिक, शास्त्रीय आणि सांस्कृतिक आधार याला नाही. नागपंचमी आणि पत्त्यांच्या खेळांचा काही एक संबध नाही. मानसाने आपल्या सोयी नुसार ही प्रथा पाडली आहे. कोणता ही धर्म कोणती ही जात पत्त्यांच्या या खेळाला समर्थन करत नाही आणि करू शकत नाही. जुगारा खेळल्याने अनेक लोक बर्बाद झाले आहेत. नागपंचमीला



अनेक भागात महिला आपल्या माहेरी जातात त्या कारणाने पुरुष वर्गाला सूट भेटते म्हणून पत्ते खेळतात नागपंचमी आणि पत्ते जुगार काडिचा संबंध नाही?

पत्त्यांच्या खेळांचा उगम नेमका केव्हा व कुठे झाला, याविषयी निश्चित सांगता येणार नाही. पत्त्यांची सुरुवात चीनमध्ये झाली. काहींच्या मते या खेळाचा उगम चीनमध्ये इ.स. सातव्या ते दहाव्या शतकांच्या दरम्यान झाला असावा. चीनमध्ये कागदी चलनाचा वापर सातव्या शतकात रूढ होता. काहींच्या मते या खेळाचा उगम भारतात झाला असावा. प्राचीन चतुर्भुज हिंदू देवतांच्या हातांमध्ये सामान्यतः चक्र, खड्ग, पात्र व दंड असत, त्यांच्याशी यूरोपात सापडलेल्या आद्य पत्त्यांवरील चिन्हांचे साम्य आढळून येते. त्याचप्रमाणे प्राचीन काळी भारतात लोकप्रिय असलेल्या दशावतारी अर्थात गंजीफा, बुद्धिबळे व पत्ते यांतील साम्यस्थळांवरून या खेळाचा उगम भारतात इ.स.८०० च्या सुमारास झाला असावा, असे अनुमान काढता येते. पत्ता हा पुठ्ठ्यापासून किंवा प्लास्टिकपासून बनविण्यात येणारा एक हाताच्या पंजाएवढा पातळ चौकोनी कागद आहे. अनेक पत्त्यांच्या संचाला कॅट म्हणतात. परंतु एका कॅटमध्ये काही विशिष्ट पत्तेच असावे लागतात. पत्ते हे विविध बैठे खेळ खेळण्यासाठी वापरण्यात येतात. ऑनलाइन पत्त्याच्या खेळामुळे अनेक लोकांचे संसार उध्वस्त होत आहे यावर लवकर बंदी घालणं गरजेचे आहे.

ग्रामीण आणि शहरी भागात नागपंचमीचे औचित्य साधून पत्ते अर्थात जुगार खेळला जा. या जुगाराने अनेक घर उधवस्त झाली आहेत. नागपंचमी ला पत्ते खेळण्यासाठी काही लोक पैसे व्याजाने घेतात तसेच काही लोक कर्ज काढ़तात तर काही काबाड कष्टाने मेहनतीने कमाविले पैसे या पत्त्यात हारतात. आज ऑनलाइन पत्त्याची जाहिरात खुशाल सेलिब्रेटी लोक करत आहेत ऑनलाइन पत्त्यात अनेक लोक बर्बाद झाली आहेत. जुग़ार कोणता ही असो तो घर उद्धवस्त करेल म्हणजे करेल. नागपंचमी आणि पत्ते जुगार काडिचा संबंध नाही? फक्त मानसाने आपल्या सोयीसाठी हा संबंध जोड़ला आहे. सर्व महाराष्ट्रातिल बांधवांना हात जोडून विनंती की, कृपया करून कोणी ही नागपंचमी या पवित्र सणाला पत्ते किंवा जुग़ार खेळू नका एवढीच नागपंचमी निमित्य अपेक्षा!



व्यक्तिवेध

अनिता काळबांडे
मो. ९६२३३८७८५५

# प्राध्यापक डॉ. संतोष हुशे :आधारस्तंभ

विदर्भामधील अकोल्या जिल्ह्यातील असं हे एक व्यक्तिमत्व जे गोरगरिबांचं आधारस्तंभ बनल.
जर एखादा आमदार खासदार जनतेसाठी. काही करत असेल तर त्याच्याकडे तो अधिकार असतो. त्यासाठी त्याला शासन निधी उपलब्ध असते.
परंतु हुशे सर कोणी आमदार नाही. खासदार नाही तरी देखील कर्तृत्वाने लोकांच्या हृदयापर्यंत जाऊन पोहोचले. नक्कीच आपल्या सगळ्यांना त्यांच्याबद्दल जाणून घ्यायला आवडेल. त्यांच्याबद्दल कितीही लिहिलं तरी कमी आहे त्यांचं कार्य अणगिणत आहे. हुशे सरांचा जन्मदिन २९ जुलै १९६९ आहे. त्यांच्या नावाप्रमाणे त्यांचा स्वभाव आहे.
संतोष म्हणजे आनंदी, समाधानी प्रतिभावान, संयमी, कोमल वाणी, हसमुख, दयाळू , सेवाभावी, जनसेवा हीच ईश्वर सेवा हेच त्यांचं ध्येय. अभ्यासू वृत्ती असलेले संतोष हुशे सरांच शिक्षण . .( ), .., .. असून ते आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज गुलाम नबी आझाद बार्शीटाकडी जिल्हा अकोला येथे इंग्रजीचे हेड ऑफ डिपार्टमेंट म्हणून गेली ३० वर्ष कार्यरत आहेत तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ येथे पी.एच. डी. चे गाईड व राजस्थान मधील सिंघानिया युनिव्हर्सिटी, जे. जे. टी आय युनिव्हर्सिटीचे देखील पी. एच. डी. गाईड म्हणून कार्यरत आहेत. अशा सहा विद्यापीठात पी. एच. डी. चे मार्गदर्शक म्हणून प्राध्यापक हुशे सर काम करत आहेत. ते एक उत्तम लेखक आहेत.

या पुस्तकाचे लेखक आहेत. त्यांचे आज पर्यंत राज्य व राष्ट्रीय पातळीवर अनेक रिसर्च पेपर पब्लिश झालेले आहे. ग्राम प्रबोधिनी बहुउद्देशीय मंडळ कान्हेरी चे संस्थापक सचिव आहेत. अकोला येथील ज्योती नगर, जठार पेठ मंदिराचे फाउंडर प्रेसिडेंट आहेत. एक उत्तम यशस्वी सराफ व्यापारी आहेत. तसेच विविध संस्थेवर उत्तम मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थेत अडीअडचणीला आर्थिक सहकार्य करण्यास सर नेहमी अग्रेसर असतात. अकोला जिल्ह्यात माळी समाज संख्या मोठी आहे. माळी महासंघ ओबीसी संघटन कार्यात त्यांचा सक्रिय सहभाग आहे. सामाजिक संघटनेचे विविध पदे त्यांनी भूषविले आहे. राज्य पातळीवर विविध पुरस्कारांचे मानकरी आहेत.



फुले शाहू आंबेडकर स्मृती पुरस्कार २०२३ महाराष्ट्र, अस्मिता अवार्ड २०२५, बरेचसे पुरस्काराने ते सन्मानित आहेत. त्याचबरोबर शैक्षणिक क्रीडा सांस्कृतिक कार्यतही हुशे सर प्रथम हजर राहून उत्तम मार्गदर्शन व मदतीची भूमिका बजावतात. ते एक साहित्यिक देखील आहेत. अमरावती येथील साहित्य परिषदेचे कार्य त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालू असते. अकोला येथे अखिल भारतीय अंकुर साहित्य संमेलन परिषदेचे ते मुख्य आयोजक होते. समाजसेवेच्या कामात देखील हुशे सर प्रथम श्रेणीतच असतात. गोरेगाव बु. परिसरातील अनेक गावांना पाणीटंचाईमुळे गावातील नागरिकांना भटकंती करावी लागत होती. मुक्या प्राण्यांना पिण्यास पाणी मिळत नसल्याने त्यांचे हाल होत होते तेव्हा हुशे सरांनी पाच गावाला तुलंगा बु., नकासी, भरतपूर, वाडेगाव, आणि दिग्रस येथे दररोज टँकरद्वारे मोफत पाणीपुरवठा सुरू केला. तसेच सामाजिक कार्यक्रमा अंतर्गत प्राध्यापक डॉ. हुशे सरांनी सामूहिक विवाहाचे आयोजन केले. गरीब जोडप्यांना मदत करून स्मृतीचिन्ह देऊन त्यांना शुभकामना दिल्या. त्याचबरोबर हुशे सर गरिबा घरचं लग्न असो, अथवा श्रीमंताच्या घरचं. सर वधू-वरांना महात्मा ज्योतिबा फुलेंची प्रतिमा देऊन आशीर्वाद देतात. त्यांचं हे कार्य प्रत्येकाचं मन प्रसन्न करणार आहे.

आता मात्र सरांबद्दल आणखीन जाणून घेण्याची माझी उत्सुकता वाढली कारण समाज सेवेचं हे कार्य करत असताना सर नेहमी आनंदी व हसमुख दिसतात.

फुले शाहू आंबेडकरांच्या विचाराने प्रेरित हुशे सर, त्यांच्या विचारांचा प्रचार करणारे हुशे सर. निसंदेह त्यांच्या आईचे त्यांच्यावर संस्कार असणार म्हणून मी सरांच्या आई मातोश्री तुळजा आईची भेट घेतली. त्यांच्याशी सहज गप्पा मारत बसले तेव्हा त्यांच्या बोलण्यातून समजले ''लय मायाळू अन समजूतदार आहे बाई माया लेक'' हे ऐकल्यावर मी वहिनी साहेबांकडे वळली म्हणजे सौ. हेमा संतोष हुशे. आमच्या सहजच गप्पा. मी म्हटले सरांची ही समाजसेवा सरांचा व्यवसाय तुमची तर खूपच धावपळ होत असेल. ''हो आता याची सवय झाली मला. होते सर्व व्यवस्थित'' वहिनींच हे उत्तर. तरी मी थोडं हसून मजाक म्हणून विचारले. सर कधी चिडतात का? कधी रागावतात का? ''नाही कधीच नाही ते खूप समजदार आणि मजाकी स्वभावाचे आहे'' अस वहिनींच हसून उत्तर मिळालं सरांचा मुलगा आणि मुलगी उच्च शिक्षण घेत असून ते दोघेही हुशार आहे. आनंदी आणि सुखी समाधानी अस हुशे सरांच कुटुंब. सरांबद्दल सगळ्यांचे सकारात्मक विचार असल्याने माझी आणखी जाणून घेण्याची जिज्ञासा वाढली. सरांचे काही, माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी कडून समजले सर एक उत्तम शिक्षक तर आहे आणि आपल्या विद्यार्थ्यांनी भविष्यात काय कराव याचा मार्गदर्शन सर करतात. तसेच दुकानदार व्यापारी यांच्याशी सहज म्हणून बोलत गेले. हुशे सरांविषयी मत जाणून घेतले. सरांना सगळे माणसे समान आहे जातीभेद नाही. एका व्यापाऱ्याचे उत्तर आले. ''बहुत नेक बंदा है'' तर कोणाला लग्नाला आर्थिक मदत तर कोणाला शिक्षणाला आर्थिक मदत कित्येकांना रोजगार मिळून दिला.असे हे लोकप्रिय प्राध्यापक डॉ हुशे सर एक आदर्श मुलगा, समजदार पती, कर्तव्यदक्ष वडील, मार्गदर्शक शिक्षक. प्राध्यापक डॉ. हुशे सर भावी पिढीसाठी प्रेरणादायी आहे.

**असा हा गोरगरिबांचा दाता !!**
**रंजल्या गांजल्यांना देतो दिलासा!!**
**दिन दुबळ्यांच्या पाठीचा कणा!!**
**सगळ्या जनतेकडून वाढदिवसाच्या हार्दिक शुभकामना!!**

# अहान पांडेच्या 'सैयारा'चा बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ



'सैयारा' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला आहे. १८ जुलै २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित झालेल्या या चित्रपटाची सुरुवात चांगली झाली.पहिल्या दिवसाची कमाई आणि प्रेक्षकांच्या प्रतिसादावरून असे गृहीत धरले जात होते की हा चित्रपट चमत्कार करणार आहे आणि तेच घडत आहे.मोहित सुरी दिग्दर्शित या चित्रपटाने पहिल्या दिवशी २१.५ कोटींची कमाई केली. अवघ्या चार दिवसांत हा चित्रपट १०० कोटींचा चित्रपट बनला. या चित्रपटाने पहिल्या आठवड्यात बॉक्स ऑफिसवर १७२.७५ कोटींची कमाई केली. काल, शुक्रवारी, आठव्या दिवशी त्याची कमाई १८ कोटी होती. सॅकनिल्कच्या अहवालानुसार, शनिवारी (२६ जुलै) चित्रपटाने २६ कोटींची कमाई केली आहे.

पुन्हा एकदा आठवड्याच्या शेवटी प्रेक्षकांनी हा चित्रपट पाहण्यासाठी गर्दी केली आहे. भारतीय बॉक्स ऑफिसवर चित्रपटाचे एकूण कलेक्शन २१६.७५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे. चित्रपटाची लोकप्रियता केवळ देशातच नाही तर जगभरातही अबाधित आहे. जगभरातील कलेक्शनच्या बाबतीत हा या वर्षीचा दुसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट बनला आहे.

जगभरातील कमाईच्या बाबतीत फक्त विकी कौशलचा 'छावा' हा चित्रपट या शर्यतीत त्याच्या पुढे आहे. 'सैयारा' ने जगभरात २७७.८१ कोटी रुपयांचा व्यवसाय केला आहे. त्याच वेळी 'छावा'चे जगभरातील कलेक्शन ७९७.३४ कोटी रुपये आहे. 'सैयारा'ने या वर्षीच्या उर्वरित चित्रपटांना मागे टाकले आहे. 'सितारे जमीन पर', 'हाऊसफुल ५', 'रेड २' हे सर्व चित्रपट त्याच्या मागे आहेत.

'सैयारा' हा चित्रपट एक रोमँटिक संगीतमय प्रेमकथेवर आधारित आहे. यशराज फिल्म्सच्या बॅनरखाली बनवलेल्या या चित्रपटाद्वारे अहान पांडे आणि अनित पड्डा दोघांनीही अभिनयाच्या जगात प्रवेश केला आहे. दोघांनीही त्यांच्या पहिल्याच चित्रपटाने प्रेक्षकांवर जादू केली आहे. 'सैयारा' चित्रपटाचे बजेट सुमारे ५०-६० कोटी रुपये आहे.

# रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यासाठी पेरू फायदेशीर?



फळे आपल्या शरीराला अत्यंत आवश्यक असे पोषण प्रदान करतात. परंतु तज्ज्ञांच्या मते, फळांच्या पानांमध्येही अनेक पोषक घटक असतात. पेरूच्या पानांमध्ये रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करणारे जास्त पोषक घटक असतात. म्हणून आम्ही रक्तातील साखर नियंत्रणासाठी काय फायदेशीर आहे याबाबत तज्ज्ञांचा सल्ला घेतला. दिल्लीतील सी. के. बिर्ला हॉस्पिटलमधील अंतर्गत औषध विभागाचे प्रमुख सल्लागार डॉ. नरंदर सिंगला यांनी पेरू, पेरूपासून तयार केलेली चाट आणि पेरूच्या पानांचे रक्तातील साखरेवर होणारे परिणाम याबाबतची माहिती दिली.

पेरूचा ग्लायसेमिक इंडेक्स तुलनेने कमी असतो, ज्यामुळे मधुमेह असलेल्या लोकांसाठी तो एक चांगला पर्याय आहे.परंतु, अर्ध्याहून अधिक पिकलेले पेरू जास्त प्रमाणात खाल्ल्याने रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, असे डॉ. सिंगला म्हणाले.कमीत कमी साखर आणि मसाल्यांचा वापर करून बनवल्यास पेरू चाट हा एक आरोग्यदायी पर्याय ठरू शकतो. पेरूला जास्त मीठ, साखर किंवा मसाले लावून खाल्ल्याने त्याचे आरोग्यदायी फायदे कमी होऊ शकतात, असे डॉ. सिंगला म्हणाले.

**पेरूची पाने**

डॉ. सिंगला यांच्या मते, पेरूच्या पानांचा रक्तातील साखरेच्या पातळीवर सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. कारण- ते आतड्यांमध्ये शोषल्या जाणाऱ्या ग्लुकोजला रोखू शकतात आणि इन्सुलिन उत्पादनास उत्तेजन देऊ शकतात. ''तुम्ही पेरूच्या पानांचे सेवन चहा किंवा अर्काच्या स्वरूपात करू शकता.''प्राणी आणि मानवी अभ्यासात पेरूची पाने रक्तातील साखरेची पातळी कमी करतात, असे आढळून आले आहे.

इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते : पेरूची पाने इन्सुलिन संवेदनशीलता सुधारण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे टाईप २ मधुमेह होण्याचा धोका कमी होतो.

अँटिऑक्सिडंट गुणधर्म : पेरूची पाने अँटीऑक्सिडंट्सने समृद्ध असतात, जे ऑक्सिडेटिव्ह ताण आणि जळजळ होण्यापासून संरक्षण करण्यास मदत करतात.

# आपणचं तयार करा हे महाशब्दकोडे 114



## हे कोडे कसे सोडवाल

संकेतामध्ये काही शब्द दिलेले आहेत. हे शब्दव योग्यप्रकारे या चौकटीत लिहून हे महाशब्दकोडे आपणचं तयार करा. मदतीकरिता काही शब्द चौकटीत दिलेले आहे.

**संकेत शब्दः–**

**दोन अक्षरी**

- अधू
- एक्का
- कफ
- चरा
- जल
- डक
- दर
- भद्र
- भार
- भावी
- भंग
- भाक
- भारा
- भूप
- माग
- मार
- माशी
- मोक्ष
- रवि
- लेक
- वर
- शीण
- संघ
- स्तव

**तीन अक्षरी**

- अजिंक्य
- अष्टक
- अंगुर
- कचरा
- कपार
- काळीज
- खट्याळ
- खरारा
- गरज
- गारुडी
- चहाडी
- भडक
- दबाव
- पारद
- पालव
- प्रणय
- प्रवीण
- मुद्रक
- रामोशी
- लक्षण
- वलय
- हस्तक

**चार अक्षरी**

- आंदोलन
- एकलव्य
- जन्मभूमि
- परब्रह्म
- ब्रह्मगाठ
- ब्रह्मचर्य
- मिरपूड
- मुबलक
- लवलेश
- विमोचन
- संगणक

**पाच अक्षरी**

- आपलपोट्या
- जमीनदोस्त
- मीठ मोहऱ्या
- रजतवणी
- वशीकरण
- क्षणभंगुर

**सहा अक्षरी**

- चरण संपुष्ट
- जयजयकार

**अन्य**

- हऱ्या नाऱ्या जिंदाबाद

**मागील महाशब्दकोडेचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# महाशब्दकोडे 495



**आडवी विधानेः–** 1) ज्याच्या जवळचे सर्व पैसे संपलेले आहेत असा
3) यमाचे सेवक
6) दिवस
8) याठिकाणी
10) लोक
11) सोबत
12) फळातील रसाळ भाग
13) लग्नात लाह्या अर्पित करण्याचा एक विधी
15) मालगोदाम
17) ढगाप्राणे निळसर
18) समुद्र
20) विहिरीतून पाणी काढण्यासाठी असलेले चक्र
21) साखर घालून केलेला भात
24) एक संख्या
25) एक सम संख्या
27) न हलविता येणारी मालमत्ता
30) धोबी
31) व्यवस्था, रचना
33) दुर्दशा, हाल
34) विदर्भातील अमरावती येथील देवी
35) शत्रू, वैरी 36) आवाज
37) भाजणीच्या पीठाचा एक खमंग पदार्थ
39) आकाश व जमिनीचे मीलन
41) वडिलांचा भाऊ
42) दही करण्यासाठी दुधात घातलेला पदार्थ
44) फुरसत, फावला वेळ
45) बनावटी 47) प्रत्येक
49) श्यामल रंगाचा
51) याचना करणारा
53) अग्निदिव्य
54) सूट, सवलत
56) विडीचा झुरका
58) टोक, शेवट
59) एक विदेशी मद्य प्रकार
60) श्रीकृष्णाला मारण्यासाठी मायावी रूप घेऊन आलेला राक्षस
62) मुलगी
65) गमन करणे
67) घर, तीर्थक्षेत्र
68) सिनेमात दुष्ट प्रवृत्तीची भूमिका साकारणारा
71) ओझे, दडपण
72) रात्री फुलणारे एक फूलझाड
73) तलम व बारीक सुताचे कापड
74) हात व गुडघे टेकून पुढे जाणे

**उभी विधानेः–**1) असाध्य गोष्ट साध्य होण्याची संधी,
2) लेखणी
3) यज्ञकर्म करणारा
4) विचार करणारे इंद्रिय
5) पगार, स्वामित्व
6) गंध, राहणे
7) गुप्त गोष्ट
8) पावसावर आधारीत एका बालगीताची सुरुवात
9) चाळे,तऱ्हा
14) स्वीकृती, संमती
15) वेढा, फेरा
16) कितीही ताणला तरी पूर्वस्थितीत येणारा एक पदार्थ
17) नवरात्रीपूर्वी देवघरात मांडण्यात येणारे घट
19) वर गाडग्यांची माळ असलेले रहाटाचे मोठे चक्र
22) व्यय
23) स्वयंपाक करून खेळण्याचा लहान मुलींचा एक खेळ
26) रात्री फिरणारा
28) वधूपित्याने वरास दिलेली दक्षिणा
29) ध्वनी, आवाज
30) लहान गोष्टी मोठी करून सांगणे (वाक्प्रचार)
32) वस्तूमात्राचे नाव
34) केवळ एक
38) हिशोब करणारा
40) शीघ्रकोपी मनुष्य
41) मंदगती प्राणी
42) दसरा
43) पिता
46) सहज घडणारी गोष्ट
48) चापट व मऊ पदार्थाचा आघात
49) स्पष्टपणे, प्रत्यक्ष
50) धरणारा
52) चकाकी, उसण
53) मुख्य संपादकांचा मुख्य लेख
55) सारखे, समान
57) यज्ञात पूर्णाहुतीच्या वेळी अग्निकुंडात टाकण्यात येणारी तुपाची धार
61) सुंदर स्त्री 63) लेखणी
64) सततचा, ठाम
66) उपवास सोडणे, समाधान
69) घोड्याच्या टाचेला लावलेला अर्धचंद्राकार लोखंडी तुकडा
70) ओढा, झोंक
71) अंश, खंड (उत्तर पुढील अंकी)

**मागील महाशब्दकोड्याचे उत्तर**



Uday Munde - 8446302691

# राशी-भविष्य



**मेष :** मेष:- आज तुमच्या कामाच्या ठिकाणी कामाच्या बाबतीत वाद होऊ शकतो. नवीन लोकांसोबत काम करणे सोपे होईल.



**वृषभः** आज तुमचा व्यवसाय प्रवास फायदेशीर ठरण्याची शक्यता आहे. तुम्ही आव्हानांना दृढतेने तोंड द्याल आणि तुमच्या गोड बोलण्याने सर्वांचे मन जिंकाल.



**मिथून :** आज तुम्ही कठीण ध्येये सहजपणे साध्य कराल. तुम्हाला नवीन नोकरीची ऑफर मिळेल आणि परीक्षेत यश मिळेल. एखाद्या प्रिय व्यक्तीची भेट शक्य आहे.



**कर्क :** आज सावधगिरी बाळगा आणि जलद पैसे कमविण्यासाठी चुकीच्या योजनांमध्ये पैसे गुंतवणे टाळा. कर्ज देताना आणि घेताना काळजी घ्या. कामात तुम्हाला काही अडचणी येतील.



**सिंह :** आज तुम्हाला इच्छित काम मिळाल्याने आनंद होईल. नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून तुम्हाला चांगला नफा मिळेल.



**कन्या :** आज तुम्हाला हक्कांसाठी संघर्ष करावा लागेल, घरगुती समस्यांपासून मुक्तता मिळेल, स्पर्धात्मक परीक्षांमध्ये यश मिळेल.



**तुळ :** आज तुमची आर्थिक बाजू मजबूत असेल. प्रवासाची परिस्थिती आनंददायी आणि फायदेशीर असेल. संपत्ती आणि प्रतिष्ठा वाढेल.



**वृश्चिक :** आज तुम्ही आत्मविश्वासाच्या जोरावर स्वतःला सिद्ध करू शकाल. गरजेच्या वेळी तुमचे स्वतःचे लोक तुम्हाला मदत करतील.



**धनु :** आज तुमचे कौटुंबिक जीवन आनंदी असेल. तुमच्या मुलांमुळे तुम्ही काळजीत असाल. केलेले कष्ट सार्थकी लागतील.



**मकर :** आज तुम्हाला जुने कर्ज दूर होईल. नशिबावर अवलंबून राहू नका, कठोर परिश्रमावर लक्ष केंद्रित करा. तुम्हाला चांगल्या संधी मिळू शकतात.



**कुंभ :** आज तुम्हाला तुमच्या प्रिय व्यक्तीकडून भेटवस्तू मिळेल. शत्रू तुम्हाला त्रास देतील, तुम्हाला चांगले मित्र मिळतील. तुमच्या प्रिय व्यक्तीशी मन मोकळेपणाने बोला.



**मीन :** आज तुमचा अभिमान घरातील वस्तूंमध्ये वाढेल. संपत्ती आणि प्रसिद्धीमध्ये वाढ होईल. तुम्हाला एखाद्या खास व्यक्तीचा पाठिंबा मिळेल.

आचार्य पं. श्रीकांत पटैरिया: मो. ७८७९३७२९१३

## थोडक्यात

### 'एम्स नागपूर' चा इशारा

**नागपूर :** सर्वसामान्य जनतेने नोकरी भरतीबाबत सावध राहावे, असा इशारा 'एम्स नागपूर' ने दिला आहे अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (एम्स) नागपूर प्रशासनाने म्हटले आहे, की काही समाजकंटक तत्वांकडून सोशल मीडियावर विविध पदांसाठी बनावट भरती सूचना प्रसारित केल्या जात आहेत. मात्र, 'एम्स नागपूर' येथील सर्व भरती प्रक्रिया भारत सरकारच्या नियमांनुसार पार पाडली जाते. शिवाय रिक्तपदांबाबतची माहिती एम्स नागपूर / एम्स दिल्लीच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येते. अशा प्रकारची कुठलीही बनावट माहिती मिळाल्यास कृपया पोलिस किंवा 'एम्स नागपूर' प्रशासनासोबत ०७१०३-२९५५९० या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

### मोरभवनात चर्चासत्र उद्या

**नागपूर :** कामगार केसरी आर. एस. रुईकर इन्स्टिट्युट ऑफ लेबर अँड सोशिओ कल्चरल स्टडिज नागपूरच्या वतीने 'समाजवाद व धर्मनिरपेक्षता: भारतीय जनतेच्या आकांक्षापूर्तीचे सूत्र' या विषयावरील चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे हा कार्यक्रम २८ जुलै रोजी सायंकाळी साडेपाच वाजता मधुरम सभागृह, दुसरा माळा, हिंदी मोर भवन झाशी राणी चौक, सीताबर्डी आयोजित आहे. सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती विकास शिरपूरकर, डॉ. श्रीनिवास खांदेवाले, डॉ. तेजिंदरसिंग रावल, प्रा. डॉ. विद्या चोरपगार उपस्थित राहणार असल्याचे गौतम कांबळे यांनी कळविले आहे.

### हुक्का पार्लरवर छापे

**नागपूर:** 'ऑपरेशन थंडर'मोहिमेंतर्गत बेकायदेशीर दोन हुक्का पार्लरवर कारवाई करण्यात आली. ही कारवाई पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. गोकुळपेठ येथील 'शोषा'व सदर येथील 'द हब' या ठिकाणी छापे टाकून हुक्का साहित्य जप्त करण्यात आले. या दोन्ही ठिकाणी ग्राहकांना बंदी घातलेला हुक्का खुलेआम पुरवण्यात येत होता. याशिवाय 'द हब'मध्ये अनधिकृत बांधकामदेखील आढळून आले. पोलिसांनी दोन्ही ठिकाणे सील करून हुक्काचे संपूर्ण साहित्य ताब्यात घेतले. ग्राहकांची नोंद घेण्यात आली असून पुढील चौकशी सुरू आहे.

### १७ जुगारींवर गुन्हा दाखल

**नागपूर:** कपिलनगर पोलिसांनी सान्याल नगर येथील एका अपार्टमेंटमध्ये मोठ्या जुगार अड्ड्यावर छापा टाकून १७ जुगारांना अटक केली. कारवाईत रोख रक्कम, मोबाईल फोन, दुचाकी वाहने आणि जुगाराचे साहित्य असा एकूण ५ लाख ६ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कपिलनगर ठाण्यातील तपास पथकातील अधिकारी व अंमलदार २६ जुलै २०२५ रोजी रात्री नऊ वाजताच्या सुमारास गस्त घालत असताना जुगाराबाबत खात्रीशीर माहिती मिळाली. पोलिसांनी सापळा रचून पंचसमक्ष छापा टाकला १७ आरोपींना पैशांवर पत्ते खेळून जुगार खेळताना रंगेहाथ पकडण्यात आले यावेळी आरोपींच्या ताब्यातून रोख, १६ मोबाईल फोन, सहा दुचाकी वाहने, पत्ते आणि इतर जुगाराचे साहित्य असा मुद्देमाल जप्त केला.

# 'लूम अ‍ॅलर्ट' रोखणार महामार्गांवरील अपघात

## संमोहित होण्याचे प्रमाण आणणार शून्यावर, प्रकाशप्रारूपाची संकल्पना

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**'लूम अ‍ॅलर्ट' यंत्रणा दर १०० किमीवर महामार्गाच्या दोन्ही बाजूंना लावण्यात यावी, अशी संकल्पना संशोधकांनी मांडली आहे. वाहनचालकाला दीर्घकाळ एकाच प्रकारच्या दृश्यांमुळे येणारा कंटाळा आणि त्यामुळे निर्माण होणारी निद्रावस्था टाळण्यासाठी सदर तंत्रज्ञान मदत करते. या संकल्पनेला आंतरराष्ट्रीय पेटंट मिळाले आहे.**

**नागपूर, दि. २७ :** महाराष्ट्र समृद्धी महामार्गावर होणारे अपघात रोखण्यासाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या संशोधक चमूने 'लूम अ‍ॅलर्ट' यंत्रणा तयार केली आहे. 'एलईडी लाईट'चा वापर करून तयार करण्यात आलेल्या यंत्रणेच्या आधारे वाहनचालकांच्या संमोहनामुळे महामार्गावरील अपघातांना आळा घालता येईल, असा दावा संशोधकांनी केला आहे.

दूर अंतरापर्यंत कोणत्याही अडथळ्याविना वाहन चालविल्याने समृद्धी महामार्गावर वाहनचालकांमध्ये संमोहनस्थिती तयार होते. त्यामुळे अपघात झाल्याची उदाहरणे आहेत. विशेषत: रात्री संमोहनाचे प्रकार जास्त होत असल्याचे निदर्शनास आले. समृद्धी महामार्गावर वाहन चालविताना अनेक ठिकाणी ७५ ते १०० किमी अंतरापर्यंत रस्त्याच्या कडेला दिवे नाहीत. त्यामुळे वाहनाच्या दिव्याच्या प्रकाशाचाच वाहनचालकांना आधार असतो. अशा स्थितीत आजूबाजूला असलेले होर्डिंग, रस्त्याच्या मधोमध असलेल्या मोठ्या वस्तू दूरवरून दिसत नाहीत. वाहनचालकाला कोणताच अडथळा नसल्याने संमोहित होण्याचे प्रमाण अधिक असते आणि त्यातून अपघात होतात. रात्रीच्या प्रवासातील हा धोका लक्षात घेऊन राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठातील भौतिकशास्त्र विभागातील वरिष्ठ प्राध्यापक डॉ. संजय ढोबळे यांनी खुशबू सिंग आणि नमिका शेख या दोन विद्यार्थिनींसह 'लूम अ‍ॅलर्ट'या प्रकाशप्रारूपाची संकल्पना सादर केली आहे. प्रभारी कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. सुभाष कोंडावार, कुलसचिव डॉ. राजू हिवसे, वित्त व लेखा अधिकारी हरीश पालीवाल, भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ. ओमप्रकाश चिमणकर आदींनी संशोधकांचे अभिनंदन केले आहे.

### घातक शस्त्र बाळगणाऱ्यास अटक

**नागपूर, दि. २७ :**यशोधरानगर पोलिसांनी घातक शस्त्र बाळगणाऱ्या एकास अटक केली आहे. ही कारवाई आज पहाटे साडेबारानंतर करण्यात आली यशोधरानगर पोलिस तपास पथक हद्दीत पेट्रोलिंग करत असताना कांजी हाऊस चौक ते विटा भट्टी चौकदरम्यान एक इसम शस्त्रासह धुमाकूळ घालत असल्याची माहिती मिळाली यावरून घटनास्थळी पोहोचताच लोकांच्या जमावात खाली जमिनीवर एक इसम हातात शस्त्र घेऊन धमकावत असल्याचे काहींनी सांगितले नमूद इसमास ताब्यात घेऊन त्याचे नाव-पत्ता विचारले असता त्याने आपले नाव अक्षय मुरलीधर बावणे (वनदेवी नगर, नागपूर) असे सांगितले. आरोपी हा कोणता तरी दखलपात्र गुन्हा करण्याच्या उद्देशाने चाकू बाळगून धुमाकूळ घालताना आणि लोकांना धमकावताना मिळून आल्याने आरोपीविरुद्ध भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५, सहकलम महाराष्ट्र पोलिस कायदा कलम १३५ अन्वये गुन्हा दाखल करून आरोपीस अटक केली.

## योजनांची प्रलंबित कामे १५ दिवसांत व्हावीत

### पालकमंत्री बावनकुळेंचे अधिकाऱ्यांना निर्देश




**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २७ :** नागपूर जिल्ह्यातील जलजीवन मिशन अंतर्गत योजनांची प्रलंबित कामे १० ऑगस्ट २०२५ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अधिकाऱ्यांना दिले. जल जीवन अंतर्गत १ हजार ३०२ योजनांची सर्व कामे गुणवत्तापूर्णरित्या करावीत, असेही त्यांनी सांगितले.

नागपूर जिल्ह्यातील जल जीवन मिशनच्या प्रगतीचा आढावा बैठकीत त्यांनी उपरोक्त सूचना केल्या. वित्त व नियोजन राज्यमंत्री अड. आशिष जयस्वाल, खासदार श्यामकुमार बर्वे, आमदार विकास ठाकरे आणि संजय मेश्राम, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे आदी उपस्थित होते. मंत्री बावनकुळे यांनी जल जीवन मिशन अंतर्गत विविध योजनांची माहिती जाणून घेतली. अपूर्ण योजनांच्या खर्चाचा नव्याने आराखडा तयार करावा, निधी प्राप्त झाल्यावर पुन्हा खर्चाचा आराखडा तयार करून निविदा काढाव्यात. एका कंत्राटदाराला दोनपेक्षा जास्त कामे देता कामा नये, अशा सूचना मंत्र्यांनी केल्या

जलजीवन मिशन अंतर्गत जिल्ह्यातील एकूण १३ तालुक्यात समाविष्ट १ हजार ३०२ योजना व यातील योजनांची पूर्ण झालेली कामे, प्रगतीपथावर असलेल्या योजना तसेच ग्रामपंचायतींकडे हंस्तातरित करण्यात आलेल्या योजना, प्रलंबित असलेली नळ जोडणीची कामे आणि केंद्र व राज्य शासनाकडून जलजीवन मिशन अंतर्गत करावयाच्या कामांसाठी आवश्यक निधी आदींबाबत जिल्हा परिषदेच्या ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता अशोक धोंगे यांनी सादरीकरण केले.

जल पुनर्भरण कामे

मंत्र्यांनी पाणी टंचाई कृती आराखड्यातील आतापर्यंत हाती घेण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती जाणून घेतली. पाण्यांचे स्त्रोत कोरडे झालेल्या गावांत बंधारा बांधून पाणी अडवणे, जल पुनर्भरण कामे, १५ लाखांच्या मर्यादेतील कामे तातडीने करण्याचे निर्देश त्यांनी दिले. महावितरण कंपनीकडून पाणी पुरवठा योजनांसाठी आवश्यक वीज जोडणीच्या प्रलंबित प्रकरणांचा आढावा यावेळी घेण्यात आला. महावितरणकडून शहरी आणि ग्रामीण भागात उभारावयाची अतिरिक्त रोहित्रे, वीज वितरणाबाबत करावयाचे व्यवस्थापन आदींविषयी यंत्रणांना सूचना केल्या. तसेच, गावोगावी जनतेशी संवाद साधून त्यांच्या समस्या समजून घेण्यासाठी नियोजन करून काटेकोर अंमलबजावणी करावी.

**CAPTION** काम सुरू आहे......



**नागपूर :** मागील काही दिवसांपासून मानेवाडा ते बेसा रस्त्याचे काम सुरू आहे. सध्या कुठे गायी बसलेल्या असताना काही ठिकाणी बारीक गिट्टी पसरलेली तर, कुठे खड्डे पडले आहेत लोकंही म्हणतात, काम सुरू आहे... एक दिवस तर ते पूर्ण होईलच, या आशावर सर्वांचे आयुष्य धावत आहे.

## सरकारी यंत्रणा कामांत अडथळे निर्माण करतात

### नितीन गडकरींची अधिकाऱ्यांवर नाराजी

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**



**नागपूर, दि. २७ :** सरकारी यंत्रणा फक्त चालत्या गाडीला पंक्चर करण्याचे काम करते. मला नागपुरात ३०० स्टेडियम बांधायचे आहेत. सरकारी प्रक्रिया आणि व्यवस्था यात अडथळे निर्माण करीत आहे, अशी स्पष्ट नाराजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केली.

विदर्भ अडव्हेंचर असोसिएशन नागपूरतर्फे रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात एका कार्यक्रमात ते बोलत होते. सरकारी अनास्थेबद्दल केंद्रीय मंत्री गडकरी यांनी सरकारी यंत्रणा कामांबद्दल कशा निष्क्रिय आहेत. यावर बोट ठेवत राज्य आणि केंद्र सरकारमधील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांवर जोरदार टीका केली. चांगले दिवस सुरू असल्यास लोक तोंडावर प्रशंसा करतात. मात्र, हे दिवस निघून गेल्यावर अडचणीच्या काळात कुणी विचारत नाही. त्यामुळे क्रीडा क्षेत्रात मेहनत घेऊन प्रत्येकाने चांगले करिअर घडवायला हवे. मी पाच लाख कोटी रुपयांपर्यंतचे रस्ते,पुलाचे काम हातात पैसे नसतानाही करतो, असेही नितीन गडकरी म्हणाले.

### कोराडी परिसरातून महिला बेपत्ता

**कोराडी, दि. २७ :** कोराडी पोलिस ठाण्याच्या हद्दीतून भारती जीवन मोरे (वय ४८) आपल्या घरातून बेपत्ता झाल्या आहेमाहितीनुसार, भारती मोरे २३ जुलै २०२५ रोजी दुपारी दोन वाजता कुणाला काहीही न सांगता निघून गेल्या आहेत. त्यांचा शरीर रंग सावळा असून, चेहरा गोल आहे. बांधा मजबूत, तर उंची अंदाजे ५ फूट आहे. त्या घरातून निघताना हिरव्या रंगाची ठिपके असलेली साडी आणि ब्लाऊज परिधान केलेला होता. भारतीबाईंना मानसिक आजार असून त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. त्यांच्या कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला आहे; परंतु त्या आढळून आलेल्या नाहीत. त्यांच्याबद्दल कुणाला माहिती मिळाल्यास वा त्या दिसून आल्यास कृपया तत्काळ कोराडी पोलिसांसोबत संपर्क साधावा.

## सण-उत्सवांच्या काळात कायदा-सुव्यवस्था राखा

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २७ :** पुढील दिवसांतील सण, उत्सव व यात्राप्रसंगी कायदा-सुव्यवस्था व शांतता कायम राखण्यासाठी शहर व ग्रामीण पोलिस यंत्रणांनी सज्ज राहावे, अशा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिल्या.

शहर व ग्रामीण पोलिस विभागाची आगामी सण उत्सव व यात्रांच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठकीत ते बोलत होते पोलिस आयुक्त डॉ. रविंद्र सिंगल, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, अपर पोलिस आयुक्त सर्वश्री वसंत परदेशी, शिवाजी राठोड, राजेंद्र दाभाडे, पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. नागपंचमी उत्सव, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, स्वातंत्र्य दिन, कृष्ण जन्माष्टमी, दहीहंडी उत्सव, बैलपोळा, तान्हापोळा, मारबत मिरवणूक उत्सव, गणेशोत्सव आदी सण शांततेत पार पाडण्यासाठी पोलिस उपायुक्तांनी परिमंडळानुसार शांतता समितीच्या बैठका आयोजित कराव्यात. शहर पोलिसांना आवश्यक साधन सुविधा उपलब्ध करून देण्यात येईल. ग्रामीण पोलिस अधीक्षक कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत विशेष पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील, पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार, पोलिस उपायुक्त सर्वश्री अनिल म्हस्कर, दीपक अग्रवाल, वृष्टी जैन, विजय माहुलकर यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. ग्रामीण भागात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नियोजनाची माहिती हर्ष पोद्दार यांनी दिली. विभागाकडून राबविण्यात येत असलेला 'झिरो फॅटॅलिटी प्रोग्राम' आणि याअंतर्गत माहिती विश्लेषणासह गुन्हे तपासात आलेली सुकरता, एआयचा प्रभावी उपयोग आदींची माहितीही त्यांनी दिली.

### तीन लाखांची घरफोडी

**नागपूर, दि. २७ :** मानकापूर ठाण्याच्या हद्दीत घरफोडीची घटना उघडकीस आली आहे. फिर्यादीच्या घरातून सोन्या-चांदीचे दागिने आणि दुचाकी असा एकूण ३ लाख ११ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल लंपास केला आहे. फिर्यादी आशीष राजाभाऊ सवाशेरे माँ बंबलेश्वरी सोसायटीतील घराला कुलूप बंद करून २२ ते २५ जुलैदरम्यान परिवारासह रायपूर येथे गेले होते. या कालावधीत चोरट्याने त्यांच्या घराचे मुख्य दाराचे कुलूप व कडीकोयंडा तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर बेडरूममधील कपाटातील सोन्या-चांदीचे दागिने आणि दुचाकी असा एकूण ३,११,६०० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला. तक्रारीवरून पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहिता (भा.न्या.सं.) कलम ३८० (चोरी), ४५४ (घरफोडीसाठी तयारी), ४५७ (रात्रीची घरफोडी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

## सलाईमेंढा तलावात बुडून २० वर्षीय तरुणाचा मृत्यू

### चार तासांच्या शोधमोहिमेनंतर मृतदेह आढळला

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २७ :** नागपूर जिल्ह्यातील हिंगणा तालुक्यातील सलाईमेंढा तलाव परिसरात फिरावयास गेलेल्या पाच मित्रांपैकी एकाचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. ही दुर्घटना शनिवारी सकाळी घडली पीयूष सूरज सुखदेवे (२० वर्षे भिलगाव ता. कामठी) असे मृतकाचे नाव आहे. या घटनेमुळे सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे

माहितीनुसार, पीयूषसह मृणाल विमेश उके (२०), हर्ष सिद्धार्थ थुलकर (१९) दोघेही रा. कपिलनगर, करण लक्ष्मण चौधरी (१८ बाराखोली, जरीपटका) आणि क्रिश प्रकाश स्वामी (१९ मोतीबाग रेल्वे क्वार्टर) असे पाच मित्र शनिवारी सकाळी ९.३० च्या सुमारास सलाईमेंढा तलावाजवळ पोहोचले काही वेळ घालविल्यानंतर ते अंघोळीसाठी पाण्यात उतरले. यावेळी पाण्याच्या खोलीचा अंदाज न आल्याने पीयूष आणि त्याचा एक मित्र खोल पाण्यात बुडू लागले. यातील एकाला पोहता येत असल्याने त्याने इतर दोघांना पाण्यातून बाहेर काढले. पीयूष मात्र खोल पाण्यात दिसेनासा झाला. घाबरलेल्या मित्रांनी तत्काळ हिंगणा पोलिसांना घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. स्थानिक पोहणाऱ्यांच्या मदतीने शोधमोहीम सुरू केली. मात्र, कोसळणारा पाऊस आणि पाण्याची खोली यामुळे अडचणी आल्या. वानाडोंगरी व नागपूर महानगरपालिकेच्या अग्निशमन दलाचे पथक व पाच प्रशिक्षित पोहणारे घटनास्थळी दाखल झाले. बोटीच्या साहाय्याने सुमारे तीन ते चार तासांच्या प्रयत्नानंतर दुपारी तीनच्या सुमारास पीयूषचा मृतदेह तलावातून बाहेर काढण्यात आला. हसता खेळता मित्र असा अचानक जगातून निघून गेल्याने मित्रांना मोठा धक्का बसला आहे दरम्यान, तलावाभोवती सुरक्षा उपाययोजना नसल्याबद्दल स्थानिक नागरिकांनी प्रशासनावर नाराजी व्यक्त केली आहे.

## महावितरणचा 'बिझनेस टायटन्स' पुरस्काराने सन्मान

### 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेत उत्कृष्ट कामगिरी; महावितरणच्या कार्याचा देशपातळीवर गौरव

**दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी**

**नागपूर, दि. २७ : 'प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणला 'रेडिओ सिटी बिझनेस टायटन्स अवॉर्ड'ने सन्मानित करण्यात आले आहे. ज्येष्ठ अभिनेते बोमन इराणी यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. या राष्ट्रीय कामगिरीबद्दल अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.**



### महाराष्ट्राची उल्लेखनीय कामगिरी

**या योजनेत महाराष्ट्राने देशात दुसरा क्रमांक पटकावला आहे. राज्यात आतापर्यंत २ लाख ४२ हजार ७१४ घरगुती ग्राहकांच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प कार्यान्वित झाले असून, त्यांची एकूण क्षमता ९१९ मेगावॅट आहे. या योजनेत सहभागी झालेल्या पात्र ग्राहकांना आतापर्यंत तब्बल १६८५ कोटी ४२ लाख रुपयांचे अनुदान वितरित करण्यात आले आहे. याच उल्लेखनीय राष्ट्रीय कामगिरीची दखल घेत महावितरणचा गौरव झाला.**

'विकसित भारत'चे उद्दिष्ट आणि भविष्यातील भक्कम अर्थव्यवस्थेला चालना देणाऱ्या सुमारे १५० खासगी व सार्वजनिक कंपन्यांच्या प्रतिनिधींसाठी आयोजित परिषदेत हा पुरस्कार सोहळा पार पडला. घरगुती वीजग्राहकांना सुमारे २५ वर्षे मोफत वीज उपलब्ध करून देणाऱ्या 'प्रधानमंत्री सूर्यघर' योजनेच्या अंमलबजावणीत महावितरणने देशात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केलेल्या या योजनेची प्रभावी अंमलबजावणी राज्याचे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस आणि ऊर्जा राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनात, तसेच अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व महावितरणचे अध्यक्ष लोकेश चंद्र यांच्या नेतृत्वात सुरू आहे. महावितरणच्या वतीने संचालक (मानव संसाधन) राजेंद्र पवार आणि विशेष कार्य अधिकारी मंगेश कोहाट यांनी हा पुरस्कार स्वीकारला. सुमारे ७५ हजार कोटी रुपयांच्या या देशव्यापी योजनेतून निवासी कुटुंबांना स्वतःची वीज निर्मिती करण्यासाठी सक्षम केले जात आहे.

## थायलंड टूरच्या आमिषाने फसवणूक

### सव्वासहा लाखांनी घातला गंडा

**नागपूर, दि. २७ :** थायलंड येथे धम्म साधना प्रशिक्षण शिबिराला नेण्याच्या बहाण्याने एका ठकाने सव्वासहा लाखाने अनेक नागरिकांची फसवणूक केल्याची माहिती समोर आली. कमल लक्ष्मीकांत पाटील (जरीपटका) यांनी दिलेल्या तक्रारीवरून पाचपावली पोलिसांनी सुजित शेषराव चव्हाण याच्याविरुद्ध फसवणुकीसह विविध कलमांसह गुन्हे दाखल केले आहेत.

माहितीनुसार, सुजित शेषराव चव्हाण याने परिसरातील नागरिकांना थायलंड देशात १२ एप्रिल ते १२ मे दरम्यान धम्म साधना प्रशिक्षण शिबिराचे आयोजित असल्याची बतावणी केली होती त्यासाठी प्रत्येक ३५ हजार रुपये तिकीट तर फिरण्याकरिता १५ हजार रुपये लागतील असे सांगितले. त्यावरून कमल पाटील यांनी ३५ हजार रुपये दिले. परिसरातील आणि शहरातील इतर भागातील नागरिकांनीही त्याला पैसे दिले. यावेळी त्याने तिकीट सर्वांच्या मेलवर ऑनलाईन येईल, अशी थाप मारली मात्र, मुदत उलटूनही कुणालाच तिकीट आले नाही. यानंतर आरोपी 'मोबाईल स्वीच ऑफ' करून परिसरातील कार्यालय कुलूपबंद करून पसार झाला. याप्रकरणी फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पाटील यांनी पाचपावली पोलिसात तक्रार दाखल केली असून, गुन्हा दाखल करत याचा शोध घेत आहेत.

# ग्रीन-इंग्लिशच्या बळावर ऑस्ट्रेलियाने मारला विजयाचा चौकार!

नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी

ऑस्ट्रेलियाचा संघ सध्या वेस्ट इंडीज दौऱ्यावर आहे, यामध्ये ऑस्ट्रेलियाच्या संघाने आतापर्यंत झालेल्या मालिकेमध्ये त्याचबरोबर झालेल्या सामन्यामध्ये कमालीची कामगिरी केली आहे. २७ जुलै रोजी झालेल्या चौथ्या टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामन्यात ऑस्ट्रेलियाने वेस्ट इंडिजचा तीन विकेट्सने पराभव केला आणि कॅमेरॉन ग्रीन आणि जोश इंगलिस यांच्या अर्धशतकांच्या जोरावर पाच सामन्यांच्या मालिकेत ४-० अशी आघाडी घेतली. आता शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया यजमानांना व्हाईटवॉश करण्यासाठी उत्सुक असेल, तर वेस्ट इंडिजला शेवटचा सामना जिंकून आपला सन्मान




## वेस्ट इंडिजला लाज वाचवण्याची शेवटची संधी

वाचवण्याची संधी असेल. वेस्ट इंडिजने दिलेल्या २०६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना, ग्रीनने खेळी खेळली त्याने या सामन्यात नाबाद ३५ चेंडूमध्ये ५५ धावा केल्या होत्या, यामध्ये त्याने तीन षटकार, तीन चौकार मारेल. जोश इंगलिस याने संघासाठी ५१ धावा केल्या,त्याने ५१ धावांची खेळी ३० चेंडूमध्ये पुर्ण केली, यात त्याने १० चौकार, एक षटकार मारले.

ग्रीनने एरॉन हार्डी (२३) सोबत सहाव्या विकेटसाठी ५१ धावांची भागीदारी करून ऑस्ट्रेलियाचा विजय निश्चित केला. ऑस्ट्रेलियाकडून गोलंदाजी करताना ॲडम झम्पाने सर्वाधिक ३ विकेट घेतल्या. यानंतर, ऑस्ट्रेलियाने १९.२ षटकांत ७ गडी गमावून हा सामना जिंकला. ऑस्ट्रेलियाकडून फलंदाजी करताना कॅमेरॉन ग्रीनने सर्वाधिक ५५ धावांची खेळी केली. याशिवाय जोश इंगलिसने ५१ धावा केल्या.

यांच्या खेळीमुळे ऑस्ट्रेलियाने १९.२ षटकांत सात विकेट्सच्या मोबदल्यात २०६ धावा करून विजय मिळवला. वेस्ट इंडिजकडून जेडिया ब्लेड्सने २९ धावांत तीन विकेट्स घेतल्या.वेस्ट इंडिजने यापूर्वी नऊ विकेट गमावून २०५ धावा केल्या होत्या परंतु त्यांच्या संघातील कोणताही फलंदाज मोठी खेळी करू शकला नाही. यजमान संघाच्या चार फलंदाजांनी २० धावांचा टप्पा ओलांडला ज्यामध्ये शेरफेन रुदरफोर्डने ३१ धावा करून संघाची सर्वाधिक धावा काढली. ऑस्ट्रेलियाकडून ॲरॉन हार्डी, झेवियर बार्टलेट आणि शॉन ॲबॉट यांनी प्रत्येकी दोन तर ॲडम झम्पाने तीन विकेट घेतल्या.लक्ष्याचा पाठलाग करताना, ऑस्ट्रेलियाने डावाच्या दुसऱ्याच चेंडूवर मिचेल मार्श (००) गमावला कारण तो ब्लेड्सच्या गोलंदाजीवर पायचीत झाला. त्यानंतर इंग्लिसने सलामीवीर ग्लेन मॅक्सवेल (४७) सोबत दुसऱ्या विकेटसाठी ६६ आणि ग्रीन सोबत तिसऱ्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी करत ऑस्ट्रेलियाच्या विजयाचा पाया रचला.

# शुभमन गिलचे सर्वात खास शतक



नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी

मँचेस्टर कसोटीत टीम इंडियाचा तारणहार ठरलेल्या शुबमन गिलने महत्त्वपूर्ण खेळी करत आपलं शतक झळकावलं आहे. इंग्लंडच्या तिखट माऱ्यापुढे मैदानात पाय रोवून घट्ट उभं राहत गिलने भारताचा डाव सावरला आणि शतकही झळकावलं. राहुलच्या साथीने १८० अधिक धावांची भागीदारी रचत गिलने भारताला ०-२ पासून ते २०० अधिक धावांचा पल्ला गाठून दिला.
इंग्लंडविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत, भारतीय क्रिकेट संघाचा युवा कर्णधार शुबमन गिलची बॅट चांगलीच तळपत आहे. मँचेस्टर कसोटीच्या दुसऱ्या डावात शानदार शतक झळकावून, गिलने केवळ आपल्या संघाला मजबूत स्थितीत आणले नाही तर एक ऐतिहासिक विक्रमही आपल्या नावावर केला. गिलने सुनील गावस्कर, डॉन ब्रॅडमन आणि विराट कोहलीनंतर एका कसोटीत अनोखी कामगिरी करणारा फलंदाज ठरला आहे.
मँचेस्टर कसोटीत, दुसऱ्या डावात भारतीय संघ मोठ्या अडचणीत होता. इंग्लंडच्या गोलंदाजांनी सुरुवातीला धक्के देऊन भारतावर दबाव आणला. पण कर्णधार शुबमन गिलने संयम राखला आणि दमदार कामगिरी केली. गिलने आपला डाव सावधगिरीने सुरू केला आणि नंतर आक्रमक फटके खेळत खेळी साकारली. कव्हर ड्राइव्ह, लोफ्टेड शॉट्स आणि बॅकफूट पंच यांसारखे फटके खेळत त्याने इंग्लंडच्या गोलंदाजांनी उत्तर दिलं. गिलने २२८ चेंडूत शतकी खेळी केली.शुबमन गिल हा एका कसोटी मालिकेत ४ शतकं झळकावणारा भारताचा तिसरा फलंदाज ठरला आहे. त्याच्या आधी सुनील गावस्कर (दोनदा), विराट कोहली यांनीच हा पराक्रम केला होता. याशिवाय एका कसोटी मालिकेत सर्वाधिक शतकं करणारा गिल हा सुनील गावस्कर आणि डॉन ब्रॅडमन यांच्यानंतर तिसरा कर्णधार ठरला आहे.
शुबमन गिलने इंग्लंडविरूद्ध मालिकेत ७०० धावांचा टप्पा पार केला आहे. शुबमन गिल इंग्लंडमध्ये कसोटीत ७०० अधिक धावा करणारा आशियातील पहिला फलंदाज ठरला.

## भारताकडून एका कसोटी मालिकेत सर्वाधिक शतके करणारे फलंदाज

४ शतकं सुनील गावस्कर वि. वेस्ट इंडिज, १९७१ (विदेशात), ४ शतकं सुनील गावस्कर वि. वेस्ट इंडिज, १९७८/७९ (घरच्या मैदानावर ), ४ शतकं विराट कोहली वि. ऑस्ट्रेलिया, २०१४/१५ (घरच्या मैदानावर), ४ शतकं शुबमन गिल वि. इंग्लंड, २०२५ (विदेशात)

# ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्सविरूद्ध शिखर धवनची ९१ धावांची वादळी खेळी



नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी

वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स २०२५ मध्ये, इंडिया चॅम्पियन्स संघाचा सामना ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्स संघाविरूद्ध खेळवला जात आहे. या सामन्यात भारताने २० षटकांत २०३ धावांचा डोंगर उभारला आहे. ज्यामध्ये संघाने फक्त ७.४ षटकांत १०० धावा चोपल्या आहेत. भारताचा स्टार फलंदाज शिखर धवन आणि अष्टपैलू युसूफ पठाण यांनी वादळी खेळी केल्या. धवनने ९१ धावांची खेळी करत जुन्या गब्बरची झलक दाखवून दिली आहे.
वर्ल्ड चॅम्पियनशिप ऑफ लिजेंड्स ( २०२५) मध्ये इंडिया चॅम्पियन्सचा सामना ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्सशी होत आहे. हा सामना इंडिया चॅम्पियन्ससाठी करा किंवा मरो असा आहे. या महत्त्वाच्या सामन्यात ऑस्ट्रेलिया चॅम्पियन्सने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. तर भारताने प्रथम फलंदाजी करताना शानदार फटकेबाजी केली. भारताचा माजी सलामीवीर राहिलेल्या शिखर धवनने या सामन्यात ६० चेंडूत १२ चौकार आणि एका षटकारासह ९१ धावा केल्या. त्याने फक्त चौकारांच्या मदतीने ५४ धावा केल्या. धवनने युसूफ पठाणसह ४६ चेंडूत १०० धावांची भागीदारी केली आणि भारताला २०३ धावांचा टप्पा गाठून दिला. या सामन्यात गब्बर त्याच्या जुन्या लयीत दिसला. उथप्पा आणि धवन यांच्यात पहिल्या विकेटसाठी ५७ धावांची भागीदारी झाली. ३७ धावा काढल्यानंतर उथप्पा बाद झाला. उथप्पा बाद झाल्यानंतर भारताचे तीन विकेट झटपट गमावले. रायुडू आपले खाते उघडू शकला नाही आणि रैना ११ धावा काढल्यानंतर बाद झाला तर कर्णधार युवराज सिंग ३ धावा काढल्यानंतर बाद झाला.

## २१ चेंडूत युसूफ पठाणने झळकावले अर्धशतक

६० चेंडूत ९१ धावा करत धवन बाद झाल्याने त्याचं शतक हुकलं. दुसऱ्या टोकाला पठाणने २३ चेंडूत ५२ धावांची नाबाद खेळी केली. पठाणने २१ चेंडूत ३ चौकार आणि ४ षटकारांसह अर्धशतक केलं. ब्रेट लीने ४ षटकांत सर्वाधिक ५७ धावा दिल्या. कुल्टर-नाईलने ४९ धावा दिल्या.

# चहलच्या वाढदिवशी लंडनच्या रस्त्यावर बॉलीवूड गाण्यावर ग्रुप डान्स

नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी



युझवेंद्र चहलने २३ जुलै रोजी त्याचा ३५ वा वाढदिवस साजरा केला. त्याला सोशल मीडियावर चाहत्यांकडून आणि त्याच्या मित्र परिवाराने भरभरून शुभेच्छा दिल्या. पण याशिवाय चहलला त्याच्या वाढदिवशी एक स्वप्नवत सरप्राईज मिळालं. ज्याचा व्हीडिओ त्याने सोशल मीडियावर शेअर करत गेल्या ३ दशकांतील माझ्या वाढदिवसाचं पहिलं सरप्राईज असल्याचं त्याने म्हटलं आहे. आरजे महावशने त्याला हे सरप्राईज दिल्याची चर्चाही रंगली आहे.
युझवेंद्र चहल सध्या लंडनमध्ये असून तो काऊंटी क्रिकेट खेळत आहे. नॉर्थम्पटनशायर संघाकडून खेळत असल्याने त्याने लंडनमध्ये आपला वाढदिवस साजरा केला. त्याच्या या वाढदिवशी त्याला मिळालेल्या छान सरप्राईजने तो भावुक झाला होता. लंडनच्या रस्त्यावर चहल त्याच्या मित्राबरोबर उभा होता आणि तितक्यात एका मुलीने त्याला हात धरून पुढे आणलं. तिने चहलच्या हातात गुलाब देत त्याला उभं केलं. तितक्यात डान्सरच्या एका ग्रुपने बॉलीवूड गाण्यावर डान्स करायला सुरूवात केली. चहल हे पाहून एकदम चकित झाला. यानंतर डान्स करताना त्या ग्रुपने त्याला मध्ये बोलावत त्याच्याभोवती गोल करत डान्स करायला सुरूवात केली आणि चहलला चियर करत डान्स करायला लावलं. चहल त्या ग्रुपचा डान्स बघून व्हीडिओमध्ये भावूक झाल्याचही पाहायला मिळत आहे. दरम्यान त्या डान्स करणाऱ्या ग्रुपने पांढऱ्या रंगाचं टी-शर्ट घातलं होतं. त्या टीशर्टवर मागे हॅपी बर्थडे शब्दाचं प्रत्येक अक्षर इंग्रजीत लिहिलेलं आहे. याशिवाय डान्सनंतर या ग्रुपने चहलबरोबर फोटोही काढला.चहलने या व्हीडिओच्या कॅप्शनमध्ये लिहिलं, ''आम्हा मुलांचं संपूर्ण आयुष्य वाढदिवस साजरा न करताच कधी कधी निघून जातं. गेल्या ३ दशकांतील हे माझं पहिलं बर्थडे सरप्राईज आहे आणि जे भन्नाट आहे. सगळं घडत असताना जणू जगच फिरतंय असं वाटत होतं! सुन्न झालो होतो, भारावलो होतो पण खूप आभार. आपल्या चेहऱ्यावर हसू यावं यासाठी प्रयत्न करणारे मित्र सर्वांना भेटू दे. हे असं काही खरंच घडलंय हे मी अजूनही पचवायचा प्रयत्न करतोय!''चहलची कथित गर्लफ्रेंड आरजे महावश हिने चहलसाठी हे बर्थडे सरप्राईज केल्याचं चाहते म्हणत आहेत. आरजे महावशदेखील सध्या लंडनमध्ये आहे. याशिवाय चहलच्या वाढदिवसाच्या पार्टीला देखील ती उपस्थित होती. त्याच्या वाढदिवसानिमित्त आरजे महावशने कोणीही न पाहिलेला खास फोटो शेअर करत त्याला शुभेच्छा दिल्या होत्या.

# शुभमन गिलनंतर संजय मांजरेकर यांची गौतम गंभीरवर टीका

## इंग्लंडविरोधी कसोटी सामन्याबाबत केले भाष्य

नवी दिल्ली, दि. २७ प्रतिनिधी

भारत विरुद्ध इंग्लंड दरम्यान मँचेस्टर येथे होत असलेल्या चौथ्या कसोटी सामन्यात भारताला सामना वाचविण्यासाठी बरीच मेहनत घ्यावी लागणार आहे. चौथ्या दिवसाअखेर कर्णधार शुबमन गिल आणि केएल राहूलच्या चिवट फलंदाजीमुळे भारताने दुसऱ्या इनिंगमध्ये दोन बाद १७४ धावा रचल्या. भारतीय संघ अजूनही १३७ धावांनी पिछाडीवर आहे. त्यामुळे पाचवा आणि अखेरचा दिवस महत्त्वाचा ठरणार आहे. इंग्लंडने पहिल्या डावात खेळताना ६६९ धावांचा डोंगर उभा केला होता. यावेळी भारताच्या गोलंदाजांना प्रभावी कामगिरी करता आली नाही. यावरून आता भारताचा माजी खेळाडू आणि समालोचक संजय मांजरेकर यांनी मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरवर टीका केली आहे.
इंग्लंडविरुद्ध कसोटी मालिकेत संघाची निवड करत असताना जे निर्णय घेतले गेलेत, त्यावरून संजय मांजरेकर यांनी गौतम गंभीरच्या नेतृत्वावर प्रश्नचिन्ह उभे केले आहे. तीन सामन्यात भारत १-२ ने पिछाडीवर आहे. मँचेस्टरमधील चौथा सामनाही भारत गमावण्याच्या मार्गावर आहे. जर या सामन्यात भारतीय संघाचा पराभव झाला तर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीरच्या नेतृत्वाखालील ही सलग तिसरी कसोटी मालिका भारतीय संघ गमावेल. यापूर्वी न्यूझीलंडविरुद्ध ०-३ आणि ऑस्ट्रेलियाविरुद्ध १-३ असा लाजिरवाणा पराभव संघाला स्वीकारावा लागला आहे.संजय मांजरेकर यांनी शी बोलताना गौतम गंभीर यांच्यावर टीका केली आहे. संघात अष्टपैलू खेळाडू निवडण्याच्या हट्टामुळे संघाचे संतुलन बिघडल्याची मांजरेकर म्हणाले.
संजय मांजरेकर म्हणाले की, गौतम गंभीरने चौथा गोलंदाजाला फारशी गोलंदाजी करण्याची संधीच दिली नाही. यासाठी त्यांनी शार्दूल ठाकूरचे उदाहरण दिले. पहिल्या दोन कसोटीत शार्दूल ठाकूरला फक्त २७ षटक टाकण्यास दिले. त्यातही त्याला पुरेशा विकेट्स मिळालेल्या नाहीत. नितीश रेड्डीनेही दुखापतग्रस्त होण्यापूर्वी केवळ २७ षटके टाकली होती.
तसेच भारताचा फिरकीपटू कुलदीप यादवला संघात न घेतल्याबद्दलही संजय मांजरेकर यांनी नाराजी व्यक्त केली. मांजरेकर म्हणाले की, संघ व्यवस्थापन पत्रकार परिषदेत सातत्याने कसोटी सामन्यात वीस बळी घेण्याबद्दल भाष्य करते. पण त्यांनी कुलदीप यादवला मालिकेत खेळवण्यास नकार दिला. न्यूझीलंडविरुद्ध कुलदीप यादवने शेवटचा सामना खेळला होता. वॉशिंग्टन सुंदरला प्राधान्य दिल्यामुळे यादव बाजूला सारला गेला.

## शुभमन गिलवरही केली होती टीका

संजय मांजरेकर यांनी याआधी कर्णधार शुबमन गिललाही लक्ष्य केले होते. गिल मैदानावरचे निर्णय एकटाच घेत असून तो वरिष्ठ खेळाडूंचा विचार घेत नसल्याचा आरोप मांजरेकर यांनी केला होता. मँचेस्टरमध्ये इंग्लंडची फलंदाजी जोमात असताना गिलने वॉशिंग्टन सुंदरला खूप उशीरा चेंडू दिला. त्याने लॉर्ड्समध्ये खरंतर चांगली गोलंदाजी केली होती. पण मँचेस्टरमध्ये ६८ व्या षटकापर्यंत त्याला गोलंदाजी दिली नाही. त्यानंतर जेव्हा तो आला तेव्हा त्याने ओली पोप आणि हॅरी ब्रुक यांच्या विकेट्स मिळवल्या आणि गिलला चुकीचे ठरवले.

# १ ऑगस्टपासून यूपीआय, एलपीजी, क्रेडिट कार्डसह नियम बदलणार



**नवी दिल्ली :** दरवर्षीप्रमाणे, ऑगस्ट २०२५ मध्ये अनेक आर्थिक नियम बदलणार आहेत, ज्याचा परिणाम सामान्य माणसाच्या खिशावर होऊ शकतो. क्रेडिट कार्ड, एलपीजीच्या किमतींच्या नियमांमध्ये बदल होऊ शकतात, तर यूपीआयबाबतही अनेक बदल होणार आहेत. हे ६ बदल तुमच्या खिशावर भार टाकू शकतात आणि तुमच्या बजेटवर परिणाम करू शकतात. जर तुम्ही एसबीआय कार्डधारक असाल तर तुम्हाला मोठा धक्का बसू शकतो, कारण ११ ऑगस्टपासून एसबीआय अनेक को-ब्रँडेड क्रेडिट कार्डवर उपलब्ध असलेले मोफत हवाई अपघात विमा कव्हर बंद करणार आहे. आतापर्यंत, एसबीआय, यूको बँक, सेंट्रल बँक, पीएसबी, करूर वैश्य बँक, अलाहाबाद बँक यांच्या सहकार्याने, काही एलीट आणि प्राइम कार्डवर १ कोटी किंवा ५० लाख रुपयांचे कव्हर देत असे. दर महिन्याप्रमाणे, या महिन्यातही एलपीजी किंवा व्यावसायिक सिलिंडरच्या किमतीत बदल होऊ शकतो. १ जुलै रोजी १९ किलोच्या व्यावसायिक सिलिंडरची किंमत बदलण्यात आली आणि ती ६० रुपयांनी स्वस्त करण्यात आली. व्यावसायिक सिलिंडरची किंमत अनेक वेळा बदलली आहे, परंतु एलपीजी सिलिंडरची किंमत अद्याप बदललेली नाही. अशा परिस्थितीत, १ ऑगस्टपासून एलपीजीच्या किमतीत कपात अपेक्षित आहे.१ ऑगस्टपासून बाबत अनेक नवीन नियम लागू केले जातील. जर तुम्ही नियमितपणे किंवा इतर कोणत्याही पेमेंट थर्ड प्लॅटफॉर्मचा वापर करत असाल, तर तुमच्यावरील दबाव कमी करण्यासाठी आणि चांगल्या पेमेंट सुविधा देण्यासाठी नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडिया ने अनेक नियम बदलले आहेत.

# विदेशी गुंतवणूकदारांचा भारतीय शेअर बाजारावर विश्वास वाढला

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी



मार्च २०२५ च्या तिमाहीपर्यंत, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदार बहुतेक भारतीय कंपन्यांचे शेअर्स विकत होते. परंतु जून २०२५ च्या तिमाहीत, त्यांनी विक्रीपेक्षा जास्त खरेदी करण्यास सुरुवात केली आणि निव्वळ खरेदीदार बनले. जून २०२५ च्या तिमाहीत, परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी () भारतीय शेअर्समध्ये ३८,६६८ कोटी रुपये गुंतवले. तथापि, त्यांनी त्यांच्या गुंतवणुकीचा मोठा भाग कर्जात (जसे की बाँड) विकला. म्हणून, खरेदी आणि विक्री दोन्ही जोडल्यानंतर, भारतातील त्यांची एकूण निव्वळ गुंतवणूक फक्त ३,१९७ कोटी रुपये होती.जागतिक राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर जून तिमाहीत परदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी भारतीय शेअर्सची खरेदी पुन्हा सुरू केल्याने कदाचित त्यांना भारताच्या अर्थव्यवस्थेच्या ताकदीवर पूर्ण विश्वास आहे आणि भविष्यातील वाढीवर त्यांचा विश्वास आहे. जून २०२५ च्या तिमाहीत, ने काही शेअर्समधील त्यांचा हिस्सा प्रचंड प्रमाणात वाढवला आहे आणि तो २० टक्क्यांहून अधिक केला आहे.
एम्बेसी डेव्हलपमेंट्स लिमिटेड ही भारतातील एक मोठी रिअल इस्टेट कंपनी आहे. ती प्रमुख शहरांमध्ये कमी किमतीची आणि प्रीमियम घरे बांधते. ही कंपनी विशेष आर्थिक क्षेत्रांमध्ये कार्यालये आणि मालमत्ता बांधकामावर देखील काम करते.ट्रेंडलाइननुसार, जून २०२५ च्या तिमाहीत एफआयआयने रिअल इस्टेट कंपनीतील त्यांचा हिस्सा १५.९३% वरून २८.१३% पर्यंत वाढवला आहे. एम्बेसी डेव्हलपमेंट्समधील एफआयआय गुंतवणुकीत मोठी वाढ कंपनीच्या आगामी मोठ्या प्रकल्पांमुळे असू शकते. पुढील तीन वर्षांत, या प्रकल्पांचे एकूण अंदाजे मूल्य ४८,००० कोटी रुपयांपेक्षा जास्त आहे.
ॲडव्हान्स्ड एन्झाइम टेक्नॉलॉजीज लिमिटेड ही एन्झाइम व्यवसायात काम करणारी पहिली भारतीय कंपनी आहे. आता तिचा भारतातील दुसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा बाजार हिस्सा आहे. मे २०२५ पर्यंत, कंपनीचे भारतात ८ हून अधिक कारखाने आहेत, ४०० हून अधिक अद्वितीय उत्पादने तयार करतात आणि जगभरात ७०० हून अधिक ग्राहकांना सेवा देतात. ती ४५ हून अधिक देशांमध्ये कार्यरत आहे, १७ हून अधिक पेटंट धारण करते आणि २५ वर्षांहून अधिक काळ व्यवसायात आहे.
ट्रेंडलाइन्सनुसार, जून २०२५ च्या तिमाहीत एफआयआयने कंपनीतील त्यांचा हिस्सा ११.९०% वरून २३.४५% पर्यंत वाढवला आहे. एफआयआय या एन्झाइम कंपनीतील हिस्सा वाढवत आहेत कारण तिच्याकडे पुढे मोठ्या वाढीच्या संधी आहेत. २०३० पर्यंत मानवी पोषणासाठी जागतिक बाजारपेठ ३,४६१ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. ॲडव्हान्स्ड एन्झाइम्स या बाजारपेठेचा जवळजवळ अर्धा भाग १,७०० कोटी रुपयांपेक्षा जास्त काबीज करेल अशी अपेक्षा आहे ज्यामुळे ही एक मजबूत गुंतवणूक होईल.
झिंका लॉजिस्टिक्स सोल्युशन्स लिमिटेड, ज्याला ब्लॅकबक म्हणूनही ओळखले जाते, हे भारतातील ट्रकिंगसाठी सर्वात मोठे ऑनलाइन प्लॅटफॉर्म आहे. ते पेमेंट, वाहन कर्ज, तंत्रज्ञानाद्वारे ट्रकचा मागोवा घेणे इत्यादींसाठी डिजिटल सेवा प्रदान करते. कंपनी ट्रक ड्रायव्हर्स आणि ऑपरेटर्ससाठी सबस्क्रिप्शन आणि लॉयल्टी कार्डवर फास्टॅग, जीपीएस ट्रॅकिंग देखील देते.

# आधार हाऊसिंग फायनान्सकडून पहिल्या तिमाहीत एयूएममध्ये २२ टक्के तर नफ्यात १९ टक्के वाढ

नवी दिल्ली : दि. २७ प्रतिनिधी

आर्थिक वर्ष २०२६ च्या ३० जून रोजी संपलेल्या तिमाहीत आधार हाऊसिंग फायनान्स लिमिटेडचा निव्वळ नफा वाढला. शुक्रवारी एक्सचेंज फाइलिंगनुसार, कंपनीचा नफा २३७ कोटी रुपयांवर पोहोचला, जो पहिल्या तिमाहीत १९% वाढ आहे, जो मागील वर्षीच्या याच कालावधीतील २०० कोटी रुपयांच्या तुलनेत आहे.
कंपनीचे निव्वळ व्याज उत्पन्न २१.६ टक्के वाढून ३५२ कोटी रुपयांवरून ४२८ कोटी रुपयांवर पोहोचले. निव्वळ नफा २०० कोटी रुपयांच्या तुलनेत १८.६ टक्के वाढून २३७ कोटी रुपये झाला. ''आम्ही आर्थिक वर्ष २०२६ च्या पहिल्या तिमाहीचा शेवट २६,५२४ कोटी रुपयांच्या सह चांगल्या पद्धतीने केला, जो २२% ची वार्षिक वाढ दर्शवितो,'' असे मुख्य कार्यकारी अधिकारी ऋषी आनंद म्हणाले. आनंद यांनी भर दिला की परवडणाऱ्या घरांच्या क्षेत्रातील मागणीमुळे कर्जवाटप ३२ टक्के वाढून १,९७९ कोटी रुपयांवर स्थिर राहिले आहे. ''या तिमाहीत करपश्चात नफा २३७ कोटी रुपये होता, जो १९% ची वार्षिक वाढ दर्शवितो.'' आधार हाऊसिंग फायनान्सचे शेअर्स एनएसईवर २.९९% ने घसरून ४९६.४० रुपयांवर बंद झाले, तर बेंचमार्क निफ्टीमध्ये ०.९० टक्के घसरण झाली. गेल्या १२ महिन्यांत या शेअरमध्ये ११.०१ टक्के आणि वर्षभराच्या आधारावर १७.४६ टक्के वाढ झाली आहे.

# संजय कपूर यांच्या ३०००० कोटी रुपयांच्या वारसा हक्काच्या वादाला एक नवीन वळण

कोलकत्ता दि. २७ प्रतिनिधी

बॉलिवूड अभिनेत्री करिश्मा कपूर यांचे माजी पती आणि दिवंगत उद्योगपती संजय कपूर यांच्या वारसा हक्कावरून सुरू असलेल्या वादात एक नवीन वळण आले आहे. त्यांची आई राणी कपूर यांनी सोना बीएलडब्ल्यू प्रिसिजन फोर्जिंग (सोना कॉमस्टार) च्या भागधारकांना एक पत्र लिहिले आहे, त्यानंतर खळबळ उडाली आहे. खरं तर, त्यांनी या पत्रात चिंता व्यक्त केली आहे आणि म्हटले आहे की जून महिन्यात त्यांच्या मुलाच्या अचानक मृत्यूनंतर, त्याचा कौटुंबिक वारसा हिसकावून घेण्याचे प्रयत्न केले जात आहेत.
'कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले'
कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या पूर्वसंध्येला शेअरहोल्डर्सना पाठवलेल्या या पत्रात, राणी कपूरने दावा केला आहे की तिला भावनिक त्रासाच्या स्थितीत कागदपत्रांवर स्वाक्षरी करण्यास भाग पाडले गेले, तेही बंद दाराआड आणि कंपनीच्या खात्यांमध्ये आणि माहितीमध्ये प्रवेश नाकारण्यात आला. इतकेच नाही तर तिने त्यात लिहिले आहे की, 'तिच्या मुलाच्या अचानक मृत्यूनंतर, तिला जाणूनबुजून त्याने स्थापन केलेल्या गटावर परिणाम करणाऱ्या सर्व निर्णयांपासून वगळण्यात आले आहे, जरी ती तिच्या पतीच्या नोंदणीकृत मृत्युपत्राची एकमेव लाभार्थी होती आणि बहुसंख्य भागधारक देखील होती.'
दिवंगत संजय कपूर यांच्या आईने आरोप केला आहे की त्यांच्या मुलाच्या मृत्यूनंतर शोकसंमेलनात स्वाक्षरी केलेल्या कागदपत्रांचा वापर आता कुटुंबाच्या वारसा व्यवसायावर खोटे नियंत्रण दाखवण्यासाठी केला जात आहे.
संजय कपूरच्या आईने केलेल्या आरोपांनंतर, कंपनीनेही ताबडतोब त्यांच्याकडून एक निवेदन जारी केले, ज्यामध्ये असे म्हटले होते की सर्व निर्णय लागू असलेल्या कॉर्पोरेट कायद्यांनुसार आणि नियामक मुदतीनुसार घेण्यात आले आहेत. पत्रात केलेल्या दाव्यांना उत्तर देताना, कंपनीने स्पष्ट केले की ती तिच्या रेकॉर्डमध्ये शेअरहोल्डर म्हणून सूचीबद्ध नाही आणि म्हणूनच कंपनीला बोर्डाच्या बाबींमध्ये तिचा सल्ला घेणे कायदेशीररित्या बंधनकारक नाही. सोना कॉमस्टारने पुष्टी केली आहे की त्यांनी २५ जुलै रोजी त्यांची वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित केली होती, ज्यामध्ये नवीन बोर्ड सदस्याची नियुक्ती करण्यात आली आहे.



# वीरांच्या बलिदानासमोर नतमस्तक अकोला!













दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ : कारगिल विजय दिवस ही केवळ युद्धातील विजयाची आठवण नाही, तर मायभूमीसाठी आपले प्राण अर्पण करणाऱ्या शूरवीरांचा स्मरणदिवस आहे. या दिवसाचे औचित्य साधून, बार्शीटाकळीच्या राजयोग मंगल कार्यालय आळंदा फाटा येथे देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्था अकोला आणि तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटी अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित वीर शहीद सन्मान सोहळा अत्यंत भावनिक आणि अंतःकरण हलवून टाकणारा ठरला.**

तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष संयोजक प्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे , देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक डॉ मनोहर गोकुळ चव्हाण,आणि देवळीचे सरपंच कोमल दीपक पतोंड यांच्या पुढाकाराने झालेल्या या कार्यक्रमात भारत मातेच्या प्रतिमेचे पूजन करून अकोला जिल्ह्यातील सर्व वीर शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून, दीप प्रज्वलन करून वीर शहिदांना सामूहिक श्रद्धांजली मेणबत्ती प्रज्वलित करीत सर्व उपस्थितांनी अश्रुपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.यावेळी शहीदांच्या कुटुंबांसह सर्वांचे डोळे अश्रूंनी भरून आले होते. डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे अभिमान आणि वेदनेचा संगम होते. या भावनिक क्षणी मंचावर उपस्थित सुप्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुगत वाघमारे, माजी सैनिक डॉ. मनोहर चव्हाण, माजी सुभेदार अर्जुन बुधनेर, ॲड. संजय सेंगर, गिरीश पुसदकर, राजश्री कौलखेडे, विष्णुदास मोंडोकार, श्रीकृष्ण काशीराम आखरे, किशन राठोड, दीपक गाडगे, विठ्ठल इंगळे, यांच्यासह सर्व मान्यवर आणि उपस्थितांचे अश्रू अनावर झाले.

दरम्यान कार्यक्रमात एल.एन.पी. कॉन्व्हेंट स्कूल, शिवर येथील विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर वर सादर केलेल्या भावस्पर्शी नृत्याने उपस्थितांची मने हेलावून गेली. देशभक्तीपर गीतांनी वातावरणात जणू वीरांची उपस्थिती जाणवू लागली होती. या सोहळ्यात अकोला जिल्ह्यातील वीर शहीद जवानांच्या कुटुंबांचा सन्मान करण्यात आला. त्यामध्ये शहीद उदयभान सीताराम तेलगोटे, महादेव नामदेव तायडे, यशवंत नथू सरकटे, आनंदा सखाराम काळपांडे, अनिल ज्ञानदेव निखाडे, संतोष खुशालराव जमनिक, भास्कर पातोंड, कैलास काशिनाथ निमकंडे, प्रशांत प्रल्हाद राऊत, आनंद शत्रुघ्न गवई, सुमेध वामन गवई, जगदेव सुखदेव भटकर, प्रवीण प्रभाकर जंजाळ, रमेश देविदास वाहिले, हरिविजय रमेश जंजाळ, पवन पुंडलिक पातोंड, विष्णू निळकंठ आठले, शुभम माणिकराव आगळे, शामराव तेजराव देशमुख यांच्या वीर कुटुंबातील वीर माता, वीर पिता वीर पत्नी, वीर पुत्री, व शहीद परिवारातील



शहीदांच्या बलिदानापुढे शब्दही थिटे पडतात. या मातीत जन्म घेणं माझं भाग्य, पण देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या वीरांच्या कुटुंबांसमोर नतमस्तक होणं, ही माझ्यासाठी आयुष्यभराची अभिमानास्पद क्षणगाथा ठरली. त्यांच्या डोळ्यांतील अश्रू वेदनेचे नव्हते, तर अभिमानाचे होते. अशा कार्यक्रमांमधून आपण त्यांच्या त्यागाचे स्मरण करत, भावी पिढीला देशभक्तीचा संदेश देत आहोत. या सोहळ्याने मला अंतःकरणातून हलवलं आणि समाजासाठी काहीतरी करण्याची नवी ऊर्जा दिली. शहीदांचे योगदान विसरू नये, त्यांची स्वप्ने पूर्ण करणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

**- डॉ. सुगत वाघमारे,** सुप्रसिद्ध उद्योजक तथा सामाजिक कार्यकर्ते

## वीर शहिदांचा मरणोत्तर सन्मान

आलेले सर्व सदस्य यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह, प्रमाणपत्र, फुलझाड, पुष्पहार आणि स्नेह भेटवस्तू देऊन कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शहीद कैलास निमकंडे यांच्या परिवाराच्या डोळ्यांतून अश्रू थांबत नव्हते, तर शहीद प्रशांत राऊत यांच्या आईच्या डोळ्यांतून अश्रू अनावर झाले होते. शहीद प्रवीण जंजाळ यांच्या वीरमातांची अवस्था अशी होती की सन्मान स्वीकारताना त्या उभ्या देखील राहू शकत नव्हत्या. अशा हृदयद्रावक क्षणांनी वीर परिवारांची व्यथा सर्वांच्या डोळ्यांत पाणी आणणारी होती.

सर्व शहीद परिवारांना सन्मान घेताना आवंढा गिळता आला नाही, उपस्थितांचेही मन भरून आले. शहीद भास्करराव पातोंड परिवाराची सून असल्याचा अभिमान-सरपंच कोमल दीपक पातोंड यांनी व्यक्त केला, हे क्षण उपस्थितांच्या हृदयात कायमचे कोरले गेले. कार्यक्रमात प्रियांका छबिलाल ढोके यांनी भारतमातेच्या रूपात केलेले सादरीकरण, सतीश शामराव खंडारे यांनी जय जवान जय किसान चा नारा देत जवानाची भूमिका साकारली तर शुभम बोदडे यांचा शेतकरी वेश आणि चाईल्ड लाईनचे हर्षाली गजभिये, राजेश मनवर, वैभव भदे, रोशन ताले यांचा सहभाग लक्षणीय ठरला. कलाविष्कार ग्रुपचे संजय गवई, विद्या वानखडे, प्रमोद जमधाडे, बाळू गावंडे, राहुल नाईक यांनी सादर केलेली गीते भावनिक ठरली. अंगणवाडी सेविका सुरेखा लुंगे, कुसुम इंगळे, वनमाला इंगळे, शकुंतला लुंगे, अनिता सरकटे यांचाही गौरव करण्यात आला. आरोग्य तपासणी शिबिरात डॉ. समृद्धी होटवर, डॉ. निखिल वयाळ, डॉ. तुषार वयाळ, डॉ. साहिल शर्मा, डॉ. प्रीती झनक, डॉ. समीक्षा सोंनलखान, डॉ. आचाल टिकार, डॉ. मृणाली सोनोने, डॉ. आकांक्षा ठाकरे, डॉ. अक्षदा तिवारी,डॉ. अर्चना पाटील, डॉ. सारिका मोरे, महेंद्र वानखडे, वंदना कुंडे, बाळकृष्ण उताणे, ॲड. सी. डी. बळापुरे, एम. व्ही. तायडे, डॉ. एम. जुमडे यांनी आपली सेवा दिली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्थेचे, अध्यक्ष डॉ मनोहर चव्हाण, सुभेदार अर्जुन बुधनेर , मेजर दीपक गाडगे, मेजर श्रीकृष्ण आखरे ,मेजर विठ्ठल इंगळे, मेजर किशन राठोड, व तीक्ष्णगत वेल्फेअर सोसायटीचे अश्विन सिरसाट, अनिल चौहान, श्रीकांत पिंजरकर, निलेश ठोकळ, विनित खंडारे, प्रदीप अवचार, दिनेश कवडे, पोहरकर काका, विशाल शिंदे, गजानन तायडे, जिल्हा समनव्यक सचिन पाटील, उमेश शिरसाट, श्वेता शिरसाट, सुचिता घोगरे, सपना म्हात्रे, करण पळसपगार, अंकुश शिरसाट, भीमा शिरसाट, प्रतीक गोळे, यश पंडित, आकांक्षा गोमासे, चंचल देशमुख, योगेश हिराळकर, यश साळवे यांनी अथक परिश्रम घेतले.

शहीद जवानाची सून असणं ही माझी ओळख नाही, ती माझ्या रक्तात भिनलेली जबाबदारी आहे. माझे सासरे शहीद भास्कर पातोंड यांचा त्याग आमच्या कुटुंबाचा गौरव आहे. माझ्या सासूबाई सुरेखा पातोंड व पती दीपक पातोंड नेहमीच म्हणतात 'सैनिकांचा परिवार म्हणजे आपलाच परिवार.' आजच्या सन्मान सोहळ्यात वीरमाता, वीरपत्नी, वीरपिता यांच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू पाहून मन हेलावून गेले. 'जय हिंद'चा नारा देताना उर अभिमानाने भरून आला. अशा सोहळ्यांमधून त्यागाचे स्मरण होतं आणि समाजात वीरांच्या कुटुंबाला मान मिळतो, हीच खरी श्रद्धांजली आहे.

**- कोमल दीपक पातोंड,** सरपंच देवळी

स्वतः माजी सैनिक असल्याने शहीदांच्या बलिदानाची जाणीव मला अंतःकरणातून आहे. देशासाठी प्राण अर्पण करणाऱ्या जवानांचा सन्मान करणे ही केवळ जबाबदारी नाही, तर ती माझ्यासाठी एक पवित्र देशसेवा आहे. या सन्मान सोहळ्यात वीरांच्या कुटुंबांमधील अश्रूंमध्ये जे अभिमान आणि वेदना होते, ते शब्दांत मांडणं कठीण आहे. अशा कार्यक्रमांमधून त्यांच्या त्यागाची प्रेरणा नव्या पिढीपर्यंत पोहोचते. 'जय हिंद'चा नारा देताना मन भरून आलं आणि वाटलं आपण खऱ्या अर्थाने वीरांना वंदन करत आहोत.

**- डॉ. मनोहर चव्हाण,** माजी सैनिक

## कार्यक्रमात आजी-माजी सैनिकांची उत्स्फूर्त उपस्थिती

या कार्यक्रमात देशभक्त आजी-माजी सैनिक सेवाभावी संस्थेचे कर्तव्यदक्ष उपाध्यक्ष सुभेदार अर्जुन बुधनेर, सचिव श्रीकृष्ण आखरे, कोषाध्यक्ष मेजर किशन राठोड, तसेच अकोला जिल्हाध्यक्ष मेजर विठ्ठल इंगळे, मेजर दीपक गाडगे, मेजर राहुल बोडके, मेजर राज वानखडे, मेजर दिनेश राठोड, मेजर गोपाल पवार, मेजर सुनील पिंपळे, मेजर किशन गावंडे, मेजर अनिल ठाकरे, मेजर धम्मा मोहड, मेजर प्रवीण अंभोरे, मेजर रवी शित्रे, मेजर दत्ता ढोरे, मेजर लक्ष्मण जाधव, मेजर मंगेश घाटोळ, मेजर सतीश धुमाळे, मेजर रमेश जाधव, मेजर विलास रोधळे , मेजर संजय पहुरकर,आणि सर्व आजी-माजी सैनिक सहपरिवार,सैनिक परिवारातील विवेक निमकर आदी सहभागी होते.











एल.एन.पी. कॉन्व्हेंट स्कूल, शिवर येथील विद्यार्थ्यांनी ऑपरेशन सिंदूर वर सादर केलेल्या भावस्पर्शी नृत्याने उपस्थितांची मने हेलावून गेली.

## हा केवळ सन्मान नव्हता



हा शहिदांच्या रक्तातून फुलणाऱ्या नवभारताचा संकल्प होता! त्यांच्या बलिदानाला नतमस्तक होऊन, उपस्थितांनी डोळ्यांत अश्रू आणि अंतःकरणात अभिमानाने 'जय हिंद!'चा नारा दिला.

## शतशः कृतज्ञता... वीरांना मानाचा मुजरा!

शहीद सन्मान सोहळ्यात अश्रूंनी भरलेले डोळे आणि अभिमानाने भरून आलेले ऊर घेऊन उपस्थितांनी वीरांना मानवंदना दिली. 'कारगिल विजय दिवस' हे फक्त स्मरण नव्हे, तर शहीदांच्या अपूर्ण स्वप्नांना पूर्णत्व देण्याची शपथ असल्याचे संकल्पपूर्वक सांगण्यात आले. उपस्थित सर्व वीरमाता, वीरपिता, वीरपत्नींच्या डोळ्यांतून वाहणारे अश्रू हे त्यांच्या पुत्रांच्या त्यागाचे जगजाहीर साक्षीदार होते.



सर्व छायाचित्रे : संजय ताथुरकर / संकलन : शरद शेगोकार / सजावट मांडणी : अक्षय जायले

अजिंक्य भारत
आपलं अकोला
अकोला, सोमवार, दि. २८ जुलै २०२५

## थोडक्यात

### पिण्याच्या पाण्याचा अपव्यय

**अकोला :** शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा धरणात पाणीसाठा कमी होत असून पाणीपुरवठ्याचे वेळापत्रक दर पाचव्या दिवशी करण्यात आले आहे. नळ तीन ते चार तास सुरू राहत असल्याने पाण्याचा मोठ्या प्रमाणात अपव्यय केला जात आहे. नळ आल्यानंतर नागरिक व बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची नासाडी सुरू आहे. पिण्याचे पाणी अक्षरशः बांधकाम साहित्यासाठी वापरले जात असल्याचे चित्र दिसून येत आहे. काही परिसरात व्यवसायी वाहने धुण्यासाठी पिण्याच्या पाण्याचा वापर करीत असल्याचे चित्र आहे. काटेपूर्णा प्रकल्पातील जलसाठा केवळ ४२ टक्के पुरेल इतका आहे; मात्र पिण्याच्या पाण्याच्या नासाडीमुळे पाणी कपातीला सामोरे जाण्याची वेळ येऊ शकते. त्यामुळे नागरिकांनी पाणी जपून वापरावे तसेच पाणी झाल्यास विनाकारण पाण्याचा अपव्यय टाळावा, असे आवाहन महापालिका पाणीपुरवठा विभागाने केले आहे.

### या मार्गावरील पथदीप बंद

**अकोला :** शहरातील पथदिप बंद असल्याची परिस्थिती आहे. मुख्य रस्त्यावरील पथदीप देखभाल व दुरुस्ती अभावी बंद असल्याने कौलखेड मार्गावर अंधार पसरला आहे. ईइएसएल कंपनीने मनपाकडून देयक न मिळाल्याने काम बंद केले आहे. त्यामुळे देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी महापालिका विद्युत विभागाकडे आहे. परंतु याकडे दुर्लक्ष होत असल्याने कौलखेड मार्गावरील पथदीप अनेक दिवसांपासून बंद आहेत. हा मार्ग अतिशय वर्दळीचा असून दोन्ही बाजूला मोठमोठी झाडे असल्याने पथदिव्यांचा प्रकाश पडत नाही. अशा परिस्थितीत पथदीप व्यवस्था सुरळीत होणे गरजेचे आहे.

### कावड यात्रा मिरवणूक निमित्त रूटमार्च

**हिवरखेड :** येथे श्रावण मासातील कावड यात्रा, नागपंचमी,पोळा सण ऊत्सवाच्या अनुषंगाने ठाणेदार गजानन राठोड यांचे अधीपत्याखाली गावात शांतता व सूव्यवस्था अबाधीत राहावी यासाठी रुट मार्च काढन्यात आला. व सध्यांकाळी शांतता समीती सदस्य व पत्रकार यांच्या ऊपस्थीतीत बैठक सपंन्न झाली. यावेळी पहील्या सोमवारी निघणाऱ्या कावड यात्रेमधे महाकालेश्वर मित्र मंडळ कावड यात्रा श्रीराम सेना कावड यात्रा फत्तेपुरी सस्थान शिवभक्त कावड मंडळ अशा तीन मंडळाच्या कावड यात्रा निघत असून कावड यात्रेचा मार्ग माजी आमदार स्व. डॉ का शा तिडके प्रवेशद्वार ते मेनरोड रोडने निघून महादेव सस्थान गोर्धावेस भवानी मदीर मार्गे स्वदेश भक्त संपतराव भोपळे गेट ते ईतीहास कालीन सदाशिव सस्थानवर भोलेनाथाला जलभिषेक केला जातो.शांतता समीती बैठकी मधे बाजाराचा दिवस असल्यामुळे शातंता समीती कडून बॅरीकेट लावन्याच्या सूचना तसेच सर्व शिवभक्ताना त्रास होनार नाही तसेच गुण्या गोवीदांने ऊत्सव शाततेत पार पडन्यासाठी हिंदु मुस्लीम बांधव एकत्रीत पणे सहभाग घेत असतात असे शातता समीती बैठकीत सदस्यानी सांगीतले. यावेळी पोलीस पाटिल प्रकाश गावंडे, रमेश दुंतोडे जमिरभाई पठान,शामशील भोपळे, किरण सेदाणी, संदीप ईगंळे महेद्र भोपळे राजू खॉन,पत्रकार बाळासाहेब नेरकर, शेख जमिर, मोईज जमादार सूरज चौबे! ऊमेश टापरे प्रकाश खोब्रागडे,शांताराम कवळकार, सतीष ईंगळे,वीनोद भोपळे, हिफाजत खॉन ईत्यादी सह दुय्मम ठानेदार श्रीराम जाधव प्रफुल पवार धिरज साबळे गोपाल गीलबीले,अमोल बुंदे आकाश गजभार अनिल माळी गृहरक्षक दलाचे जवान आजच्या शांतता समीती सभेला हजर होते.

# मतदार यादीतील घोळ: भाजपची निवडणूक आयोगाकडे तक्रार

## दुसऱ्या मतदारसंघातील व दोनदा आलेली नावे वगळण्याची मागणी

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** बिहार येथील मतदार यादीतील घोळाचा मुद्दा देशभरात गाजत असतानाच अकोल्यात भारतीय जनता पक्षाने निवडणूक आयोगाच्या चुकांवर बोट ठेवीत विधानसभेच्या इतर मतदारसंघातील नावे, एकाच मतदाराचे अनेक वेळा नावे असे अनेक गैरप्रकार मतदार यादीत झाल्याचा गंभीर आरोप केला आहे.



या प्रकरणात भाजपने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल करून मतदार यादीत स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांपूर्वी दुरुस्ती करण्याची मागणी केली आहे. यावर निवडणूक आयोग काय भूमिका घेतो याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात भाजपला पराभवाचा धक्का बसला. या मतदारसंघातून काँग्रेसचे उमेदवार साजीदखान पठाण यांनी काठावर विजय मिळविला. दरम्यान, या पराभवाचे भाजपने मतदार यादीवर खापर फोडले. अकोला पश्चिम मतदारसंघातील मतदार यादीमध्ये मोठ्या प्रमाणात घोळ झाला असल्याचा आरोप भाजपने केला. 'अकोला पश्चिम' मध्ये २४ हजारावर मतदारांच्या यादीत मतदारांची दोनदा, तिनदा नावे आहेत. इतर मतदारसंघातील नावांचाही या मतदारसंघात समावेश आहे, अशी तक्रार भाजपच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयुक्तांकडे केली. २४ हजार नावे दोनदा असल्याने ती काढण्यात यावी, तसेच बाळापूर मतदारसंघातील नावे 'अकोला पश्चिम' मधून वगळण्यात यावीत, अशी मागणी भाजपच्या शिष्टमंडळाने निवडणूक आयुक्तांना दिलेल्या पत्रात केली आहे. या संदर्भात केंद्रीय निवडणूक आयोग तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे सुद्धा तक्रार करण्यात आली आहे. खासदार अनुप धोत्रे यांच्या माध्यमातून सुद्धा तक्रारी करण्यात आल्या. अकोला महानगरपालिका निवडणुकीच्या आगोदर यादी दुरुस्त करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाकडे तक्रार पाठविण्यात येणार असून, त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही केली जाईल. इतर मतदारसंघातील नावे कमी करण्यात येतील, असे राज्य निवडणूक आयुक्तांनी सांगितल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे.

**या संदर्भात पडताळणी करून दुसऱ्या मतदारसंघातील व दोनदा आलेली नावे वगळण्याची मागणी भाजपकडून करण्यात आली आहे. या मतदारसंघामध्ये २४ हजार पेक्षा जास्त मतदारांची नावे मतदार यादीमध्ये दोनदा समाविष्ट झाली. बाळापूर मतदारसंघातील एक हजार ४०० मतदारांच्या नावाचा समावेश देखील 'अकोला पश्चिम'मध्ये आहे. या संदर्भात निवडणूक आयोगाकडे पुरावे सुद्धा सादर करण्यात आल्याचा दावा भाजपने केला.**

### पार्किंग कंत्राटात अनियमितता; मनपाला लाखोंचा फटका

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या पार्किंग व्यवस्थापनात मोठ्या प्रमाणावर अनियमितता झाल्याचे उघड होत आहे. शहरातील विविध पार्किंग झोनसाठी सन २०२३-२४ मध्ये निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. या अंतर्गत १३ ठिकाणी पे अँड पार्क तत्वावर वाहनतळ विकसित करून खासगी कंत्राटदारांकडे जबाबदारी सोपवण्यात आली होती. सुरुवातीला निविदा अटींच्या आधारावर काही कंत्राटदारांनी आगाऊ रक्कम मनपाकडे जमा केली होती. मात्र त्यानंतर अनेक ठिकाणी मनपाला कोणताही आर्थिक हिशोब दिला न जाता वसुली सुरू राहिली. प्रशासनाकडून याबाबत कोणतीही स्पष्ट माहिती उपलब्ध नसून जबाबदारी झटकण्याचा प्रकार सुरू आहे. गतवर्षी जे कंत्राटदार नियमानुसार जबाबदारी पार पाडण्यात अपयशी ठरले आणि मनपाला लाखोंचा फटका बसला, त्यांपैकी काहींनाच यंदा पुन्हा कंत्राट देण्यात आल्याचे निदर्शनास आले आहे. यात गांधी चौक, कवच संकुल, फतेह चौक आदी ठिकाणांचा समावेश आहे. काही पार्किंग स्थळांवर हातगाड्या व अतिक्रमणामुळे पार्किंगच ठप्प झाले असून, कंत्राटदारांकडून अशा व्यापाऱ्यांकडून अनधिकृत वसुली होत असल्याची माहिती समोर आली आहे.
या पार्श्वभूमीवर प्रशासक तथा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्याकडून काय ठोस कारवाई होते, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.

## रिमझिम पाऊस...., वातावरणात गारवा...



**शहरात सलग चार दिवसापासून रिमझिम पावसाने सुरुवात केली असून या पावसामुळे वातावरणात मोठा गारवा निर्माण झाला आहे तसेच छोट्या मोठ्या व्यवसायावर सुध्दा मोठा परिणाम झाला आहे. (छाया. संजय ताथुरकर)**

### लग्नाचे आमिष दाखवीत वारंवार शारीरिक संबंध प्रस्तापित करणाऱ्या विरुद्ध गुन्हा!

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** इन्स्टाग्रामवरील ओळखीच्या आधारे सुरु झालेल्या नात्याचा शेवट फसवणूक आणि मारहाणीच्या तक्रारीत झाला आहे. घटना १९ जुलै २०२५ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत जीएमडी मार्केटसमोरील कप ऑफ कम्फर्ट कॅफे येथे घडली. फिर्यादीने दिलेल्या माहितीनुसार, पतीपासून विभक्त राहत असलेल्या फिर्यादीला आरोपीने लग्नाचे आश्वासन देत जवळीक साधली. मात्र नंतर लग्नास नकार दिल्याने ही फसवणूक उजेडात आली. सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, जुने शहरातील रहिवासी ३३ वर्षीय महिलेने शुभम गजानन टाले (२९), रा. सांगवी मोहाडी, अकोला याच्यावर विवाहाचे



आमिष दाखवून वारंवार शारीरिक संबंध ठेवले आणि नंतर लग्नास नकार देत शिवीगाळ व मारहाण केल्याची तक्रार दिली. त्यानुसार, सिव्हिल लाईन पोलीस ठाण्यात कलम ६४, ६४(२)() अन्वये गुन्हा क्रमांक २६४/२५ हा २६ जुलै रोजी रात्री ११.१६ वा. दाखल करण्यात आला. तपास पोलीस सत्येंद्र पंचवटकर हे करीत आहेत. आरोपीविरुद्ध कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे.

# प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मदत मिळालीच पाहिजे!

## खा. अनुप धोत्रे यांचा महसूल विभागाला स्पष्ट आदेश

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** बाळापूर तालुक्यातील पारस आणि आसपासच्या भागात नुकत्याच झालेल्या ढगफुटी सदृश्य मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या खरीप पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून, काही घरांमध्ये पाणी शिरल्याने घरातील वस्तूंचेही अतोनात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर अकोला लोकसभा मतदारसंघाचे खासदार अनुपभाऊ धोत्रे यांनी प्रत्यक्ष पाहणी करून प्रत्येक नुकसानग्रस्त शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवू नका, अशा स्पष्ट सूचना महसूल विभागाला दिल्या.



पारस येथे भेट देताना खा. अनुप धोत्रे यांच्या सोबत तालुका अध्यक्ष किशोर कुचके, नितीन लांडे, अमोल साबळे, रामदास लांडे, दिलीप पटोकार, माजी बळीराम सिरस्कार, शेलारमामा, अजिक्य राऊत, ऋषी ताठोड, मंगेश भरणे, योगेश पटोकार, विनायक वैराळे, राजेश्वर वैराळे, पुरुषोत्तम शेळके, विपुल घोगरे, अर्चना मसने, मुक्तार खान, युवराज दांदले, सुनील गावंडे, शाम पोहरे, धनंजय नेमाडे, आनंदराव नेमाडे, विनायक काटे, विठ्ठल दही, साहेबराव लांडे, तसेच गटविकास अधिकारी नाना पजई, नायब तहसीलदार भागवत व महसूल विभागाचे कर्मचारी उपस्थित होते. पाहणीदरम्यान त्यांनी डोंगरगाव, कालबी, कलंबा, कसुरा, जोगलखेड आणि पारस या गावांतील शेतीची व घरांच्या नुकसानीची माहिती घेतली.

शेतकऱ्यांनी आपले दुःख व्यक्त करताना सांगितले की, पिके पूर्णपणे नष्ट झाली असून हातातोंडाशी आलेलं पीक गेले. त्यावर खासदार धोत्रे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पंचनामे सुरू करून शेतकऱ्यांना लवकरात लवकर आर्थिक मदत मिळेल यासाठी अहवाल सादर करण्याच्या सूचना दिल्या. 'कोणताही नुकसानग्रस्त शेतकरी मदतीपासून वंचित राहणार नाही. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे.

संकटाच्या वेळी शासन त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभं राहील. या पाहणी दौऱ्यामुळे शेतकऱ्यांमध्ये आश्वासक वातावरण निर्माण झालं असून, शासनाकडून तात्काळ मदत मिळावी, अशी मागणी ग्रामस्थ करत आहेत.

### 'यु-डायस प्लस'वर माहिती भरण्याची मुदत ३० सप्टेंबर पर्यंत

## शाळांची माहिती अद्ययावत करा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोला, दि. २७ :** नव्या शैक्षणिक वर्षाला सुरुवात झाल्यानंतर राज्यातील शाळांमध्ये विविध सुविधा, शिक्षकांची संख्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती आणि शैक्षणिक साधन सामग्रीबाबतची माहिती सुसंगत आणि पारदर्शकपणे उपलब्ध करून देण्यासाठी 'यु-डायस प्लस' या केंद्रीकृत ऑनलाइन प्रणालीचा वापर करण्यात येतो. शिक्षण विभागाने यावर्षी माहिती संकलनासाठी ३० सप्टेंबर २०२५ ही 'डेडलाईन' ठरवली आहे.
शाळांची एकत्रित माहिती उपलब्ध व्हावी यासाठी केंद्र सरकारने युडायस प्लस ही प्रणाली लागू केली. या ऑनलाइन प्रणालीमध्ये शाळेच्या पत्त्यापासून ते अभ्यासक्रम, विद्यार्थ्यांची संख्या, शिक्षकांची नियुक्ती, शाळेतील विविध सुविधा अशा सर्व गोष्टींची माहिती दरवर्षी भरली जाते. या माहितीद्वारे राज्य आणि केंद्र सरकार शैक्षणिक धोरण आखण्यासाठी तसेच शाळांना निधी वितरीत करण्यासाठी महत्त्वाचे निर्णय घेतात. यावर्षी २०२५-२६ साठी शाळांमधून गोळा होणारी माहिती तंतोतंत, अचूक आणि अद्ययावत असावी. यासाठी प्रत्येक शाळेच्या प्रमुखांनी वेळेत माहिती संकलन पूर्ण करून ती यु-डायस प्लस प्रणालीत भरणे बंधनकारक करण्यात आले आहे. माहिती भरताना कोणताही प्रकारचा विलंब, निष्काळजीपणा किंवा चुकीची माहिती आढळल्यास संबंधित शाळा व्यवस्थापनावर कारवाई केली जाणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

### डाटाबेस तयार करण्यासाठी उपयोग

यु डायस प्लस प्रणालीचे सर्वसाधारण उद्दिष्ट म्हणजे देशातील प्रत्येक शाळेची स्थिती माहिती होणे. यातून शाळेतील मूलभूत सोयी-सुविधा, शिक्षकांच्या नियुक्त्या, विद्यार्थ्यांची उपस्थिती, अपंग विद्यार्थ्यांची संख्या, शाळेतील शौचालय, पिण्याच्या पाण्याची सोय, डिजिटल सुविधा यासारख्या बाबींचा आढावा घेतला जातो. या डेटावर आधारित उपाययोजना केल्या जातात. त्यामुळे ही माहिती काळजीपूर्वक भरली जाणे अत्यंत आवश्यक आहे.

### शाळांमधील प्रगतीचे मोजमाप

युडायसवरील माहितीचा उपयोग अनेक योजना राबवताना शासनाला होतो. शाळांमधील प्रगतीचे मोजमाप, नवीन योजनांची अंमलबजावणी, निधी वितरण यासाठी हा डेटा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. त्यामुळे माहिती भरताना काळजी घेणे आवश्यक आहे.

### यूडायस व सरल पोर्टलचे एकत्रीकरण

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून यूडायस प्रणाली व सरल पोर्टलवरील माहितीचे एकत्रीकरण करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली आहे. यामुळे शाळांना सतत माहिती भरण्याची आवश्यकता भासणार नाही.

## एक विद्यार्थी एक झाड!

# 'ऑक्सिजन मॅन'च्या हिरव्या क्रांतीला 'अजिंक्य भारत' चा हातभार!

। विठ्ठल महल्ले ।

**अकोला, दि. २७ :** भारत हा कृषिप्रधान देश असून, बदलत्या हवामानामुळे आता निसर्गाच्या समतोलाचे रक्षण हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य ठरले आहे. पर्यावरण संवर्धनाचा वसा घेऊन देशभरात ऑक्सिजन मॅन म्हणून प्रसिद्ध असलेले ए. एस. नाथन यांनी आता 'एक विद्यार्थी, एक झाड' ही अभिनव मोहीम राबवण्याचा संकल्प केला आहे. या उपक्रमात दैनिक 'अजिंक्य भारत'नेही सक्रिय सहभाग घेतल्याने या मोहिमेला अधिक गती मिळेल, असा विश्वास नाथन यांनी व्यक्त केला आहे. ए. एस. नाथन हे पर्यावरण क्षेत्रातील एक प्रेरणादायी नाव. त्यांनी दरवर्षी देशातील चार ते पाच जिल्ह्यांत लाखो वृक्ष लागवड केल्याचा ठसा उमटवला आहे. त्यांच्या मते, वाढती उष्णता, कमी होणारे पावसाचे प्रमाण आणि पातळ होत चाललेली ओझोन स्तर ही निसर्गाच्या असंतुलनाची गंभीर लक्षणं आहेत. या संकटांवर मात करण्यासाठी व्यापक वृक्ष लागवड हाच एकमेव उपाय असल्याचे त्यांनी स्पष्टपणे सांगितले.
शासन वा प्रशासनाची कोणतीही मदत न घेता नाथन यांनी 'एक विद्यार्थी, एक झाड' ही मोहीम सुरू केली आहे. या उपक्रमांतर्गत गावागावांतील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या हाती झाडांचे रोप देऊन ते त्यांच्या घरी लावण्याचा निर्धार केला जात आहे.
शासनाच्या वृक्षारोपण मोहिमा प्रामुख्याने जंगलात किंवा मोकळ्या जागांवर राबवल्या जातात. मात्र या झाडांचे संगोपन न झाल्यामुळे अनेक वेळा ही झाडं टिकत नाहीत. नाथन यांची मोहीम मात्र विद्यार्थ्यांच्या घरांमध्ये झाड लावण्यावर भर देत असल्यामुळे त्या झाडांचा टिकाव आणि विकास याबाबतीत आश्वासक चित्र दिसते.

> "शाळेत शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याच्या हाती एक झाड दिलं, तर प्रत्येक गाव हिरवळीत न्हाल्याशिवाय राहणार नाही!"
> **- ए. एस. नाथन**



### 'अजिंक्य भारत'चा सहकार्य हात

या मोहीमेला प्रसिद्धी आणि लोकांपर्यंत पोहोचण्यासाठी आता दैनिक 'अजिंक्य भारत'नेही पुढाकार घेतला आहे. या उपक्रमात माध्यमांनी सहभागी झाल्यास त्याला जनतेचा मोठा पाठिंबा मिळतो, असे नाथन यांनी नमूद केले. त्यांनी दैनिक 'अजिंक्य भारत'च्या सहभागाबद्दल विशेष समाधान व्यक्त केले. नाथन यांचा पर्यावरणपूरक उपक्रम 'एक विद्यार्थी, एक झाड' हा केवळ वृक्षारोपण नसून, एक सामाजिक चळवळ आहे. प्रत्येक विद्यार्थ्याच्या भावनांना स्पर्श करणाऱ्या या मोहिमेतून पुढच्या पिढीला निसर्गाचे भान आणि पर्यावरणाचे महत्त्व पटेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे. दैनिक अजिंक्य भारतच्या सहकार्यामुळे ही चळवळ ग्रामीण भागापर्यंत पोहोचून एक मोठा बदल घडवेल, यात शंका नाही!

### झाडाच्या माध्यमातून पालकांचाही अप्रत्यक्ष सहभाग

नाथन यांच्या म्हणण्यानुसार, विद्यार्थी हे देशाचे भविष्य असून ते भावनिकदृष्ट्या झाडांशी जोडले जातात. प्रत्येक विद्यार्थी जेव्हा स्वतःच्या घरी झाड लावतो, तेव्हा त्या झाडासाठी त्याचे आई-वडीलही पाणी, खते व सुरक्षा देऊन झाडाच्या संगोपनात सहभागी होतात. यामुळे केवळ एक विद्यार्थीच नव्हे, तर एक संपूर्ण कुटुंब या मोहिमेत सामील होते. हीच बाब 'हरित क्रांती'च्या दृष्टीने महत्वाची ठरते.

अजिंक्य भारत

# आपलं बुलडाणा

बुलढाणा, सोमवार २८ जुलै २०२५ www.ajinkyabharat.com



## थोडक्यात

### मंगरूळ नवघरे येथे पावसामुळे पिकांचे नुकसान



**मंगरूळ नवघरे** - मंगरूळ नवघरे परिसरामध्ये गेल्या सात आठ दिवसापासून सतत पावसाची संत धार चालू आहे. त्यामुळे शेतामध्ये जास्त प्रमाणात पाणी साचल्यामुळे सोयाबीन पीक पिवळे होत चालले आहे. कृषी विभाग यांनी मंगरूळ नवघरे परिसरामध्ये सोयाबीन व तुरीची पाहणी करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई द्यावी अशी शेतकरी मागणी करीत आहे.

### सोनुने यांना महसूल पुरस्कार देण्याची मागणी

**सिं.राजा** : सिंदखेडराजा येथील महसूल विभागातील कर्मचारी संजय संतोष सोनवणे यांना एका ऑगष्ट रोजी साजरा होणारा महसूल दिनानिमित्त महसूल पुरस्कार प्राधान करण्याची मागणी पत्रकारांनी केली आहे. या संदर्भात सिंदखेडराजा तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संजय सोनुने हे महसूल सहाय्यक या पदावर कार्यरत असून सेतू लिपिक म्हणूनही ते आपली जबाबदारी चौकोनी पार पाडतात नागरिकांना आवश्यक असलेली वय राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र उत्पन्नाचे दाखले नॉन क्रिमीडिया प्रमाणपत्रे जात प्रमाणपत्र रहिवासी दाखले मिळकतीचे आणि शेतकरी असल्याचे प्रमाणपत्र लवकरात लवकर मिळवून देण्यासाठी नेहमीच पुढाकार घेतो घेतला आहे.विशेष गेल्या महिन्यात जूनमध्ये विद्युत पुरवठा खंडित असतानाही त्याांनी केवळ मोबाईलचा वापर करून विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होऊ दिले नाही. त्यामुळे ही मागणी केली आहे.

### 'श्रीं ' ची पालखी ३० जुलै रोजी खामगावात

**खामगाव** : श्री संत गजानन महाराजांच्या पालखीचे बुलढाणा जिल्ह्यात आगमन झाले असून आज पालखीचा मुक्काम मेहकर तालुक्यात आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही श्रींची पालखी आषाढी सोहळ्यासाठी पंढरपूर येथे गेली होती. आषाढी सोहळा आटोपून श्रींची पालखी १० जुलैला परतीच्या प्रवासाला निघाली असून मजलदरमजल करीत पालखी आज मेहकर मुक्कामी आहे. उद्या दि. २७ ला जानेफळ मुक्काम, २८ शिर्ला नेमाने मुक्काम, २९ ला आवार मुक्काम, ३० खामगांव मुक्काम व ३१ जुलै रोजी पालखी शेगाव येथे पोहोचणार आहे. श्रींच्या पालखीचे बुलढाणा जिल्ह्याच्या प्रवेशद्वारावर आगमन होताच भक्तांकडून भव्य असे स्वागत करण्यात आले. विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्यासह हजारो भाविक यावेळी उपस्थित होते.

### कृषी उत्पन्न बाजार समिती, खामगाव बाजार भाव

| वान | भाव |
| --- | --- |
| ज्वारी | १४५० - २४२५ |
| गहू | २२५० - २५५० |
| तुर | ३३०० - ६६५० |
| हरभरा | ५१०० - ६३०० |
| सोयाबीन | ३३०० - ४४७५ |
| भुईमुग | ५००० - ५७०० |
| उडीद | ५४२५ - ५४२५ |
| मुंग | ५४०० - ६५५० |
| मक्का | २१५१ - २१५१ |
| तीळ | ८००० - ८२०० |
| बाजरी | १७०० - २१०० |

# विरजतीर्थावरून कावड यात्रेला पुरातत्व विभागाची बंदी

## कावड यात्रेसाठी शिवसेनेचा इशारा;रास्ता रोको किंवा लोणार बंद करू

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**लोणार दि.२७ :** श्रावण महिना सुरू होताच भगवान शंकराच्या भक्तांमध्ये मोठा उत्साह असतो. देशभरातील अनेक भक्त 'कावड यात्रा' काढून पवित्र नद्यांमधून जल घेऊन ते शंकर मंदिरात जलाभिषेकासाठी नेतात. अशीच एक पवित्र परंपरा म्हणजे लोणार येथील विरजतीर्थ (धार गोमुख) येथून जल घेऊन जाण्याची. या पवित्र तीर्थाचे महत्व पुराणांमध्येही उल्लेखले गेले असून, येथे मिळणाऱ्या जलाची तुलना गंगेच्या जलाशी केली जाते.

विरजतीर्थ हे फक्त विदर्भ नव्हे तर मराठवाडा, खानदेशसह अनेक भागांतील शिवभक्तांचे श्रद्धास्थान बनले आहे. येथे दरवर्षी श्रावण महिन्यात हजारो भक्त कावड यात्रा घेऊन येतात व जल उचलून भगवान शंकराच्या मंदिरात जलाभिषेक करतात. परंतु, यंदा पुरातत्व विभागाने अचानक विरजतीर्थातून जल उचलण्यावर बंदी घातली आहे, ज्यामुळे शिवभक्तांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

या संदर्भात शिवसेना जिल्हाप्रमुख प्रा. बळीराम मापारी यांनी माहिती देताना सांगितले की, ''विरजतीर्थ हे हिंदू धर्मातील एक पवित्र तीर्थक्षेत्र आहे. कोरोनाच्या आधी कधीही येथे भक्तांना अडवले गेले नव्हते. परंतु, सध्या पुरातत्व विभाग वेळोवेळी अडथळे निर्माण करत असून, ही शिवभक्तांच्या श्रद्धेची थट्टा आहे.'' आज श्रावणातील पहिल्या सोमवारी बाहेर गावावरून कावडी यात्रा लोणारच्या विरजतीर्थावर येणार आहेत. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून भक्तांना जल उचलण्याची परवानगी देण्याबाबत सकारात्मक भूमिका घेतली आहे, असेही मापारी यांनी सांगितले.

कावड यात्रा ही केवळ एक धार्मिक परंपरा नसून भक्ती, त्याग आणि समर्पणाचा भाव व्यक्त करणारी प्रक्रिया आहे. कावड यात्रांचेही वेगवेगळे प्रकार असतात - साधारण कावड, डाक कावड, खडी कावड, बर्फानी कावड इत्यादी. शेकडो मैल पायी चालत, तहानभूक विसरून, भक्त पवित्र जल घेऊन जातात. ही यात्रा धार्मिक व अध्यात्मिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्वची मानली जाते. ''जर येत्या सोमवारी कावड यात्रेकरूंना विरजतीर्थाचे जल उचलण्यास अडवले गेले, तर शिवसेना रस्त्यावर उतरेल. लोणार बंद किंवा रस्ता रोको आंदोलन छेडले जाईल,'' असा इशाराही प्रा. बळीराम मापारी यांनी दिला आहे. लोणारच्या भाविकांसाठी श्रद्धेचे प्रतीक असलेल्या या तीर्थावर बंदी कायम राहिल्यास, धार्मिक भावना दुखावल्या जाण्याची शक्यता असून प्रशासनाने तातडीने लक्ष घालून योग्य निर्णय घ्यावा, अशी मागणी आता जोर धरत आहे.

## सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी घेतला सहकार विभागाचा आढावा



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**बुलडाणा दि.२७ :** सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आज खामगाव येथील ब्रिटिशकालीन विश्रामगृहात जिल्ह्यातील शासकीय सहकार क्षेत्रातील अधिकाऱ्यांची आढावा बैठक पार पडली. या बैठकीत जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या कामकाजाचा तसेच खरीप हंगामातील पीककर्ज वितरणासंबंधी सविस्तर आढावा घेण्यात आला.

या बैठकीस माजी आमदार दिलीप कुमार सानंदा, खामगावचे अप्पर पोलीस अधीक्षक श्रेणिक लोढा, जिल्हा उपनिबंधक महेंद्र चव्हाण (सहकारी संस्था, बुलढाणा), जिल्हा बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अशोक खरात, गजानन आमले (सहायक निबंधक, बुलढाणा), महेश कृपलानी (सहायक निबंधक, जळगाव जामोद), गजानन फाटे (सहायक निबंधक, मलकापूर), दाते (सहायक निबंधक, शेगाव), शितोळे मॅडम (सहायक निबंधक, देऊळगाव राजा), अविनाश सांगळे (सहायक निबंधक, मेहकर), विजय ठाकरे (तालुका लेखापरीक्षक, खामगाव), सुभाष हिवरखेडे (लेखा परीक्षक श्रेणी-१), सुभाष सपाटे (उपलेखा परीक्षक, खामगाव) यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. बैठकीदरम्यान मंत्री पाटील यांनी सहकारी संस्थांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता व शेतकऱ्यांपर्यंत लाभ पोहोचवण्यावर भर देण्याचे निर्देश दिले. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर अधिकाधिक शेतकऱ्यांना वेळेवर व पुरेसे कर्ज मिळावे, यासाठी यंत्रणांनी समन्वयाने कार्य करण्याचे त्यांनी सांगितले.

## डोंगर खंडाळ्यात नागरी समस्यांचा डोंगर; ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**चिखली दि.२७ :** बुलढाणा तालुक्यातील डोंगर खंडाळा गावात विविध नागरी सुविधांचा अभाव असून ग्रामपंचायतीकडून होत असलेल्या दुर्लक्षामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. गावात नाल्यांमध्ये घाण साचली असून, रस्त्यावर कचऱ्याचे ढीग पडले आहेत. नळाला पाणी येत नाही, तसेच सांडपाणी रस्त्यावरून वाहत असल्याने डासांचे प्रमाण वाढून आजारांचे संकट गडद झाले आहे.

ग्रामपंचायत प्रशासन फक्त बघ्याची भूमिका घेत असल्याचे गावात चित्र आहे. गावात कचरा व्यवस्थापनासाठी बांधण्यात आलेले डंपिंग हाऊस वापरातच आलेले नाही. सुरुवातीला ठिकठिकाणी कचराकुंड्या लावून फोटोसेशन झाले, पण आज त्या कुठेही दिसत नाहीत. ग्रामस्थांचा संताप ''सुविधा नाही तर टॅक्स नाही'' ग्रामस्थ एकनाथ माऊली सावळे म्हणाले, ''गावात लाईट नाही, गटार साचलेले आहे, पाणी नाही, त्यामुळे आजार वाढत आहेत. आम्हाला जर सुविधा मिळत नसतील तर आम्ही टॅक्स का भरायचा?''

**बँकेसमोर कचऱ्याचा ढीग:** ग्राहक त्रस्त सेंट्रल बँक ऑफ इंडिया चे व्यवस्थापक अभिजीत चव्हाण यांनी सांगितले, ''बाजार गल्लीतील कचरा बँकेसमोर टाकला जातो. पावसाळ्यात वास सुटतो, त्यामुळे ग्राहकांना त्रास होतो. प्रशासनाने त्वरित हा कचरा उचलावा.'' ग्रामपंचायतीतील प्रशासन ठप्प सरपंच प्रज्ञा कांबळे (गोराडे) यांनी सांगितले की, ''उपसरपंच व सदस्य वारंवार सभा चुकवत आहेत. कामांना कार्यारंभ आदेश दिला जात नाही. सरपंच व सचिव यांच्या खातेबदलासही विरोध होतो आहे. त्याामुळे सुविधा पुरवण्यात अडथळा येतो आहे.'' ग्रामस्थांनी प्रशासनाकडे तातडीने स्वच्छता, पाणी, लाईट व कचरा व्यवस्थापनाची मागणी केली आहे.

## राजू पाटील मित्र मंडळ व्हाट्सअप ग्रुपतर्फे वृक्षारोपण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी



**मलकापुर दि.२७ :** पर्यावरण समतोल राखण्यासाठी वृक्ष संवर्धन आपले आद्य कर्तव्य आहे अशा उदात्त भावनेने राजू पाटील मित्र मंडळ व्हाट्सअप ग्रुप च्या माध्यमातून दि. २७ जुलै रोजी शहरातील बोदवड रोड परिसरात रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करीत वृक्ष संरक्षणाकरिता ट्री गार्ड व पाण्याची व्यवस्था करून वृक्षारोपण व संवर्धन उपक्रम राबविण्यात आले.

सोशल मीडियाचा योग्य वापर व्हावा अशा उदात्त हेतूने राजू पाटील मित्र मंडळ या व्हाट्सअप ग्रुप वर असणारे सदस्य मलकापूर परिसरात विविध सामाजिक व धार्मिक उपक्रम राबवित आहेत. त्याचाच एक भाग म्हणून निसर्गाप्रती प्रेम व पर्यावरण संरक्षण व्हावे अशा उदात्त हेतूने बोदवड रोड परिसरात रस्त्याच्या दुतर्फा वड, पिंपळ, निम, सिसम, कडू बदाम सारखे आवश्यक वृक्ष लावण्यात आले. या वृक्षांचे संवर्धन व्हावे याकरिता ट्री गार्ड तयार करून त्यांच्या भोवती लावण्यात आले. परिसरातील नागरिकांना संगोपनाची जबाबदारी देण्यात आली. पत्रकार हनुमान जगताप, स्वातीताई देशमुख, राजू पाटील, किसनराव पाटील, अनिल तांदुळकर ,श्याम चव्हाण,अक्षय पाटील ,शुभम शेबेकर,रामेश्वर गोरले, निलेश वानखेडे ,राहुल जैन, गोलू बांगडे, सुनील बेलोकार, सर,गजानन वायडे , प्रदीप ढोकणे ,सागर ढोकणे ,प्रकाश रतपारखी, आशिष पाटील यांच्यासह आदींनी अथक परिश्रम घेतले.

# संत गजानन महाराज पालखीचे मेहकरात जोरदार स्वागत

## भाविकांकडून शहरातील चौका-चौकात जेसीबीवरून फुलांची उधळण

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी





**मेहकर दि.२७ :** पंढरपूर वरून परत निघालेल्या संत गजानन महाराज पालखीचे मेहकरात २६ जुलै रोजी आगमन होताच जल्लोषात स्वागत करण्यात आले.ठिकठिकाणी जेसीबी वरून फुलांची उधळण करण्यात आली. अंदाजे चार साडेचारचे दरम्यान संत गजानन महाराज पालखीचे मेहकर शहरात आगमन होताच खामगाव नाक्यावर चंद्रेश्वर व्यायाम शाळेसमोर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) आमदार सिद्धार्थ खरात यांनी श्रींचे दर्शन घेऊन वारकऱ्यांचे स्वागत केले.

यावेळी त्यांच्यासोबत उपजिल्हाप्रमुख आशिष रहाटे, तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, शहरप्रमुख किशोर गारोळे, युवासेना तालुका अधिकारी आकाश घोडे , शिवसेनेचे संजय वडतकर संदीप गवई सह शिवसैनिक उपस्थित होते. तर याच ठिकाणी नपाच्या वतीनेही पालखीचे स्वागत करण्यात आले. नगरपरिषद मुख्याधिकारी रामराजे कापरे, कार्यालय अधीक्षक अजय चैताणे, आरोग्य निरीक्षक अख्तर भाई, बांधकामचे विशाल शिरपुरकर,पाणीपुरवठा विभागाचे शेख जफर, लेखाविभागाचे अनिल मुळे सह न.पा. कर्मचाऱ्यांनी श्री चे दर्शन घेऊन पालखीचे स्वागत केले. शहरात ठिकठिकाणी मेहकर मधील भक्तमंडळींनी जेसीबी वरून फुलांची उधळण करत श्रींचे दर्शन घेतले तर महिला वर्गाने आपल्या घरासमोर, प्रतिष्ठान समोर रांगोळ्या काढुन पालखीचे स्वागत केले.

यावेळी बऱ्याच ठिकाणी भक्त मंडळींनी वारकऱ्यांना विविध वस्तूच्या रूपात प्रसादाचे सुद्धा वाटप केले. पालखीचा रात्री मुक्काम येथील श्री शिवाजी हायस्कूल मध्ये होता. श्री चे दर्शन घेण्यासाठी मेहकर शहरासह तालुक्यातील भक्त मंडळींनी मोठी गर्दी केली होती.

यावेळी पोलीस निरीक्षक व्यंकटेश्वर आलेवार सह पोलीस प्रशासनाने चोख बंदोबस्त ठेवला होता.

## कॉंग्रेस नेते श्याम उमाळकर यांनी घेतले 'श्रीं'चे दर्शन



अजिंक्य भारत/ प्रतिनिधी

**मेहकर दि.२७ :** आज मेहकर नगरीत श्री संत गजानन महाराज यांच्या पालखीचे उत्साहात आणि भक्तिभावाने जंगी स्वागत करण्यात आले. शहरातील प्रमुख रस्ते फुलांनी आणि भगव्या पताकांनी सजवण्यात आले होते. भजन, कीर्तन, ढोल-ताशा पथकांच्या गजरात पालखी नगरात दाखल झाली. या भक्तिपूर्ण सोहळ्यात काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते श्यामभाऊ उमाळकर यांनी पालखीचे दर्शन घेऊन श्रींचे आशीर्वाद घेतले. त्यांनी पुष्पहार अर्पण करत महाराजांच्या चरणी नतमस्तक होत मनोभावे प्रार्थना केली. यावेळी काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते, पदाधिकारी, शहरातील नागरिक आणि महिला भगिनींचा मोठा सहभाग होता. पालखी स्वागत समितीच्या वतीने विशेष आयोजन करण्यात आले होते. दर्शनानंतर पालखी पुढील मुक्कामी मार्गस्थ झाली. मेहकर शहराने आजच्या दिवशी भक्ती, एकोपा आणि सामाजिक सलोखा यांचे सुंदर दर्शन घडवले.

## संत गजानन महाराजांच्या जय घोषाने दुमदुमली लोणार नगरी

अजिंक्य भारत/ प्रतिनिधी




**लोणार दि.२७ :** लोणार शहरात संत श्री गजानन महाराज यांच्या पालकीचे काल संध्याकाळी ४ वाजता आगमन झाले लोणार च्या धारा तीर्थ जवळ लोणार मेहरकचे आमदार सिद्धार्थ खरात, न. प. च्या मुख्याधिकारी, तालुका पत्रकार संघ, तथा राजकीय नेत्यांनी पालखी चे स्वागत केले.

यावेळी गजानन महाराजाचे दर्शन घेतले तेथून पुढे पालकी लोणार धार रोड, पोलीस स्टेशन, जामा मजिद चौक, बसस्टँड रोड, लोणी रोड ने पालकी विसावा ठिकाण दि ग्रँड विश्वनाथ मंगल कार्यालय येथे आली तेथे इरतकर परिवाराकडून पालकी चे व गजानन महाराजांचे स्वागत व पूजन करण्यात आले

**फटाके आणि आतषबाजीने भरलेला उत्साह** दिंडीने लोणार मध्ये प्रवेश करताना भाविकांनी फटाके आणि आतषबाजीने उत्साहाने स्वागत केले. भक्तीगीतांसह संपूर्ण वातावरण संत गजानन महाराजांच्या घोषणांनी गुंजले. भाविकांनी पालखीला फुलांच्या हारांनी आणि रंगीबेरंगी गुलालाने सजवले, ज्यामुळे देखावा आणखी नयनरम्य झाला.

## अंढेरा गावाचे आराध्य दैवत श्री औन्ढेश्वर एक जागृत देवस्थान

ज्ञानेश्वर मस्के/ प्रतिनिधी

### श्रावण सोमवार विशेष



**अंढेरा दि.२७ :** अंढेरा येथे श्री. औन्ढेश्वरभगवान यांचे भव्य जुने मंदीर असुन येथील महादेवाची पिंड राम कालीन आहे. तेत्र युगात महादेवाच्या पिंडीची स्थापना राम-सिता-लक्ष्मण यांच्या हस्ते झाल्याची आख्यायिका आहे.

येथील महादेवाची पिंड ही हिंगोली जिल्ह्यातील बारा ज्योतीरलिंग असलेले औंढा नागनाथ येथुन तयार करुन आणलेली आहे.म्हणुनच त्याांचे नाव औन्ढेश्वरपडले आहे. तर गावाचे नाव आडविहीर होते. परंतुऔन्ढेश्वरनावावरुन गावाचे नाव अंढेरा पडले. यल्होजी बाबा हे सिद्ध पुरुष होते. त्यांना रिधी-सिधी प्राप्त असल्यामुळे अंढेरा गावाला तलाव बनवण्यासाठी नदी पात्र अडवण्यासाठी त्यांनी पाळु टाकुन नदी आडवण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे संपूर्ण महादेवाची पिंड पाण्यात जाणार होती. म्हणुन महादेवाची पिंड ही बारा ज्योतिर्लिंग असणारे औंढा नागनाथ येथुन तयार करून आणलेली आहे. सुरुवातीला त्याचे बांधकाम येलोजी बाबा यांनी ओट्याचे बांधकाम केले. पुढे स्व.ह.भ.प.ताठे महाराजयांनी गावकऱ्याच्या सहकार्याने गावात भव्य असे मंदीर उभे केले. औन्ढेश्वर हे गावाचे आराध्य दैवत असुन जागृत देवस्थान म्हणून संपुर्ण जिल्हाभर प्रसिध्द आहे. येथे सर्व मनोकामना पुर्ण होतात व श्रावण महिन्यात भाविक भक्त येथे मोठ्या संख्येने दर्शनासाठी येतात. संपुर्ण श्रावण महिन्यात दिवसभर मोठ्या संख्येने महिला तसेच पुरुषांची दर्शनासाठी गर्दी होत असते. भाविक भक्त श्रावण सोमवारी मंदीरामध्ये मोठ्या संख्येने बेल वाहतात व उपवास करतात. येथे जिल्ह्यातील सर्वात मोठी महादेवाची पिंड पाहावयास मिळते. येथे दरवर्षी महाशिवराञी निमीत्त अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात येते.येथे परिसरातुन श्रावण महिन्यात मोठ्या प्रमाणात भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. असे हे अंढेरा गावचे आराध्य दैवतश्री औन्ढेश्वर जागृत देवस्थान असुन चैत्र अमावस्याला येथे भव्य यात्रा भरते.

## थोडक्यात

### कोरोना काळात बंद झालेली रिसोड-परभणी बस पुन्हा सुरू



**रिसोड :** रिसोड परभणी ही एस.टी. बस सेवा मागील ३० ते ३५ वर्षापासून सुरु होती; मात्र कोरोना काळानंतर ही सेवा बंद करण्यात आली होती. त्यामुळे मराठवाड्यातील साखरा, चिंचांबाभर, वेलतुरा, आगरवाडी या गावांतील नागरिकांसह विद्यार्थी वर्गालाही परभणी व जिंतूर शहरांमध्ये जाण्या-येण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. आता बस सेवा पुन्हा सुरु करण्यात आली. २४ जुलैपासून रिसोड परभणी ही बस सेवा साखरा मार्गे पुन्हा सुरू करण्यात आली. त्यामुळे मार्गावरील अनेक गावांमधील नागरिकांना दिलासा मिळाला. बस सेवा पुन्हा सुक्त झाल्यानंतर स्थानिक नागरिकांनी चालक व वाहक यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.

### जमीन वाटणीपत्रक शुल्क माफीत तहसीलदारांचा आदेश आवश्यक

**वाशिम :** शेतकऱ्यांनी मुलांना अथवा सहधारकांनी आपापसात जमिनीचे वाटणीपत्र करायचे असल्यास स्टॅम्प ड्युटी आणि नोंदणी शुल्क माफ व्हावे, यासाठी तहसीलदारांचा आदेश आवश्यक आहे, असे स्पष्टपणे शासनाने नुकत्याच जाहीर केलेल्या राजपत्रात नमूद केले आहे.

महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या घोषणेनंतर, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ च्या कलम ८५ अन्वये तहसीलदारांचे आदेश घेऊनच वाटणीपत्रक नोंदणी शुल्कात सवलत मिळणार आहे. अन्यथा, सर्व शुल्क भरूनच नोंदणी करावी लागणार आहे. राजपत्रानुसार, शेतजमिनीच्या वाटपाच्या संलेखांवर नोंदणी शुल्क माफ असले, तरी ते फक्त तहसीलदारांकडून आदेश घेतल्यावरच लागू होईल. आधी भरलेले शुल्क परत मिळणार नाही.

### बाजार समित्यांमध्ये सोयाबीनच्या दरात वाढ, आवक घटली!

**वाशिम:** जिल्ह्यातील बाजार समित्यांमध्ये सोयाबीनच्या दरात सतत वाढ होत असल्याचे दिसून येत आहे. शनिवारी कारंजा बाजार समितीत सोयाबीनला कमाल ४ हजार ४८५ रुपये प्रती क्विंटल, रिसोड बाजार समितीत ४ हजार ४५० रुपये प्रती क्विंटल, तर मानोरा बाजार समितीतही ४ हजार ४६० रुपये प्रती क्विंटलपर्यंतचा दर मिळाला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असले तरी बाजार समित्यांमध्ये आवक मात्र कमीच होत आहे. शनिवारी या तिन्ही बाजार समित्यांमध्ये एकूण १ हजार ६५० क्विंटल सोयाबीनचीच आवक झाली होती. शेतकरी खरीप हंगामात व्यस्त असल्याने सध्या बाजार समित्यांमध्ये शेतमालाची आवक काहीशी घटली आहे. दरम्यान, सोयाबीनच्या मागणीत वाढ होत असल्याने दरात आणखी वाढ होण्याची शक्यता तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे.

### शिवीगाळ व मारहाण प्रकरणी तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**मगरूळपीर :** पेडगाव येथे एकास शिवीगाळ आणि मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी तीनजणांविरुद्ध २६ जुलैला पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. विजय गोविंद सुर्वे (वय ४५, रा. पेडगाव) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, १४ जुलैला रात्री आठ वाजण्याच्या सुमारास ते गावातील एका दुकानात घरगुती साहित्य खरेदीसाठी गेले होते. त्यावेळी अजय बाबूलाल भगत (वय २०) याच्या घरासमोरून जात असताना, जुन्या वादातून आणि ''रिपोर्ट का दिला ?'' या कारणावरून अजयने त्यांना शिवीगाळ केली. त्यावर फिर्यादीने जाब विचारताच अजयने रागाच्या भरात अंगावर धावून जात हातातील फायटर ने डोक्यावर वार केला, यानंतर अजयचे भाऊ अक्षय भगत (१९) आणि विजय भगत (१८) यांनीही विजय सुर्वे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली, तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. अशा फिर्यादीवरून मंगरूळपीर पोलिसांनी संबंधित तिघांविरुद्ध संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे.

# अतिवृष्टिमुळे शेकडो हेक्टरवरील पिके उध्वस्त

## रिसोड मालेगाव तालुक्यातील स्थिती: शेतकरी चिंताग्रस्त

। सुरेश गिरी ।

**रिसोड, दि. २७ :** वाशिम जिल्ह्यात गेल्या तिन ते चार दिवसापासुन संततधार पाऊस कोसळत असल्याने नदीनाल्याना मोठा पुर आला असून खरिपातील शेकडो हेक्टर शेतात पाणी साचल्याने शेताला तळ्याचे स्वरुप आले असून सोयाबीन पिकांचे मोठ्यप्रमाणात नासाडी झाली आहे.

रिसोड तालुक्यातील बाळखेडा, धोडप, भापूर, वाकद, शेलुखडसे करडा गोभणी सह अनेक गावांचा संर्पक तुटला असून पैनगंगा नदी तिस-यादा महापुर आल्याने खरिपातील सोयाबीन पिक पुर्णपणे उद्ध्वस्त झाले असून जमीन खरडून गेली आहे तर शेतात पाणी साचल्याने पिकांचे मोठ्यप्रमाणात नुकसान झाले आहे. पाऊसाची तीच तीस्थी कायम असून गेल्या ४८ तासापासुन पाऊसाच्या सरी कोसळणे सुरुचं आहे त्यामुळे नदी नाले दुथडी भरून वाहत असून शेतकरी चिंताग्रस्त झाले आहे.



रिसोड तालुक्यातील पिंप्री सरहद परिसरात रात्री अति मुसळधार पाऊस पडल्यानं उतावळी आणि कांच नद्यांना प्रचंड मोठा पूर येऊन नदी काठची शेकडो हेक्टर शेती पीकांसह खरडून गेली आहे.

त्या मुळं शेतकऱ्यांचं अतोनात नुकसान झालं आहे. या परिसरात शेतक-यांची ऊभी पिक या पुराच्या पाण्यात सोयाबीन,हळद,अंबा सह पिकं खरडून गेलं आणी मोठ मोठे खड्डे पडले केवल फक्त दगड उरली आहे. कारण या शेतामधील सुपीक माती वाहुन गेल्या मुळे या शेतक-यांना उदरनिर्वाह कसा करावा असा प्रश्न पडला आहे. म्हणून शेतक-याचे डोळे शासकीय मदती कडे लागले आहे.

**पैन गंगा नदीवर असलेल्या मेहकर तालुक्यातील पेन टाकळी प्रकल्पात ७२ टक्के पाणी साठा असून पाण्याची आवक सुरूच असल्याने पेन टाकळी प्रकल्पाचे २ दरवाजे २० सेंटी मीटर ने उघडून त्यातून १३३९ क्यूसेक्स प्रति सेकंद एवढा पाणी विसर्ग पैन गंगा नदी पात्रात सोडण्यात येत असल्याने पैन गंगा नदी काठच्या गावांना प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.**

## धोकादायक भटक्या कुत्र्यांच्या दहशतीने कारंजावासी भयभीत

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**कारंजा (लाड), दि. २७ :** कारंजा शहरातील मुख्य रस्त्यासह वार्डातील व शहरातील रस्त्यांवर व चौकात भटक्या कुत्र्यांनी आतंक निर्माण केला आहे. लहान मुलांना शाळेत जाणे येणे करत असतांना त्रास होत आहे. तसेच मोकाट बेवारस कुत्र्याचा त्रासामुळे रात्री बेरात्री घरी जाणे तसेच शाळेतील मुलांना शाळेत जाणे येणे कठीण झाले आहे. यामुळे शाळेत जाणाऱ्या मुलांच्या जिवितास धोका निर्माण झाला आहे. कुत्र्यामुळे पाळीव जनावर गाय बकरी - व इतर कोंबड्या जनावरांना ईजा होत आहे.कारंजा शहरातील एकही परिसर असे नाही ज्या रस्त्यावर भटकी कुत्री नाहीत हे विशेष. त्यांची दहशत शहरातील मोठ्या रस्त्या पासून छोट्या गल्ल्यापर्यंत सुरू आहे.कुत्रे प्रत्येक वस्तीत आणि गल्लीत रोज कोणाला ना कोणाला तरी नक्कीच चावा घेत आहे. भटक्या कुत्र्यांचा त्रास सातत्याने वाढत आहे.

नगर परिषदला नव्याने रुजू झालेले मुख्याधिकारी यांनी स्वता लक्ष देण्याची गरज आहे कारण की संबंधित अधिकारी यांनी आज पर्यंत दुर्लक्ष केले आहे शहरवासीयांचा जीव धोक्यात असतानाही संबंधित अधिकारी याकडे लक्ष देत नसल्याने कुत्रे चावण्याच्या घटनांमध्ये वाढ होत असतानाच कुत्र्यांची संख्याही झपाट्याने वाढत आहे. कारंजा शहरातील एकूण भटक्या कुत्र्यांच्या संख्येबाबत कारंजा नगरपालिका प्रशासनाकडे कोणतीही माहिती नाही. मात्र कारंजा शहरात शेकडो भटक्या कुत्र्यांचे कळप दिसत आहेत. त्यांना पकडले नाही आणि आकड्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी प्रभावी पावले उचलली नाही तर शहरवासीयांसाठी मोठी समस्या निर्माण होईल, याचा अंदाज त्यांच्या आकड्यांवरून लावता येतो. मात्र, आताही हे कुत्रे चावा घेऊन लोकांना जखमी करत आहेत.

## पोलिसांनी वृक्षारोपणासह घेतली वृक्षसंवर्धनाची शपथ

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २७ :** प्रत्येकाला जगण्यासाठी प्राणीवायू अर्थात ऑक्सिजनची गरज असते. आणि तो देण्याचे काम झाडे म्हणजेच वृक्ष करत असतात, हे सर्वांनाच मान्य आहे. मात्र, शहरीकरणाच्या नादात अनेक ठिकाणी झाडे तोडले जातात आणि प्रदूषण वाढीला वाव मिळतो. त्याचा कळत-नकळतपणे सर्वांवर परिणाम होतो. त्यापासून वाचण्यासाठी झाडे लावणे आवश्यक आहे.मंगरुळपीर येथील पोलीस स्टेशन परिसरात महिला समुपदेशन केंद्राच्या पुढाकारातुन वृक्षारोपन करण्यात आले.



वृक्षारोपणही काळाची गरज आहे, यात शंकाच नाही. पण, वृक्षारोपणासह वृक्षसंवर्धन हे अत्यंत महत्त्वाचे आहे. हीच महत्त्वाची बाब लक्षात घेऊन महिला समुपदेशनच्या पुढाकारातुन मंगरुळपीर पोलिस स्टेशन परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धन करण्याचा ध्यास घेतला.पर्यावरण अबाधित ठेवण्यासाठी वृक्षसंवर्धनासाठी स्तुत्य पुढाकार घेतल्याने सगळीकडे त्यांचे कौतुक होत आहे. दरम्यान, ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणात कमालीचा बदल झाला आहे. मानवी आक्रमणामुळे जंगलतोड वाढल्याने वन्यजीव, पशुपक्षी वातावरणाला धोका निर्माण झाला आहे. वृक्षतोड हे याचे प्रमुख कारण आहे. परिणामी, अलीकडे मानवाला याचे महत्त्व कळले असून, वृक्षारोपण करण्याकडे अधिकाधिक भर दिला जात आहे. वृक्षारोपण हे महत्त्वाचे आहेच. पण, त्यासोबत त्याचे संवर्धन ही खरी काळाची गरज आहे. वृक्षाचे संवर्धन झाले तरच भविष्यातील पर्यावरण अबाधित राहील. वृक्षारोपणासोबतच वृक्षसंवर्धन करावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले.यावेळी महिला समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशन मंगरूळपीर जिल्हा वाशिम यांचेसह ठाणेदार किशोर शेळके, एपिआय गणेश काळे,पिएसआय ज्ञानेश्वर धावडे, संरक्षण अधिकारी आर एन सुरजुसे ,महिला समुपदेशन केंद्र पोलीस स्टेशनचे कर्मचारी संतोष भगत पोलिस कर्मचारी रमेश जाधव, प्रमोद थोरवे, प्रमोद वानखडे, प्रवीण माळकर, मनीष आढे, संतोष बारड, रफिक मांजरे,विनोद मनवर, योगेश भातुलकर ओंकार खिराडे यांचेसह पोलिस कर्मचारी हजर होते.

## मुख्यमंत्र्यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळावा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**मंगरुळपीर, दि. २७ :** महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसा निमित्य मंगरुळपीर वाशिम, कारंजा मानोरा, रिसोड-मालेगांव या मतदार संघातील १६ मंडलामध्ये रक्तदान शिबीर संपन्न झाले.



संपुर्ण जिल्ह्यामध्ये ७०० रक्तदात्यांनी रक्तदान करुन देवेद्रजींना शुभेच्छा दिल्यात या प्रसंगी रक्तदात्यांना प्रदेश स्वाक्षरीचे आभार पत्र देण्यात आले तसेच वृक्षारोपन या कार्यक्रमातुन ११०० वृक्षांचे रोपन करण्यात आले वाशिम ,कारंजा,आणि रिसोड, मंगरुळपीर या ठिकाणी शिवलिंग पुजन जलाभिशेक महाआरती , काही मंडामध्ये शैक्षणिक साहित्या वाटप क्रिडा कार्यक्रम व भाजपा मध्ये कार्यकर्त्यांचा प्रवेश तसेच वाशिम शहरात मेन हॉस्पीटलमध्ये फळ वाटप, व वृक्षारोपन तसेच वाशिम येथे संम्मती इंजिरिअरिंग कॉलेजमध्ये भव्य प्रमाणात शासनाच्या वतीने रोजगार मेळावा संपन्न झाला. हे सर्व कार्यक्रम संपन्न व चांगल्याप्रकारे यशस्वीकरण्यासाठी जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी, भाजपा जिल्हाअध्यक्ष, जिल्ह्यातील नेते, कोअर टिम, माजी नगर सेवक, माजी जिपपंचायत समिती पदाधिकारी, तसेच १६ भाजपा मंडल अध्यक्ष त्यांचे सर्व पदाधिकारी, सर्व कार्यकर्त्ये, बुथ प्रमुख, भाजपा सर्व महिला पदाधिकारी, तसेच सर्व रक्तदाते, व भाजपा वर प्रेम करणारे सर्व नागरिक, विविध संघटना, विविध मंडळ, यांचा उत्स्फुर्त सहभाग व या सर्वाच्या प्रचंड अथक परिश्रमामुळे हे कार्यक्रम यशस्वी झाल्याचे जिल्हा भाजपाच्या वतीने एक पत्राकाद्वारे कळविण्यात आले आहे.

## धार्मिक स्थळांवरील विनापरवाना भोंगे दोन दिवसात काढा

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**उंबर्डा बाजार, दि. २७ :** कारंजा लाड ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रविण शिंदे यांनी सर्वोच्च न्यायालयाने निर्गमीत केलेल्या आदेशानुसार विनापरवाना लावलेले सर्व भोंगे काढण्याच्या अनुषंगाने ग्रामीण पोलीस स्टेशन कारंजा येथे बैठक घेतली. या बैठकीत धार्मिक स्थळांवर विना परवाना असलेले भोंगे दोन दिवसात काढण्याच्या सूचना दिल्या गेल्या आहेत. सदर बैठकीमध्ये मंदिर, मस्जीद, बौद्ध विहार येथील धर्मगुरु, अध्यक्ष, पदाधिकारी, मौलवी, भंतेजी तसेच सर्व शांतता समिती सदस्य, पत्रकार उपस्थित होते. बैठकीमध्ये पोलीस महासंचालक यांचे स्थायी आदेश क्रमांक ०२/२०२५ अन्वये निर्गमित करण्यात आलेल्या परिपत्रकाची व ध्वनीप्रदूषण अधिनियम कायद्याबाबतची माहिती देण्यात आली, तसेच महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार व मार्गदर्शन सुचनेनुसार आपण यापुढे परवानगी घेऊनच कायदेशीर बाबींची पूर्तता करूनच रितसर नियमानुसार पोलीस स्टेशनची परवानगी घेऊन ध्वनीप्रदूषण कायद्याच्या नियमांचे पालन करून भोंगे लावावे. मंदिर, मस्जीद, बौद्ध विहार, गुरुद्वारा अशा ठिकाणी विनापरवानगी लावण्यात आलेले भोंगे दोन दिवसामध्ये काढून घ्यावे, अशी सूचना उपस्थितांना देण्यात आली. ग्रामीण पोलीस स्टेशनतर्फे पथक नेमण्यात येणार आहे. सदर पथक हे संपूर्ण कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत फिरणार आहे. सदर पथकाच्या निर्देशनास विनापरवानगी भोंगे आढळून आल्यास संबंधित प्रार्थना स्थळावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे बैठकीत सांगण्यात आले.



## रेखाकला परीक्षेच्या शुल्कवाढीमुळे शिक्षक पालकांची नाराजी!

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजीएट ग्रेड) परीक्षेच्या शुल्कात शैक्षणिक वर्ष २०२५ साठी करण्यात आलेल्या दुप्पट वाढीविरोधात विदर्भ कलाशिक्षक संघ, वाशिमच्या वतीने मा. मंगल धुपे मॅडम, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद वाशिम यांना विदर्भ कला शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष विनोद इंगोले यांच्या मार्गदर्शनात तसेच विदर्भ अध्यक्ष अनिल लांडे यांच्या नेतृत्वात निवेदन सादर करण्यात आले.





गेल्या अनेक वर्षांपासून कला संचालनालयामार्फत शालेय स्तरावर रेखाकला परीक्षा आयोजित केली जाते. या परीक्षेमध्ये राज्यासह इतर राज्यांतील ८ लाखांहून अधिक विद्यार्थी सहभागी होतात. ही परीक्षा विद्यार्थ्यांमध्ये कलाबोध वाढवून भारतीय संस्कृती जोपासण्यास मदत करते. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकरी, शेतमजूर व मोलमजुरी करणाऱ्या गरीब कुटुंबातील विद्यार्थी मोठ्या संख्येने या परीक्षेत सहभागी होतात. परंतु यंदा एलिमेंटरी ग्रेडचे शुल्क ५० रूपयांवरून १०० रुपये व इंटरमिजीएट ग्रेडचे शुल्क १०० रूपयांवरून २०० रुपये करण्यात आले आहे. ही दुप्पट वाढ सामान्य व आर्थिकदृष्ट्या दुर्बल वर्गातील विद्यार्थ्यांवर अन्याय करणारी ठरत आहे. वाढलेले रंगसाहित्याचे दर, प्रवास खर्च व आर्थिक अडचणी यामुळे अनेक विद्यार्थी परीक्षेस वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. सदर निर्णयाविरोधात विदर्भ कलाशिक्षक संघाच्या वतीने त्वरीत शुल्कवाढीचे परिपत्रक मागे घेऊन पूर्वीप्रमाणे ५० व १०० रूपये शुल्क निश्चित करून सुधारित परिपत्रक काढण्याची मागणी करण्यात आली आहे. या वेळी विदर्भ कलाशिक्षक संघाचे केंद्रीय सरचिटणीस गोपाल गावंडे, मा. विभागीय उपाध्यक्ष जगदीश नखाते, जिल्हाध्यक्ष अमोल काळे, उपाध्यक्ष राजेश गोटे, महिला प्रतिनिधी कु. कीर्ती सातव, परीक्षा केंद्र संचालक बब्रुवहन वैद्य, संजय दळवी, संदीप आरु,अशोक बोंद्रे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

# भाजपाची जम्बो जिल्हा कार्यकारिणी जाहीर

           

दै. अजिंक्य भारत । प्रतिनिधी

**वाशिम, दि. २७ :** भारतीय जनता पार्टी चे जिल्हाध्यक्ष पुरुषोत्तम चितलांगे यांनी जुन्या नवीन कार्यकर्त्यांना पक्षात संधी देवून जम्बो कार्यकारीणी घोषीत केली आहे.

या कार्यकारीणीमधे जिल्हा सरचिटणीसपदी गजानन लाटे, डॉ. राजीव काळे, गणेश खंडाळकर, संगिता इंगोले यांची निवड करण्यात आली आहे. उपाध्यक्षपदी सुनिल राजे, धनजंय रणखांब, सतिष हिवरकर, संतोष शिंदे, संतोष मवाळ, राम जाधव, डॉ. दिपक ढोके, सविता काळे, किसनराव माळेकर, मोहन बळी, चिटणीसपदी गणेश ईरतकर, गजानन नवघरे, डॉ. संजय राऊत, नवीन शर्मा, करुणा कल्ले, वैशाली काळे, पंकज देशमुख, डॉ. जयश्री गुट्टे, कोषाध्यक्ष मिठूलाल शर्मा, जिल्हा प्रचार प्रमुख निलेश सोमाणी, सोशल मिडीया प्रमुख गोपाल वर्मा, कार्यकारीणी सदस्यपदी विकल पवार, ग्यानसिंग पडवळ, प्रदिप भगत, प्रकाश कडू, विजयमाला आसनकर, प्रणिता महाजन, प्रांजली पाध्ये, मनोरमा ठाकूर, भानुप्रतापसिंह ठाकूर, अनिल ताजणे, श्रीभाऊ कंठाळे, मोहन चौधरी, बाबाराव महाले, धनंजय हेंद्रे, निलेश जैयस्वाल, महेंद्र लोढाया, नंदकिशोर मगर, लखनसिंह ठाकूर, शरद कऱ्हे, राजेश चंदन, अन्नपूर्णा पांडे, प्रल्हाद गोरे, गजानन लाहे, संतोष वानखेडे, अमित मानकर, अंजली पाठक, उषा वानखेडे, कु. भावना सरनाईक, डॉ. अरविंद यावलकर, राजेंद्र देशमुख, संजय केकण, दिलीपसिंह रघुवंशी, प्रा. ज्ञानेश्वर काळे, डॉ. दिलीप रत्नपारखी, विरेंद्रसिंह ठाकूर, प्रशांत रत्नपारखी, गोपाल लुंगे, सुनिल मसने, संदिप पिंपरकर, नितीन काळे, अजहर मिर्झा बेग, प्रशांत वाघ, रेखा गावंडे, सोनाली गरजे, वनमाला ढगे, दिलीप दवंडे, गजानन गोटे, कैलास महाजन, वामनराव अंभोरे, ज्योती बजाज, मोहसिन खान, प्रसन्नजीत देशमुख, भागवत देशमुख, विनोद नरवाडे, गोविंद सानप, बादशाह धामणे, प्रभाकर पद्मणे, चंदा कोळकर, जितेंद्र राठोड, संगिता आढाव, रामकृष्ण नागरे, अंबादास कालापाड, विष्णू नागरे, जगदीश काबरा, युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी ॲड. प्रदिप देशमुख, महिला मोर्चा जिल्हाध्यक्षपदी कविता खराट, ओबीसी मोर्चा जिल्हाध्यक्षपदी रामेश्वर ठेंगळे, अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्षपदी राजाभैय्या पवार, आदिवासी मोर्चा अध्यक्षपदी रवि पकमोडे, किसान मोर्चा अध्यक्षपदी गंगादिप राऊत, अल्पसंख्याक मोर्चा अध्यक्षपदी शारीक सौदागर अ. नजीर, कामगार आघाडी प्रकोष सेल संयोजक रामा इंगळे, व्यापारी आघाडी नंदकिशोर पाटील, उद्योग आघाडी भिमकुमार जिवनाणी, उत्तर भारतीय आशिष ठाकूर, दक्षिण भारतीय राजेंद्र कलवार, भटके विमुक्त जाती आघाडी संतोष मुरकूटे, वैद्यकीय सेल डॉ. अविनाश लोथे, कायदा सेल ॲड. मदन जाधव, सहकार सेल मारोतीराव लादे, ट्रान्सपोर्ट सेल पवन जोगदंड, सोशल मिडीया सेल जिग्नेश लोढाया, माजी सैनिक सेल नारायणराव सानप, जेष्ठ कार्यकर्ता सेल महादेव ठाकरे, दिव्यांग सेल विश्वास ब्रम्हेकर, बुध्दीजीवी सेल डॉ. सुहास देशमुख, शिक्षक सेल प्राध्यापक मंगेश धानोरकर, अध्यात्मीक सेल शिवशंकर भोयर, क्रिडा सेल सुमित मुंदरे, जैन प्रकोष्ट विनीत गोलेच्छा, सांस्कृतीक सेल डि.के. सरदार, आयटी सेल वैभव चव्हाण, आयुष्यमान भारत संतोष घुगे, पंचायत राज व ग्रामविकास चंद्रकांत पाटील, राजस्थान प्रकोष्ट सारंग निर्बाण, बेटी बचाव बेटी पढाव कपील सारडा, पदवीधर सेल महादेवराव बुरे, फ्रेड्स ऑफ बीजेपी सुनिल बेलोकार, अभियंता सेल इंजि. अमोल महाजन यांची नियुक्ती केली आहे.

# अजिंक्य भारत
# आपला जिल्हा

अकोला । सोमवार, दि. २८ जुलै २०२५



## थोडक्यात

### भाजपा कुरणखेड मंडळ चिटणीस पदी अमन महल्ले यांची निवड



**कुरणखेड :** मंडळात धार्मिक सामाजिक कार्यात त्याचबरोबर पक्षाने दिलेल्या प्रत्येक आदेशाचे पालन करून पक्षाच्या आदेश मानत प्रत्येक उपक्रम राबवणारे येथील ग्रामपंचायत सदस्य भाजपाचा युवा तरुण चेहरा असलेले अमन विलासराव महल्ले यांची भाजपा कुरणखेड मंडळ चिटणीसपदी निवड करण्यात आली. गेल्या अनेक वर्षापासून भारतीय जनता पार्टीमध्ये काम करत आहे भाजपा अकोला व मूर्तिजापूर दोन्ही तालुक्याच्या भाग येत असलेल्या कुरणखेड मंडलच्या तालुका चिटणीस या प्रमुखपदी अमन पाटील महल्ले यांची नियुक्ती करण्यात आली आहे यामुळे कुरणखेड मंडळात भाजपमध्ये अनेक नवीन युवा चेहरे सहभागी होऊन पक्ष बळकट होणार आहे त्याचबरोबर पक्षाचे ध्येय धोरण राबवणार असल्याचे अमन महल्ले यांनी यावेळी सांगितली.

### अकोट ग्रामीण पोलिसांची जुगारवरा कारवाई



**अकोट :** ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार अकोट ते बोर्डी रोड वरील अब्दुल सलीम अब्दुल जलील यांच्या शेताच्या बाजूला असलेल्या झोपडी जवळील झाडाखाली काही लोक पैशाच्या हारजितीवर जुगार खेळत आहेत.त्या ठिकाणी पंचांसमक्ष छापामार कारवाई केली असता आरोपी शेख अक्रम शेख मुस्तफा,अंदर अली खुर्शिद अली,समीर खान शेर खान,मोहम्मद सलीम मोहम्मद अकबर,शेख अयुब शेख सत्तार,मोहम्मद अकिल मोहम्मद मुजेदार,फिरोझ अली जमीर अली,सर्व राहणार अकोट या आरोपी विरुद्ध कारवाई करण्यात आली असून त्यांच्या विरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.त्यांच्या अंगझडती दरम्यान ३५६० रुपये नगदी व ६ मोबाईल किंमत ७१००० रुपये,४ मोटारसायकल किंमत २,५०,००० रुपये,असा एकूण ३ लाख ३४ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई अकोट ग्रामीण पोलिस स्टेशनचे ठाणेदार किशोर जुनघरे यांच्या मार्गदर्शनात उमेश सोळंके,हरीश सोनवणे,शिवकुमार तोमर,वासुदेव ठोसरे,राजेश माळेकर,सुनील पाटील,यांनी केली आहे.

### सेवा सहकारी सोसायटीच्या अध्यक्षपदी संजय खोडे यांची अविरोध निवड



**दानापूर :** येथील सेवा सहकारी सोसायटीची अध्यक्षपदाची निवड खरेदी-विक्री कार्यालय तेल्हारा येथे पार पडली अध्यक्ष पदाकरता संजय खोडे यांचे एकमेव अर्ज दाखल झाल्यामुळे ही निवडणूक अविरोध करण्यात आली. सेवा सहकारी दानापूर सोसायटीच्या निवडणुकीमध्ये प्रथम अध्यक्ष माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुभाष रौंदळे यांचे गटाचे कैलास रोंदळे यांना करण्यात आले होते त्यानंतर त्यांचा कार्यकाळ समाप्त झाल्यानंतर त्यांनी राजीनामा दिल्यामुळे सेवा सहकारी सोसायटीची निवडणूक घेण्यात आली त्यामध्ये माजी पंचायत समिती सदस्य संदीप पालीवाल यांच्या गटाचे संजय राजाराम खोडे यांना अविरोध अध्यक्ष करण्यात आले तसेच उपाध्यक्षपदी प्रकाश विखे कायम असून हे गोपाल विखे गटाचे आहेत सोसायटीचे सदस्य घायल.हिम्मत वाकोडे. कैलास रौंदळे.बाळकृष्ण सोळंके. रवींद्र नाठे. पंजाब दांदळे . देवलाल अघडते.शाम भालेराव. सुरेश हागे.कमलाबाई ढगे.छाया गौर. उपस्थित होते दानापूर सेवा सहकारी सोसायटीचे अध्यक्षपदी संजय खोडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. निवडणूक अधिकारी एस के विखे अध्यासी अधिकारी ऋषिकेश कोरडे सचिव यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले यावेळी पॅनल प्रमुख सुभाष रौंदळे संदीप पालीवाल गोपाल विखे यांनी दानापूर सेवा सहकारी सोसायटीचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय खोडे यांचे अभिनंदन केले यावेळी उपस्थित माजी सरपंच भोजराज पालीवाल डॉ रामराव मिसाळ माजी सरपंच महादेव वानखडे गोपाल बोरसे निखिल मिसाळ रवींद्र तायडे योगेश अटराळे सुरेश खोडे अशोक नाठे माजी सरपंच. गणेश खोडे बाजीराव विखे तसेच गावातील शेतकरी व नागरिक उपस्थित होते.

## निधन वार्ता

### रविंद्र पवार



**अकोट :** अकोट येथील रविंद्र रुपराव पवार यांचे दि.२७ जुलै रोजी निधन झाले.त्यांची अंत्ययात्रा राहते घर तळोकारपुरा अंजनगाव रोड अकोट येथून २८ जुलै रोजी ११ वाजता निघेल.त्यांच्या मागे आई,वडिल,पत्नी,दोन मुलं,दोन मुली,तीन भाऊ,असा मोठा आप्त परिवार आहे.

# आता मुख्यालयी दिसणार गावचा पटवारी

## विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना फेस अँप जियो आणि फेंसिंग सिस्टम प्रणाली केली बंधनकारक

। देवानंद खिरकर ।




**अकोट, दि. २७ :** याआधी ग्रामीण भागात काम करणारे कर्मचारी, अधिकारी हे दररोज जवळच्या शहरी भागातून आपल्या सांझा येथे ये-जा करत असत.९० टक्के कर्मचारी हे त्यांच्या कामाच्या क्षेत्रात हजरच राहत नव्हते.विशेषतः ज्यांची ज्या गावांमध्ये ड्युटी आहे त्यांची त्या ऑफिसला येण्या-जाण्याची वेळही निश्चित नव्हती. ऑफिस सुरू झाल्यानंतर तासनतास उशिरा येण्याचा आणि बंद होण्याच्या १,२,तास आधी शहरात जाण्याचा खेळ सुरूच होता.

अशा परिस्थितीत तलाठ्यानां भेटता न आल्याने ग्रामीण भागातील लोकांचे काम होत नव्हते.याबाबत आता राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी ही प्रणाली ऑनलाईन आणण्यासाठी एक जोरदार हंटरचा वापर केला आहे.आता विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना फेस अँप जियो और फेंसिंग सिस्टम प्रणाली वापरणे बंधनकारक केले आहे.यामुळे आता महसूल विभागातील सर्व लहान-मोठ्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती त्यांच्या चेहऱ्यावरून होईल.त्यांना त्यांच्या कार्यालयात चेहरा दाखवून उपस्थिती नोंदवावी लागेल अन्यथा त्यांना त्यांचा पगारच मिळणार नाही. असा कडक आदेश काढण्यात आला आहे.त्यामुळे आता गावचा पटवारी मुख्यालयी दिसणार आहे.

या कठोर निर्णयामुळे आता संपूर्ण राज्यातील जनतेला मोठा दिलासा मिळणार आहे.सकाळी कार्यालय उघडण्याची वेळ निश्चित होईल. व सर्व उपविभागीय अधिकारी,,पटवारी,व इतर कर्मचारी हे निश्चितच आपल्या मुख्यालयात हजर दिसतील. महसूल मंत्र्यांचा हा ऐतिहासिक निर्णय असल्याने नागरिक आनंद व्यक्त करत आहेत.या नवीन प्रणालीमुळे कर्मचाऱ्यांच्या कामाच्या पद्धतीतही निच्छितच बदल होईल. हा नियम ऑगस्ट महिन्यापासून लागू होईल,ज्या कर्मचाऱ्यांचे पगार सप्टेंबरमध्ये दिले जातील. जे कर्मचारी फेस अँपद्वारे उपस्थिती नोंदवतील त्यांनाच पगार दिला जाईल.प्रणालीनुसार उपस्थिती नोंदविणाऱ्यांना पगार दिला जाणार नाही.यासंदर्भात स्पष्ट नियम आणि जीआर जारी करणार आहे.

> राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी महसूल विभागातील सर्व कर्मचाऱ्यांना 'फेस अँप जियो और फेंसिंग सिस्टम' प्रणाली वापरणे बंधनकारक केले आहे.ही प्रणाली ऑनलाईन आणण्यासाठी एक जोरदार हंटरचा वापर केला आहे. ही प्रणाली ऑगस्ट पासून सुरु करण्याचे जाहीर केले मात्र अजून हा ऍपच आला नाही त्यामुळे सध्या कर्मचाऱ्यांमध्ये गोंधळाचे वातावरण.
>
> **-राजाभाऊ खामकर** तलाठी शिवपूर

> त्या ऐपसंबंधी आम्हाला सद्या काही इंटरॅक्शन मिळाले नाही, याबाबत उद्या डिटेल समजेल.त्यानंतर सांगू
>
> **- पी.ए.होपळ,** मंडळ अधिकारी अकोलखेड.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेत तालुक्यातील शेतकऱ्यांनी सहभागी व्हावे!

### तालुका कृषी अधिकारी सागर डोंगरे यांचे आवाहन




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**बाळापूर, दि. २७ :** केंद्र सरकारच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या प्रधानमंत्री पिक विमा योजनेत जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन बाळापूर तालुका कृषी अधिकारी सागर डोंगरे यांनी केले आहे.

नैसर्गिक आपत्तीमध्ये अवकाळी पाऊस गारपीट तसेच कीड व रोग यासारख्या कारणामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असते अशा परिस्थितीत प्रधानमंत्री पिक विमा योजना शेतकऱ्यांसाठी मोठा आधार ठरते. त्यामुळे जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी आपली पिक विमा हप्त्याची नोंदणी करून लाभ घ्यावा.

यंदाच्या हंगामासाठी विमा योजनेची अंतिम मुदत ३१ जुलै २०२५ असून मुदतीत शेतकऱ्यांनी नोंदणी आपल्या नजीकच्या सेवा केंद्र सीएससी किंवा कृषी कार्यालयात करून घ्यावी तसेच नोंदणीची ऑनलाईन सुविधा देखील उपलब्ध आहे. योजना शेतकऱ्यांसाठी एक सुरक्षित कवच आहे.

त्यामुळे कोणीही दिरंगाई न करता सर्वांनी सहभाग नोंदवावा तसेच अधिक माहितीसाठी तालुका कृषी अधिकारी कार्यालय येथे संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

### महाबोधी विहार बौद्धांकडे सुपूर्द करा – विजय जाधव

**अकोला :** भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा अकोल्याच्या वतीने आयोजित प्रवचन मालिकेमध्ये बौद्धांची पवित्र स्थळे या विषयावर जिल्ह्याचे कोषाध्यक्ष विजय जाधव यांनी अशोकवाटिका येथे चौथे पुष्प गुंफले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पी. जे. वानखडे हे होते.तसेच मंचावर सरचिटणीस नंदकुमार डोंगरे व महिला अध्यक्षा इंदुताई मेश्राम उपस्थित होत्या. देशातील बौद्धांचे महाबोधी महाविहार हे बौद्धांचे अतिशय महत्त्वाचे स्थळ असून हे बौद्धांच्या हाती देण्यात यावे असे विजय जाधव यांनी मत व्यक्त केले. लुंबिनी, सारणाथ, कुशीनगर, वैशाली, श्रावस्ती, नालंदा, राजगिरी, सांची, चैत्यभूमी आणि दीक्षाभूमी ही सर्व स्थळे बौद्धांची पवित्र स्थळे असून हे संपूर्ण देशासाठी गौरवाची बाब आहे. अध्यक्ष पी.जे. वानखडे यांनी अध्यक्षीय भाषण केले. प्रास्ताविक नंदकुमार डोंगरे यांनी केले.

## साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी होणार हिंदी गीत लोकार्पण

### प्रसिद्ध उद्योजक डॉ सुगत वाघमारे यांनी केले विमोचन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**देवरी, दि. २७ :** साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती महोत्सवाच्या पावनपर्वावर प्रथमच अण्णाभाऊंच्या जीवनकार्यावर आधारित एक हृदयस्पर्शी हिंदी गीताचे विमोचन तिक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेयर सोसायटी अध्यक्ष डॉ सुगत वाघमारे यांच्या हस्ते विमोचन करण्यात आले आहे .हे गीत १ ऑगस्ट रोजी अण्णाभाऊ जयंतीदिनी लोकार्पण करण्यात येणार आहे.

५तीक्ष्णगत मल्टीपर्पज वेल्फेयर सोसायटी अध्यक्ष डॉ सुगत वाघमारे यांच्या हस्ते विमोचित झालेल्या या गीतामध्ये अण्णाभाऊंच्या संघर्षमय जीवनयात्रेला, रशियाचा प्रवास, फकीरा कादंबरीवर बनलेला हिंदी चित्रपट,काव्यसंग्रह व दीड दिवसाचे शिक्षण त्यांच्या लेखणीच्या क्रांतीला, आणि समाजहितासाठी त्यांनी उभारलेल्या लढ्याला एक भावनिक आणि कलात्मक आदरअंजली अर्पण करण्यात आली आहे.हे गीत केवळ एक सांगीतिक रचना नाही, तर ती एक प्रेरणादायी साक्ष आहे ज्यातून अण्णाभाऊंच्या विचारांची, त्यांच्या स्वप्नांची आणि सामाजिक न्यायासाठीच्या लढ्याची गाथा नवीन पिढीपर्यंत पोहोचते. या गीतामधून अण्णा भाऊंची समाज लढ्याची तीव्रता शब्दांतून, आणि संगीताच्या लयींतून अण्णाभाऊ साठे हे नाव पुन्हा एकदा जनमनामध्ये रुजविल्या गेले आहे. या विशेष उपक्रमामध्ये संयोजक उद्योगरत्न डॉ सुगत वाघमारे यांचे मनःपूर्वक अभिनंदन व्यक्त करण्यात आले आहे.त्यांच्यामुळे हे गीत वास्तवात उतरू शकले. अण्णाभाऊ साठे यांच्या एक ऑगस्ट रोजी होणाऱ्या जयंतीनिमित्त पूर्ण भारतामध्ये हे गीत प्रसारित होणार आहे त्यामुळे मातंग समाजामध्ये आज एक नवचैतन्य निर्माण झालेले आहे. सर्वांनी डॉ. सुगत वाघमारे यांचे शब्द सुमनांनी आभार व्यक्त केले तसेच मातंग समाजाच्या हृदयस्पर्शी गीताचे विमोचन.संस्थेचे सचिव विष्णुदास मांडोकार, अण्णाभाऊ साठे सार्वजनिक उत्सव समितीचे पदाधिकारी नवनिर्वाचित अध्यक्ष कृष्णा साठे,कार्याध्यक्ष सोनू खडसे, वामनराव भिसे,प्रकाश दांडगे, पराग कांबळे, गजानन गवळी, भाऊराव सावळे,आनंद तायडे, श्रीकृष्ण बोदडे, भूपेंद्र अंभोरे, अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे संस्थापक अध्यक्ष गजानन तायडे. वेदांतिका अकॅडमीचे नानाभाऊ सदाशिव हे प्रामुख्याने हजर होते.

## सेंट पॉल्स अकॅडमीमध्ये समुदाय मदतनीस दिवस साजरा

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट, दि. २७ :** स्थानिक श्रीजी कॉलनी स्थित सेंट पॉल्स अकॅडमी येथे समुदाय मदतनीस दिवस साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लूणकरण डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा, दीपम लखोटिया, अवनी लखोटिया शाळेचे मुख्याध्यापक विजय बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी व रिंकू अग्रवाल तसेच अभिजीत मेंढे, मालती महल्ले,सारिका रेळे, पूजा बघेले, माधुरी मानकर यांची मंचावर उपस्थिती होती.

सुरुवातीला इयत्ता ४ थी ते ६ वी च्या मुलींनी स्वागत गीत सादर केले व त्यांना साथ अर्चना रायबोले व योगेश चेडे यांनी दिली.विद्यार्थ्यांनी समुदाय मदतनीस यांच्यावर एक पथनाट्य व नाट्य नृत्य सादर केले. विद्यार्थ्यांनी सामाजिक मदतनीसांची वेशभूषा सादर करून आपले संवाद सादर केले. जसे पोस्टमन, डॉक्टर पोलीस, शेतकरी, दूधवाला, परिचारिका, फौजी सैनिक, कुंभार, सुतार, मिस्त्री इत्यादी सानवी ठाकरे, देवांश ठाकूर यांनी समुदाय मदतनीस दिवसानिमित्त भाषणे दिली. शेवटी उपमुख्याध्यापिका रिंकू अग्रवाल व पूजा बघेले मदतनीस यांचे महत्त्व आपल्या भाषणात सांगितले. कार्यक्रमाचे अध्यक्ष नवनीत लखोटिया होते.. पर्यवेक्षक पूजा बघेले व माधुरी मानकर ह्या होत्या.कार्यक्रम हा लहान मुलांचा असल्यामुळे त्यांचेच वर्गमित्र सारा जवंजाळ व विदिप्ता पायघन व शिक्षिका युगंधरा मरोळकर यांनी सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन उर्जित अवंडकर यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सांस्कृतिक विभाग प्रमुख आनंद काळमेघ, भारती बघेले, रोहिणी कोकाटे, विनिता हाडोळे, सुवर्णा टाक, पूजा राऊत, दीपिका डांगरे, स्नेहल गीते, दिक्षिता चोपडे, संदेश चोंडेकर, रवी अंभोरे, सुदर्शन अंभोरे, सुयोग कल्पेकर तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.

## श्री संत भास्कर महाराजांच्या पालखीचे आगमन

दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी




**अकोट, दि. २७ :** आषाढीवारी पूर्ण करून सर्व संत वारकरी पालखी दिंड्यासह श्री संत भास्कर महाराज यांचा पालखी सोहळा श्री श्रेत्र पंढरपूर येथील वारी पूर्ण करून २५ जुलै ला अकोली जहाँगीरला पोहचला.

श्री संत गजानन महाराज शेगांव, यांचे अंतरंग प्राणप्रीय पट्टशिष्य श्री संत भास्कर महाराजांचा पालखी सोहळा, आषाढी एकादशीच्या निमित्ताने श्री क्षेत्र पंढरपूरवारी जाणे व परत येणे असा १३०० किमी चा पायी प्रवास पूर्ण करत करत दिनांक २५ जुलै रोजी संतनगरी अकोट येथे दाखल झाला. २६ जुलै ला सकाळी ''श्री संत वासुदेव महाराजांचे निवासस्थान'' अकोट येथे पालखी सोहळ्याचे स्वागत व पुजन झाले. शहरात ठिकठिकाणी स्वागत व पुजन होत पालखी सोहळ्याचे श्रींची जन्मभुमी श्री क्षेत्र आकोली (जहाँगीर) ला आगमन झाले असता भाविक भक्तांकडून ठिकठिकाणी पुजन व स्वागत करण्यात आले. शिवाजी नगर, अकोली (जहाँ) येथील मधुकरराव साबळे यांचेकडे श्रींचे पुजन तथा विणेकरी यांच्यासह वारकऱ्यांचे स्वागत व पुजन होऊन वारक-यांना भोजनाची व्यवस्था करण्यात आली. श्रींची पालखी पुरातन श्री विठ्ठल रूक्मिणी मंदीर, येथे पोहचताच श्रींचे जयघोषाने व पुष्पवर्षावाने पालखी सोहळ्याचे स्वागत करण्यात आले. श्री संत भास्कर महाराज चॅरिटेबल ट्रस्ट, संस्थेचे, संस्थापक अध्यक्ष .ह.भ.प.अशोक महाराज जायले,यांनी श्रींच्या पालखी सोहळ्याचे समारोपीय किर्तन करीत असताना त्यांनी संस्थेचे प्रत्येक कार्य श्री संत वासुदेव महाराज यांच्या आशीर्वादाने पूर्णत्वास जात आहे, हा आपला स्वानुभव आहे. असे भावोद्गार काढले. तसेच पालखी सोहळ्याचे यशस्वीतेसाठी परिश्रम घेत असलेल्या व सहकार्य करणाऱ्या संस्थेचे विश्वस्त मंडळ आणि सर्व निष्ठावान महाराज मंडळीसह वारकरी तथा सेवाधारी, अन्नदाते, दानशूर मंडळींचे मनःपूर्वक आभार मानले. त्याप्रसंगी संस्थेचे विश्वस्त वारकरी व गावातील भाविक भक्त उपस्थीत होते. पालखीसोहळा श्री संत वासुदेव महाराजांच्या अकराव्या पिढ्यांची परंपरा तेवत ठेवनारा असून अनेक वर्षापासुन महाराजांचे आशिर्वादीत प्रेरणने स्थापीत श्री संत भास्कर महाराज श्री श्रेत्र आकोली (जहाँगीर) द्वारा आयोजित करण्यात येत आहे. या पालखी सोहळ्यामध्ये चालणारे वारकरी व अन्नदाते सुद्धा वंश परंपरागत आपली सेवा गेल्या अनेक वर्षापासून रुजू करीत आहेत. उपरोक्त संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.अशोक महाराज जायले, निष्काम भावनेने त्यांच्या संपूर्ण कुटुंबासहित तीन पिढ्यांसह व समस्त विश्वस्त मंडळ हा पालखी सोहळा निष्ठेने सांभाळत आहे. महाराज मंडळींच्या सहकार्याने हा सोहळा अव्याहत सुरळीतपणे चालवीत आहेत. विशेष म्हणजे या पालखी सोहळ्याची हिरक महोत्सवाकडे वाटचाल होत आहे.

## भुसावळ रेल्वे क्रीडा मैदानात सिंथेटिक रनिंग ट्रॅक




दै. अजिंक्य भारत। प्रतिनिधी

**अकोला, दि. २७ :** भुसावळ विभागातील क्रीडा पायाभूत सुविधेला चालना देण्यासाठी, भुसावळ येथील रेल्वे क्रीडा मैदानामध्ये इंटरनॅशनल असोसिएशन ऑफ ॲथलेटिक्स फेडरेशन्सच्या मानकांनुसार अत्याधुनिक सिंथेटिक रनिंग ट्रॅकची उभारणी करण्यात आली आहे. यापूर्वी येथे मातीच्या ट्रॅकवर मर्यादित स्वरूपातच क्रियाकलाप होत असत. या नव्या विकासामुळे भुसावळ विभागात व्यावसायिक ॲथलेटिक्सखेळाडूंना नवे दालन खुले झाले आहे.

भुसावळ (चांदमारी) येथे स्वतंत्र मल्टी-स्पोर्ट्स ग्राउंडचा विकास* मुख्य रेल्वे क्रीडा मैदानात आता फक्त ट्रॅकसंबंधित क्रियाकलापांपुरते मर्यादित असल्याने, इतर खेळांसाठी भुसावळच्या चांदमारी भागात स्वतंत्र मल्टी-स्पोर्ट्स ग्राउंड विकसित करण्यात आले आहे. येथे क्रिकेट, फुटबॉल, हॉकी, कबड्डी, ग्राउंड टेनिस अशा विविध खेळांसाठी योग्य सुविधा उभारण्यात आल्या आहेत. या प्रकल्पासाठी देखील क्रीडा शुल्क निधीतून१ कोटींपर्यंतचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

या प्रकल्पासाठी क्रीडा शुल्क निधीतून १कोटीं रुपयांच्या खर्चास सक्षम प्राधिकाऱ्यांकडून मंजूरी देण्यात आली आहे. हा ट्रॅक जळगाव जिल्ह्यातील पहिला आणि महाराष्ट्रातील नववा सिंथेटिक ट्रॅक असून, प्रादेशिक क्रीडा विकासाच्या दिशेने ही एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे. यासाठी एकूण क्षेत्रफळ १८,३७६ चौ. मीटर-रनिंग/मॅरेथॉन ट्रॅक,४०० मीटर इनर सर्कल परिघ,५ लेन्सची संख्या,३४० ,प्रेक्षक क्षमतेची बैठक व्यवस्था,ओपन ग्रीन जिम,या ट्रॅकचे परीक्षण तज्ज्ञांकडून करण्यात आले असून तो व्यावसायिक स्पर्धांसाठी योग्य असल्याचे प्रमाणित झाले आहे. हा ट्रॅक आता रेल्वे व इतर बाह्य खेळाडूंकरिता उपलब्ध आहे. रेल्वे कर्मचाऱ्यांसाठी व त्यांच्या कुटुंबीयांसाठी शुल्क १०० रुपये तर बाह्य खेळाडूंकरिता ४००रुपये शुल्क आकारले जाणार आहे.

प्रोत्साहन देण्यासाठी भुसावळ विभागातील आदिवासी शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा पूर्णतः मोफत ठेवण्यात आली आहे. अन्य शाळांतील विद्यार्थी आणि खेळाडू देखील अत्यल्प शुल्कामध्ये या सुविधेचा लाभ घेऊ शकतात. विशेष म्हणजे, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे क्रीडा स्पर्धांचे आयोजन करून त्यांच्या कौशल्यांना व्यासपीठ देण्याचा उपक्रम रेल्वे प्रशासनाद्वारे हाती घेण्यात आला आहे.

या ठिकाणी पूर्वी रेल्वे कॉलनी होती, जिथे ३४ प्रौढ वृक्ष होते. पर्यावरणाच्या प्रति जबाबदारी स्वीकारत, रेल्वे प्रशासनाने जिल्हा वन विभागाच्या समन्वयाने संयुक्त सर्वेक्षण व तपासणी करून वृक्षांचे मूल्यमापन व लिलाव प्रक्रिया पार पडली आहे.

अजिंक्य भारत

# आपलं अमरावती

सोमवार, दि. २८ जुलै २०२५

## थोडक्यात

### दानपेटी फोडून पैसे लंपास

**कुऱ्हा :** शहरातील लहान देवी मंदिरातील दानपेटी फोडून चोरट्याने साडे पाच हजार लांबवले. याबाबत संस्थानाचे अध्यक्षा प्रदीपसिंग जगतपालसिंग पचलोरे (६१, रा. कुऱ्हा) यांनी कुऱ्हा पोलिसात तक्रार दिली. याबाबत पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### क्षुल्लक वादातून युवकाला मारहाण

**आसेगाव पुर्णा :** राजना येथील पुर्णा नदीच्या पुलावर गावातीलच चौघांनी मिळून एकाला लोखंडी रॉड, काठी व चाकूने मारहाण करीत जखमी केले. याबाबत जखमी अजय साहेबराव कावरे (२६) याच्या तक्रारीवरून आसेगाव पोलिसांनी अजय गंगाधर वाट (३५) याच्यासह अन्य तिघांवर गुन्हे दाखल केले.

### इसमाला जीवे मारण्याची धमकी

**चिखलदरा :** कामावरून घरी परत आलेल्या एकाला गावातीलच पाच जणांनी शिवीगाळ करीत मारहाण केली. इतकेच नव्हे, तर जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना डोमा येथे घडली. या प्रकरणी विनोद महेकु बछले (४०, रा. डोमा) यांच्या तक्रारीवरून तीन महिलांसह एकूण पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### पत्नीसह सासऱ्याला मारहाण

**नांदगाव खंडेश्वर :** आपापसात न पटणाऱ्या पतीपत्नीची खावीची केस नांदगाव खंडेश्वर येथील न्यायालयात सुरू आहे. दरम्यान पत्नीला तारखेवर जावू नको असे म्हणत पतीने तिच्यासह सासऱ्याला मारहाण करीत जखमी केले. ही घटना ओंकारखेडा येथील पारधी बेड्यावर घडली. पत्नीच्या तक्रारीवरून नांदगाव खंडेश्वर पोलिसांनी प्रशिक भगवान वानखडे (२९, रा. कैलास नगर, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### नातेवाईकाला चाकूने मारण्याची धमकी

**चांदूर बाजार :** एकमेकांचे नातेवाईक असलेल्या सात जणांनी मिळून क्षुल्लक वादातून युवकाला चाकू दाखवत जीवे मारण्याची धमकी दिली. ही घटना शिरजगाव बंड येथील लाकुड मार्केट परिसरात घडली. याबाबत मो. कासिफ मो. नासिर (३६) यांच्या तक्रारीवरून चांदूर बाजार पोलिसांनी मो. जाहिद अब्दुल गणी (४०) याच्यासह एकूण सात जणांविरुद्ध, तर मो. रेहान मो. हारून (३५) यांनी दिलेल्या परस्परविरोधी तक्रारीवरून सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला.

### माहेरहून पैसे न आणल्याने पत्नीला मारहाण

**चांदूर बाजार :** पत्नीने माहेरहून ५ हजार रुपये न आणल्याने चिडलेल्या पतीने पत्नीला काठीने मारहाण केली. शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. ही घटना कुरळपुर्णा येथे घडली.

### अल्पवयीनाचा युवतीवर अत्याचार

**वरुड :** घरी राहत असलेल्या नात्यातीलच एका अल्पवयीन युवतीसोबत वारंवार शारीरिक संबंध केले. त्यातून युवती गर्भवती राहिली. तिच्या तक्रारीवरून वरुड पोलिसांनी अल्पवयीन युवकाविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला. सविस्तर वृत्तानुसार, पिडीतेचे आईवडील रोज मजुरीचे काम करतात. त्यामुळे ते सतत बाहेर असतात. आपल्या पोटच्या अल्पवयीन मुलीची आपल्यामुळे अबाळ होवू नये म्हणून त्यांनी आपल्या मुलीला एका जवळच्या नातेवाईकाकडे ठेवले होते. त्या नातेवाईकला एक अल्पवयीन मुलगा आहे. गेल्या वर्षभरापासून पिडीता ही तिच्या नातेवाईका सोबत त्यांच्या घरी राहते. दरम्यान त्या दोघांमध्ये प्रेमसंबंध होते.

# कोचिंग क्लासेस : श्रीमंतांची मक्तेदारी आणि पालकांची लूट!




**अमरावती, दि. २७ :** राज्यभरातील कोचिंग क्लासेस संचालकांनी सरकारच्या प्रस्तावित कोचिंग क्लासेस अधिनियमाला विरोध दर्शविला असला तरी या विरोधामागे स्वत:चे स्वार्थी हितसंबंध लपलेले आहेत. कोचिंग क्लासेस हा पूर्वी केवळ 'ढ विद्यार्थ्यांना' मदत करणारा पर्याय होता. पण आज या क्लासेसनी स्वत:ला शिक्षण व्यवस्थेवर मक्तेदारी गाजवणारे व्यापारी केंद्र बनवले आहे. शिकवनीची खरी गरज ही 'ढ' विद्यार्थ्यांना असते असे असले तरी मात्र फक्त हुशार विद्यार्थ्यांनाच गुणांची टक्केवारीनुसार प्रवेश!

आज कोचिंग क्लासेसची निवड फक्त ७५ टक्क्यांपेक्षा जास्त गुण असलेल्या विद्यार्थ्यांसाठीच होते. कमी गुण मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना दारातच थांबवले जाते. उलट अशा विद्यार्थ्यांना उचलून धरण्याची खरी जबाबदारी या क्लासेसची होती, जी आता संपुष्टात आली आहे.



भरमसाठ फी आणि पालकांची लूट केली जातं आहे. कोचिंग क्लासेस म्हणजे आता पालकांच्या खिशावर टाकलेला डाका. महिन्याला हजारो रुपयांची फी आकारली जाते. अनेकदा 'टॉपर बनवण्याचे स्वप्न' दाखवून पालकांना फसवले जाते. शिक्षणाला सेवा न मानता व्यवसायाचे साधन बनवणाऱ्या या क्लासेसच्या मालकांनी शासनाच्या नियमावलीला विरोध करणे हे अपेक्षितच आहे. म्हणून शासनाची भूमिका योग्यच आहे. सरकारने कोचिंग क्लासेसवर नियंत्रण ठेवण्यासाठी कठोर नियम आणले आहेत. फायर ऑडिट आणि सुरक्षा तपासणी, लेखापरीक्षणाचा अहवाल हे नियम विद्यार्थ्यांच्या हितासाठी आणि पारदर्शकतेसाठी आवश्यकच आहेत. या अटींना विरोध करणारे संचालक म्हणजे फक्त स्वत:चा नफा टिकवून ठेवू पाहणारे व्यापारी. शासनाने जर या नियमावलीला अधिक कडक केले, तर त्याचे जनता स्वागतच करील.

कोचिंग क्लासेसना शिस्तीत आणण्यासाठी कठोर कायदे आणि काटेकोर देखरेख आवश्यक आहे. आज कोचिंग क्लासेस बचाव कृती समिती नावाने जी मोहीम राबवली जातेय, ती प्रत्यक्षात शिक्षणाला बाजारपेठेत नेण्याचा प्रयत्न आहे. शिक्षण हे प्रत्येकासाठी समान संधी देणारे असावे, पण कोचिंग क्लासेसने ते फक्त श्रीमंतांच्या मुलांचे विशेषाधिकार बनवले आहेत. अशा परिस्थितीत शासनाने सैल धोरण ठेवण्या ऐवजी अधिक कडक कायदा करूनच पालकांना दिलासा द्यावा, हीच जनतेची खरी अपेक्षा आहे.

### कोचिंग क्लासेस शिक्षण की फक्त पैसे कमविण्याचा धंदा ?

कोचिंग क्लासेस शिक्षण फक्त पैसे कमवण्याचा धंदा बनला आहे. खाजगी कोचिंग क्लासेस मध्ये आडमाप शिकवणी फी घेतल्या जाते. यामुळे सामान्य विद्यार्थ्यांना कोचिंग क्लासेसला प्रवेशित होणे कठिन झाले आहे. 'श्रीमंतांची मक्तेदारी, गरीब विद्यार्थ्यांचा बहिष्कार' कोचिंग क्लासेसचा हाच खरा चेहरा होय. पालकांची लूट थांबवण्यासाठी शासनाचे कठोर नियम स्वागतार्ह कोचिंग क्लासेसना आवर घालण्यासाठी कडक कायदा हाच एकमेव पर्याय असून टॉपर बनविण्याचे स्वप्न विकणारे क्लासेस म्हणजेच शिक्षणाचे व्यापारीकरण!

# आठ बीडीओंना शोकॉज, स्पष्टीकरणाला मात्र नो रिस्पॉन्स!

## 'कंपोस्ट पीठ भरू आपले गांव स्वच्छ करू' अभियानाकडे दुर्लक्ष

### १७ जूनला दिल्यात नोटीस

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** जिल्हा परिषदेच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या वतीने ग्रामीण भागातील ८४१ ग्रामपंचायतीमध्ये १ ते १० मे पर्यत कंपोस्ट पीठ भरू अन आपले गांव स्वच्छ करु अभियाना राबविले होते. या अभियानात अनेक गावात ७५ टक्यापेक्षा कमी कामे केली होती. यामुळे सीईओ संजीता महापात्र यांनी १७ जून रोजी ८ पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना शोकॉज नोटीस बजाविल्या होत्या. मात्र या नोटीस नंतर अद्यापर्यतही संबंधित बीडीओंकडून सीईओंकडे खुलासाच सादर केला नसल्याची बाब समोर आली आहे.



प्राप्त माहितीनुसार जिल्ह्यात विविध गावांत १ हजार ७७० कंपोस्ट पीठ तयार करण्यात आले होते. यामध्ये १ ते १० मेपर्यत या कंपोस्ट पीठ मध्ये गावातील कचरा संकलित करून हा कचरा कंपोस्ट पीठ मध्ये साठवायचा होता. मात्र प्रत्यक्षात १ हजार १५८ कंपोस्ट पीठ मध्ये कचरा टाकण्यात आला आहे.

तर ६१२ कंपोस्ट पीठ मध्ये कचरा टाकण्यात आला नाही. जिल्ह्यात १४ पैकी केवळ ६ पंचायत समिती मधील गावात समाधानकारक काम झाले असले तर ८ पंचायत समितीमध्ये गावांमध्ये ७५ टक्यापेक्षा कमी काम या अभियानादरम्यान झाले आहे. यामुळे जिल्हा परिषदेच्या सीईओंनी या प्रकरणी अचलपूर, अंजनगाव सुजी, दर्यापूर, वरूड, तिवसा, मोर्शी, चिखलदरा आणि चांदुर बाजार येथील पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना शो कॉज नोटीस १७ जून रोजी बजाविल्या होत्या. मात्र अद्यापपर्यत संबंधित बीडीओंकडून शो कॉज नोटीस बाबत आपला खुलासा सादर केला नसल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

### तालुकानिहाय कंपोस्ट पीठ

| तालुका | कचरा संकलित संख्या |
|---|---|
| अचलपूर | १८५-५४ |
| अमरावती | ९१-९१ |
| अंजनगांव सुर्जी | १२२-३१ |
| भातकुली | १२३-११६ |
| चांदुर बाजार | १३८ |
| चांदुर रेलवे | ७०-७० |
| चिखलदरा | १५२-९७ |
| दर्यापुर | १७३-५२ |
| धामणगांव रेल्वे | ७४-५५ |
| धारणी | १८०-१६४ |
| मोर्शी | १२८-८१ |
| नांदगांव खंडेश्वर | १७८-१६७ |
| तिवसा | ८३-५२ |
| वरुड | ७३-३६ |
| एकूण | १७७०-११५८ |




# कारगिल विजय दिनानिमित्त युकाँचे स्वच्छता अभियान

## बडनेरा शहीद स्मारक परिसराची स्वच्छता, माजी सैनिकांचा गौरव

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** अमरावती शहर युवक काँग्रेसतर्फे 'गांधीगिरी' पद्धतीने शहरातील अस्वच्छतेविरोधात राबविण्यात येणाऱ्या विशेष स्वच्छता अभियानाचा आज एक भाग म्हणून बडनेरा येथील शहीद स्मारक परिसरात व्यापक स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

कारगिल विजय दिनाचे औचित्य साधून युवक काँग्रेसने परिसरातील कचरा व तण हटवून परिसर स्वच्छ केला. युवक काँग्रेसने जननायक राहुल गांधी यांच्या वाढदिवसानिमित्त १९ जूनपासून शहरात विविध ठिकाणी स्वच्छता अभियान सुरू केले असून, महिनाभरात अनेक भागांत या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

बडनेरा येथील शहीद स्मारक परिसरातील साचलेला कचरा व वाढलेली घाण लक्षात घेता, वीर जवानांच्या स्मृतीस्थळाचे जतन आणि स्वच्छता हे या उपक्रमाचे उद्दिष्ट राहिले. या कार्यक्रमात माजी सैनिक साहेबराव मोहोड, बाळाधन दहाट व अनिल माहुले यांचा विशेष सत्कार करून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नागरिकांनीही या उपक्रमात सहभाग नोंदवत युवक काँग्रेसच्या कार्याचे कौतुक केले.

कार्यक्रमावेळी बडनेरा ब्लॉक काँग्रेस अध्यक्ष संजय बोबडे, प्रकाश पहुरकर, सुरेश इंगळे, मंदाताई कोडापे, लक्ष्मी अहिरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. स्वच्छता मोहिमेत समीर जवंजाळ, वैभव देशमुख, अनिकेत ढेंगळे, संदेश जैन, शुभम बांबल, ओम कुबडे, वेदांत केने, वैभव बैतुले यांच्यासह युवक काँग्रेस व एनएसयुआय कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले.शहर स्वच्छतेसाठी युवक काँग्रेसच्या या सातत्यपूर्ण उपक्रमांचे शहरभर कौतुक होत आहे.

# चिखलदरा-घटांग मार्गावर कारला अपघात

## सहा पर्यटकांचे प्राण वाचविले

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**चिखलदरा, दि. २७ :** अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा घाट रस्त्यावर भीषण अपघातात सहा पर्यटकांचा जीव धोक्यात आला होता. मात्र जिल्हा शोध व बचाव पथकाच्या (डीडीआरएफ) जवानांनी वेळीच धाडसी कारवाई करत सहाही जणांना सुरक्षित बाहेर काढून त्यांचे प्राण वाचवले.





चिखलदरा हे निसर्गरम्य पर्यटनस्थळ असल्याने येथे दररोज मोठ्या प्रमाणात पर्यटकांची गर्दी होत असते. पर्यटकांच्या सुरक्षेसाठी जिल्हाधिकारी, अमरावती आणि निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार चिखलदरा पोलीस ठाण्याच्या मार्गदर्शनाखाली पथक तैनात आहे. शनिवारी शहापूर येथून अर्धा किलोमीटर पुढे पर्यटकांची एक कार चालकाचे नियंत्रण सुटल्याने दरीत कोसळली. गाडीत चार प्रौढ व दोन मुले होती असे एकूण सहा जण होते. घटनेची माहिती मिळताच चिखलदरा तहसीलदार आणि ठाणेदार पोलीस स्टेशन चिखलदरा यांनी तत्काळ बचाव कार्य सुरू करण्याचे निर्देश दिले.

### धाडसी बचाव मोहीम

डीडीआरएफ अमरावतीच्या पथकाने अत्यंत धोकादायक परिस्थितीत बचाव कार्य केले. आपल्या जीवाची पर्वा न करता सर्व सहाही पर्यटकांना दरीतून सुखरूप बाहेर काढण्यात आले. जखमींना तात्काळ चिखलदरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात (पीएचसी) उपचारासाठी दाखल करण्यात आले. या मोहिमेदरम्यान पथकातील भूषण वैद्य व अर्जुन सुंदरडे यांना बचाव करताना पायाला दुखापत झाली असून त्यांच्यावर आरएच चिखलदरा येथे उपचार सुरू आहेत.

### पथकातील शूर जवानांचे कौतुक

बचाव कार्यात दाखविलेल्या धाडसाबद्दल डीडीआरएफ पथकाचे जिल्हाधिकारी, पोलीस विभाग व स्थानिक प्रशासन यांनी कौतुक केले आहे. तात्काळ प्रतिसाद व नि:स्वार्थ सेवेमुळे सहा पर्यटकांचे प्राण वाचले असून स्थानिक नागरिकांनीही पथकाच्या कार्याचे अभिनंदन केले. या घटनेनंतर पुन्हा एकदा स्पष्ट झाले की, डीडीआरएफ पथकाची तत्परता आणि धाडसी भूमिका अनेकांचे जीव वाचविण्यात महत्त्वपूर्ण ठरत आहे. या बचाव मोहिमेत देवानंद भुजाडे,विशाल निमकर, भूषण वैद्य, अर्जुन सुंदरडे, महेश मांदळे, सुरेश पालवे, सुरज ठाकूर, अजय आसोले या डीडीआरएफ च्या जवानांचा समावेश होता.

### रेल्वे समोर उडी घेऊन आत्महत्येचा प्रयत्न

**बडनेरा, दि. २७ :** बडनेरा रेल्वे स्थानकाच्या प्लॅटफॉर्म क्रमांक दोनवर आज सकाळी नऊ वाजता कोल्हापूर नागपूर एक्सप्रेस गाडी समोर एका २५ वर्षीय युवकाने उडी मारून आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला अमरावतीच्या प्रशांत नगर परिसरात राहणारा अनिकेत प्रदीप धानके असे त्याचे नाव आहे त्याला गंभीर अवस्थेत रेल्वे सुरक्षा बल तसेच रेल्वे पोलिसांनी जिल्हा सामान्य रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले तो सध्या खाजगी दवाखान्यात उपचार घेत आहे आत्महत्येचे नेमके कारण पोलिसांना समजू शकले नाही बडनेरा रेल्वे स्थानकावर पंधरा दिवसांपूर्वीच एका तीस वर्ष युवकाने आत्महत्या केल्याची घटना घडली आहे.

# विद्यार्थ्यांना पासिंगसाठी ३५ गुण तर आदर्श गुरुजींना किती ?

## पडताळणी झाली, मूल्यांकनही आटोपले! आदर्श शिक्षक पुरस्कारावर प्रश्नचिन्ह

अजिंक्य भारत |विशेष प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ :** विद्यार्थ्यांना पास होण्यासाठी १०० पैकी ३५ गुण अनिवार्य आहेत तर शिक्षकांना आदर्श होण्यासाठी शंभर पैकी किती गुण अनिवार्य ठरतील हा सध्या शिक्षण विभागात चर्चेचा विषय आहे. निमित्त आहे जिल्हा परिषद आदर्श शिक्षक पुरस्काराचं.

जिल्हा परिषद मार्फत दरवर्षी ५ सप्टेंबर रोजी जिल्हा परिषद शाळेतील प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिला जातो. यावर्षी २६ शिक्षकांनी यासाठी आपले नामांकन भरले आहे. धामणगाव रेल्वे, मोर्शी, तिवसा व चिखलदरा या चार तालुक्यातून केवळ एका शिक्षकाने नामांकन भरले आहे. तर अमरावती २, अचलपूर २, अंजनगाव सुर्जी ३, भातकुली २, चांदुर रेल्वे २,दर्यापूर २, धारणी २, नांदगाव खंडेश्वर ३ आणि वरुड येथील २ शिक्षकांनी नामांकन भरले आहे. प्रत्येक पंचायत समिती मधून एक आदर्श शिक्षक निवडला जातो. ज्या शिक्षकांनी आदर्श पुरस्कारासाठी नामांकन भरले आहे त्या शिक्षकांची वर्ग व शाळा पडताळणी करण्यासाठी जिल्ह्यात तपासणी समिती नेमण्यात आली होती.

या समित्यांकडून संबंधित शिक्षकाचे वर्ग व शाळा पडताळणी करण्यात आली. यासाठी २० गुण देण्यात आले होते. तर नामांकन भरतेवेळी संबंधित शिक्षकांनी जे दस्तऐवज सादर केले त्यासाठी ८० गुण दिले आहेत. एकंदर आदर्श बनण्यासाठी १०० गुण देण्यात आले होते .




विद्यार्थ्यांना परीक्षेत पास होण्यासाठी १०० पैकी ३५ गुण अनिवार्य आहेत, आता या शिक्षकांनी आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी नामांकन भरले त्यांना शंभर पैकी किती गुण मिळाले म्हणजे ते आदर्श ठरतील असा प्रश्न शिक्षण विभागात उपस्थित केला जात आहे.

ज्या तालुक्यातून केवळ एकच अर्ज आला आहे त्या तालुक्यात समजा 35 पैकी कमी गुण मिळाले असतील तर तो शिक्षक आदर्श ठरेल काय? आणि ठरला तर त्याचे निकष काय? असा प्रश्नही चर्चिला जात आहे. विशेष बाब म्हणजे प्रत्येक तालुक्यातून आदर्श शिक्षक निवडला जातो परंतु चांदूर बाजार तालुक्यातून एकाही शिक्षकाने आदर्श पुरस्कारासाठी नामांकन भरले नाही त्यामुळे त्या तालुक्यात आदर्श कोण असा प्रश्नही सध्या उपस्थित होत आहे.

### गुणवत्तेवर निकष हवे

आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी मूल्यांकन केल्यानंतर ज्याची गुणवत्ता जास्त अशा शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार दिल्या गेला पाहिजे प्रत्येक तालुक्यातून एक पुरस्कार दिला जातो परंतु संबंधित तालुक्यातील शिक्षकाचे गुणांकन कमी असेल तर त्या ऐवजी एखाद्या तालुक्यातील एकापेक्षा जास्त शिक्षकाचे गुणांकन जास्त असेल तर त्यांना पुरस्कार द्यावे त्यामुळे खऱ्या अर्थाने आदर्श शिक्षकांनाच आदर्श पुरस्कार दिला जाईल.

**राजेश सावरकर**
**राज्य प्रतिनिधी, महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती**

### गुणांकन प्रसिद्ध करावे

खऱ्या अर्थाने जो गुणवान शिक्षक आहे आणि नामांकन सादर केल्यानंतर पडताळणीत त्याला जास्त गुण मिळाले असतील अशा शिक्षकांना आदर्श पुरस्कार द्यावा. विशेष म्हणजे पूर्वी शिक्षकांचे गुणांकन प्रसिद्ध करण्यात येत होते आता ते होत नाही पूर्वीसारखेच गुणांकन प्रसिद्ध झाल्यास नेमके आदर्श शिक्षकास किती गुण आणि तो आदर्श कसा या सगळ्या गोष्टीचा उलगडा होईल. जिल्ह्यात अनेक गुणवान शिक्षक आहेत अशा गुणवंतांनाच पुरस्कार दिल्यास त्या पुरस्काराची शोभा वाढेल.

**किरण पाटील**
**वरिष्ठ राज्य उपाध्यक्ष, अखिल महाराष्ट्र प्राथमिक शिक्षक संघ**

## थोडक्यात

### उपचारादरम्यान युवकाचा मृत्यू

**अमरावती :** आजारी असल्याने उपचारासाठी डॉ. पंजाबराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आलेल्या युवकाचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. इरफान शहा सत्तार शहा (३७, रा. बाजारपूर, वलगाव) असे मृतकाचे नाव आहे. याबाबत प्रवीण अशोकराव वानखडे (३०) यांनी गाडगे नगर पोलिसात तक्रार दिली. पोलिसांनी मर्ग नोंदवला.

### शहरात दोन तडीपारांवर मपोका

**अमरावती :** फ्रेजरपुरा व राजापेठ पोलिसांनी केलेल्या दोन वेगवेगळ्या कारवाईत जवळ शस्त्र बाळगणाऱ्या दोन तडीपारांवर कारवाई करण्यात आली. फ्रेजरपुरा पोलिसांनी महेश कृष्णा खोबागडे याच्या ताब्यातून चायना चाकू जप्त केला, तर राजापेठ पोलिसांनी शुभम उर्फ सॅम दिनेश वासनिक (२७) हा बेलपुरा परिसरात हातात शस्त्र घेवून फिरत असताना त्याला ताब्यात घेतले. दोघांवरही आर्म ॲक्टसह मपोका दाखल करण्यात आला.

### देशी दारू विक्रेत्यावर कारवाई

**अमरावती :** फ्रेजरपुरा पोलिसांनी मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे गवळीपुरा येथे कारवाई करीत ८८० रुपयांची देशी दारू जप्त केले. पोलिसांनी एका व्यक्तीविरुद्ध दारूबंदी कायद्यांतर्गत गुन्हा नोंदवला.

### शहरातून दोन दुचाकी लंपास

**अमरावती :** शहरातील दुचाकी चोरींचे सत्र थांबायचे नाव घेत नसतानाच पुन्हा मंगलधाम कॉलनी व बडनेरा मार्गावरील एका चार चाकीच्या शोरूम समोरून अज्ञातांनी दुचाकी चोरून नेल्या. महादेव खोरी येथील रहिवासी सारनाथ दिगांबर गजभिये (३४) हे त्यांच्या दुचाकीने (एमएच २७-एफ १३९७) मंगलधाम कॉलनी येथे सुरू असलेल्या बांधकामावर गेले होते. तेथून अज्ञाताने त्यांची ५० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली, याबाबत त्यांनी फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञाते गुन्हा नोंदवला. दुसरी घटना बडनेरा पोलीस ठाण्यांतर्गत घडली. फिर्यादी प्रणेश ज्ञानेश्वरराव मंडलिक (रा. नवी वस्ती, बडनेरा) हा सेल्स एक्झिक्युटीव्ह म्हणून नोकरी करतो. घटनेच्या वेळी त्याने नेहमीप्रमाणे त्याची दुचाकी (एमएच २७-एएस ३५२५) शोरूमसमोर उभी केली होती. अज्ञाताने १० हजार रुपये किंमतीची दुचाकी चोरून नेली.

### रामपुरी कॅम्प परिसरातील दुकान फोडले

**अमरावती :** अज्ञात चोरट्याने रामपुरी कॅम्प परिसरातील एका इलेक्ट्रिकचे दुकान फोडून अज्ञाताने वायल, लाईट आदींसह एकूण १ लाख ८१ हजारांचे साहित्य चोरून नेले. याबाबत सागर अहुजा यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

### शामराव संभे यांचे निधन

**अंजनगाव बारी :** मालखेड रेल्वे येथील नागरीक शामराव देवाजी संभे यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी सकाळी ६ वाजता (दि.२७) अल्पशा आजाराने आज निधन झाले.



त्याच्या पश्चात तीन मुले, एक मुलगी व नातूपंतू असा बराचसा आप्त परिवार आहे. त्याच्यावर हिंदू स्मशानभूमी मालखेड रेल्वे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

# हजारो विद्यार्थ्यांचे स्वप्न होणार साकार

## २४ वसतिगृहांमध्ये २९२५ विद्यार्थ्यांची क्षमता; मोफत निवास, गुणवत्तापूर्ण जेवण

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

अमरावती, ब्युरो. घर असावे घरासारखे... शिक्षणासाठी गाव सोडून शहरात आलेल्या हजारो विद्यार्थ्यांसाठी हे स्वप्न साकार होत आहे, ते समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहांमुळे. अमरावती जिल्ह्यातील ही वसतीगृहे केवळ निवासाची नव्हे; तर शिक्षणासाठीची सुरक्षित आणि प्रेरणादायी पाठशाळा ठरली आहेत. जिल्हाभरात समाज कल्याण विभागाची एकूण २४ वसतीगृहे असून; त्यामध्ये १३ मुलींसाठी आणि ११ मुलांसाठी आहेत. यापैकी ९ वसतीगृहे अमरावती शहरात, तर १५ ग्रामीण भागात आहेत. या वसतीगृहांची एकूण क्षमता २९२५ असून, दरवर्षी ९७ टक्कयांपेक्षा जास्त प्रवेश होत आहेत. हे या सुविधांच्या विश्वासार्हतेचे लक्षण आहे.



या वसतीगृहांमध्ये विद्यार्थ्यांना मोफत निवास, दर्जेदार भोजन, निशुल्क शैक्षणिक साहित्य, सहलीसाठी विशेष भत्ते आणि महिन्याला निर्वाहासाठी विभागीय स्तरावर ८००, तालुका स्तरावर ५०० इतका भत्ता मिळतो. या सुविधांमुळे अनेक गरीब व मध्यमवर्गीय कुटुंबातील मुले-मुलींना शिक्षणात सातत्य ठेवता येते. वसतीगृह प्रवेश प्रक्रियेतून विद्यार्थीची निवड झाल्यानंतर, त्याला संबंधित वसतीगृहात राहण्याची सोय होते. त्यामुळे मुला-मुलींना या वसतीगृहांचा मोठा आधार झाला आहे.

> “जिल्ह्याभरातील वसतीगृहांमध्ये राहणाऱ्या मुला-मुलींना शासकीय निकषाप्रमाणे सुविधा दिल्या जाते. नि:शुल्क निवास व भोजन तसेच निर्वाह भते सुध्दा दिल्या जाते. सद्यास २०२५-२६ साठी प्रवेश प्रक्रिया सुरू असून, विद्यार्थ्यांना होस्टल मॅनेजमेंट पोर्टलवरून ऑनलाइन अर्ज करता येतो. ही सुविधा अधिक पारदर्शक आणि सोयीची असल्याने पालकांनाही विश्वास वाटतो.
>
> **केवलकुमार अरुण बिजवे, समाज कल्याण निरीक्षक, समाज कल्याण विभाग.**

मी मोर्शी तालुक्यातून आलो आहे. शहरात शिक्षण घेणे कठीण होते. पण वसतीगृहामुळे मला चांगल्या वातावरणात शिकता येते. स्वच्छता, जेवण आणि अभ्यासासाठी शांतता, सगळंच समाधानकारक आहे, असे एका रहिवासी विद्यार्थीने सांगितले. त्याचप्रमाणे आमचे वसतीगृह म्हणजे दुसरे घरच वाटते. वॉर्डन सतत मार्गदर्शन करतात. आम्हाला सुरक्षितता, वेळेवर जेवण आणि गरजेचे साहित्य मिळते. इथे राहून मी आत्मविश्वासाने शिकते आहे, असे एका दुसऱ्या रहिवासी विद्यार्थिने सांगितले.

### प्रवेश न मिळालेल्यांसाठी ‘स्वाधारचा’ आधार

समाजकल्याण विभागाच्या वसतीगृहांमध्ये दरवर्षी ९७ टक्क्यांहून अधिक विद्यार्थी प्रवेश घेतात. काही वेळा वसतीगृहांची क्षमता पूर्ण झाल्यावर अनेक विद्यार्थी वेटिंग वर राहतात. अशा विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना राबविण्यात येते. वसतीगृहात प्रवेश न मिळाल्याचा शिक्षणावर परिणाम होऊ नये, यासाठी स्वाधार योजनेअंतर्गत सुविधा दिली जाते. ही योजना आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरते. त्यामुळे वसतीगृहाचा प्रवेश मिळाला नाही, तरी विद्यार्थ्यांचे शिक्षण थांबत नाही.

### सुसज्ज इमारती आणि वेळेवर सेवा

जिल्ह्यातील १८ वसतीगृहे शासकीय इमारतीत असून, ६ इमारती भाडेतत्त्वावर आहेत. तरीही सर्व ठिकाणी व्यवस्थापन चोख असून, प्रकाश व्यवस्था, स्वच्छता, बागकाम आणि सुरक्षा यामध्ये सुधारणा करण्यात आली आहे. वेळेवर तपासणी, मेन्यूप्रमाणे पोषणयुक्त आहार आणि विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार देखभाल ही नियमित केली जाते.

> “वसतीगृह हे हे केवळ निवास नाही, तर विद्यार्थ्यांचे शिक्षण सुरू ठेवण्यासाठीचा आधार आहे. समाजातील दुर्बल घटकातील विद्यार्थी शिकू शकतात, घडू शकतात, हीच आमची प्रेरणा आहे. सद्यास प्रवेश प्रक्रिया सुरु झाली असून, विद्यार्थ्यांनी याच लाभ घ्यावा
>
> **राजेंद्र जाधवर**
> **जिल्हा समाजकल्याण अधिकारी, अमरावती**

# लाखपुरीत पोलिस अधीक्षक अर्पित चांडक यांचा दौरा

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**दर्यापूर, दि. २७ :** श्रावणमास व कावड यात्रेनिमित्त तीर्थक्षेत्र श्री लक्षेश्वर संस्थान, लाखपुरी (ता. मुर्तिजापूर, जि. अकोला) येथे अकोला जिल्हा पोलिस अधीक्षक अर्पित चांडक यांनी १ कि.मी. पायी चालत पाहणी दौरा केला. या वेळी त्यांनी कावड मार्ग, सुरक्षा व्यवस्था व अन्य उपाययोजनांचा आढावा घेतला.



या दौऱ्यात आमदार हरिषभाऊ पिंपळे, उपविभागीय अधिकारी संदीप अपार, तहसीलदार शिल्पा बोबडे, पोलीस अधिकारी श्रीधर गुट्टे, अजित जाधव, एसडीपीओ सतिष कुलकर्णी, तसेच विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. लाखपुरी फाट्यापासून ते मंदिर परिसरापर्यंत चांडक यांनी स्वत: चालत जाऊन पाहणी केली. मंदिरात भगवान लक्षेक्ष्वराचे पूजन केल्यानंतर, कावड उत्सव समिती व शिवभक्तांच्या वतीने आमदार पिंपळे यांच्या हस्ते चांडक यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मार्गदर्शन करताना चांडक यांनी आयोजनाचे कौतुक केले व सर्व विभागांनी समन्वयाने काम करावे, असे सांगितले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी संस्थान पदाधिकारी, ग्रामपंचायत व महसूल कर्मचाऱ्यांनी विशेष मेहनत घेतली.

# धामणगाव नगरी भक्तिमय! रामदेवबाबा शोभायात्रेने धार्मिक उत्सवाचे वातावरण

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**धामणगाव रेल्वे, दि. २७ :** शहरातील श्री रामदेवबाबा मंदिरात आयोजित अमृत कथा महोत्सवाच्या निमित्ताने शुक्रवारी शहरात भव्य ध्वज यात्रा व शोभायात्रा पार पडली. श्री परशुराम महिला सेवा समिती व श्री परशुराम सेवा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने झालेल्या या शोभायात्रेमुळे संपूर्ण धामणगाव नगरी भक्तिमय झाली होती.



सकाळी श्री रामदेवबाबा मंदिर, अमर शहीद भगतसिंग चौक येथून सुरू झालेली ही यात्रा माहेश्वरी भवन, गांधी चौक, सिनेमा चौक, टिळक चौक, शास्त्री चौक मार्गे छत्रपती शिवाजी महाराज चौकातील आरोही रिसॉर्टपर्यंत नेण्यात आली. शेकडो भक्तांनी हातात रामदेवबाबांचे ध्वज घेत उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. प्रत्येक चौकात नागरिकांनी यात्रेचे स्वागत केले. मार्गावर थंड पेये, चहा व पाण्याची उत्तम सोय करण्यात आली होती. २५ ते २७ जुलै दरम्यान संत जयप्रकाश महाराज (कोलकाता) यांच्या वाणीतून श्री रामदेवबाबांच्या जीवनावर आधारित अमृत कथा सादर केली जात असून, दररोज दुपारी २ ते सायं ६ पर्यंत आरोही रिसॉर्ट येथे कथावाचन सुरू आहे. शनिवारी लीला उत्सव तर रविवार, २७ जुलै रोजी ब्यावला उत्सव साजरा केला गेला. धामणगावात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणात रामदेवबाबांची कथा आयोजित झाल्याने भाविकांत उत्साहाचे वातावरण आहे.

### दारू पिण्यास पैसे दिले नाही म्हणून मारहाण

**परतवाडा :** शहरातील एकता नगरात सोनू गुल्लू बेदरकर (३०) व बिल्लू फगनसिंग इवने (२५) यांनी दारू पिण्यासाठी गजानन गोपालराव वानखडे (४५) यांना दारू पिण्यास पैसे मागीतले. त्यांनी नकार दिल्याने दोघांनीही त्यांच्यावर विटेने हल्ला चढवत जखमी केले. याबाबत जखमीच्या तक्रारीवरून परतवाडा पोलिसांनी मारहाण करणाऱ्या दोघांविरुद्ध गुन्हा नोंदवला. या घटनेचा पुढिल तपास परतवाडा पोलिस करीत आहे.



# कारगिल विजय दिन राष्ट्राभिमानाने साजरा

## रविंद्र दांडगे यांचे भाषण प्रेरणादायी

**अंजनगाव सुजी, दि. २७ :** 26 जुलै रोजी संत देवनाथ महाराज शासकीय आयटीआयमध्ये कारगिल विजय दिन राष्ट्राभिमानाने साजरा करण्यात आला. या प्रसंगी मुख्य सभागृहात झालेल्या समारंभाला विद्यार्थी, शिल्पनिदेशक, माजी सैनिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख वक्ते ज्येष्ठ शिल्पनिदेशक रविंद्र दांडगे यांनी कारगिल युद्धातील जवानांच्या शौर्याची आठवण करून दिली. हे युद्ध शौर्य, बलिदान आणि भारताच्या अस्मितेचा संगम होते. हिमालयात अपार धैर्याने लढलेल्या जवानांचे स्मरण म्हणजे खरी राष्ट्रभक्ती, असे त्यांनी सांगितले. त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या युद्धनीतीचा संदर्भ देत कारगिल युद्धाच्या गनिमी काव्याशी साधर्म्य अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी नायक सुभेदार एस. एस. हरणे यांनी विद्यार्थ्यांना देशभक्तीचा व्यापक अर्थ सांगत, प्रत्येक क्षेत्रात प्रामाणिक कार्य करणं हेच खरे देशसेवेचे उदाहरण, असे स्पष्ट केले. शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पांजली अर्पण करून समारंभाची सुरुवात झाली. यावेळी धुळे, भावे व हरणे यांचा शाल-श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन गौरव करण्यात आला. कारगिल हुतात्म्यांना दोन मिनिटे स्तब्ध राहून श्रद्धांजली वाहण्यात आली. गौतम वाहूरवाघ यांनी सुरेख संचालन व आभार प्रदर्शन केले.

# पर्यावरण संवर्धनासाठी वृक्ष लागवड उपक्रम

अजिंक्य भारत| प्रतिनिधी

**अमरावती, दि. २७ जुलै :** ज्ञानेश्वरी नगर, शेगाव ते रहाटगाव रोड या परिसरात आज सकाळी ९ ते ११ दरम्यान पर्यावरण संवर्धन अभियान २०२५ अंतर्गत रस्त्याच्या दुतर्फा विविध प्रजातींच्या ३० वृक्षांची यशस्वी लागवड करण्यात आली. हा उपक्रम राजेंद्र ईसाने सर व सौ. ईसाने यांच्या पुढाकाराने संपन्न झाला. या कार्यक्रमाला शहरातील पर्यावरणप्रेमींसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजक प्रा. डॉ. शांताराम चव्हाण यांनी अभियानाची भूमिका विशद केली, तर डॉ. प्रकाश मानेकर यांनी वृक्ष लागवडीचे हवामान बदल, प्रदूषण नियंत्रण आणि पर्यावरण रक्षणासाठीचे महत्व विशद केले.




रश्मी ताई नावंदर यांनी ‘सीड बॉल’ संकल्पनेची माहिती देत पर्यावरणासाठी त्याचे फायदे स्पष्ट केले. दैनिक अजिंक्य भारतचे जिल्हा संपादक संजयभाऊ देशमुख यांनी अभियानास शुभेच्छा देत पुढील सहकार्याचे आश्वासन दिले. सुत्रसंचालन विजय डवरे यांनी केले.

कार्यक्रमात राजेंद्र इसाने, धर्मेंद्र भांडारकर, प्रा. संतोष शुक्ला, कुमुदिनी वाडेकर, सविता ठाकरे, विजय ठाकरे, कृष्णा शुक्ला, किशोर देशमुख, विठ्ठलराव हिवसे, लता माळवे, सुरेशदादा चोपकर, विजया निस्ताने, , हरिषदादा चरपे, अशोकराव कटाळे, माधव गिरी, प्रा. डॉ. भारत कल्याणकर, सुरज पवार, जितेंद्र ठाकरे, प्रकाशभाऊ कळसकर, सौ. कळसकर, भुषण दलाल, संतोष ठाकूर, अनिल निंभोरकर, विवेक वाडेकर, संजय गहूकर यांच्यासह इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. वृक्ष लागवडीसह पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत या उपक्रमाने सामाजिक सहभागाची एक सकारात्मक प्रेरणा दिली आहे.

### जुगार खेळणाऱ्या ११ जणांवर कारवाई

**बडनेरा :** गोपनीय माहितीच्या आधारे बडनेरा पोलिसांनी छत्री चौक, नवी वस्ती येथे सुरू असलेल्या जुगारावर धाड टाकली. कारवाईदरम्यान पोलिसांनी एकूण १ लाख २८ हजार ६५० रुपयांचे साहित्य जप्त करीत ११ जणांवर महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला. कार्तिक रमेश पाताळवंशी (२५), अश्विन सुरेश सोळंकी (२८), तुषार विष्णुपंत पांडे (४९), नवीन राजू यादव (३१), अक्षय गणेश कुरळकर (२६), शेख फईम शेख कलीम (३५), रितेश राजेंद्र बोबडे (२५), चेतन डिगांबर गायगोले (३८), सौरभ पंजबाराव निशानदार (४२) व अन्य दोघे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.

# निंभोरा परिसरात घाणीचे साम्राज्य

## नागरिक अस्वच्छतेच्या विळख्यात / अकार्यक्षम आरोग्य अधिकारी आणि मनमानी ठेकेदारांमुळे नागरिक त्रस्त

अजिंक्य भारत |साहेबराव राऊत

**अंजनगाव बारी, दि. २७ :** निंभोरा परिसरातील (ज्योती कॉलनी, हिरा कॉलनी, त्रिमूर्ती नगर, पाताळगंगा, स्वागतम कॉलनी, अंकुर नगर, जनता कॉलनी, नवदुर्गा विहार, न्यू विजयनगर, स्वामी समर्थ टाउनशिप, साई प्रेम नगर, नारायण नगर, निर्मला सिटी, विजयपथ नगर आणि निंभोरा गाव) या प्रभाग क्रमांक २१ मध्ये येतो. मागील तीन वर्षांपासून नगरसेवक नसल्यामुळे संपूर्ण परिसराकडे दुर्लक्ष होत असून नागरिकांना मूलभूत सुविधा देखील मिळत नसून., या भागातील नाल्यांची



साफसफाई होत नाही, नाले तुडुंब भरलेले आहेत व त्यांच्या दोन्ही बाजूंना गवत वाढलेले आहे. त्यामुळे डास व इतर



कीटकांचा उपद्रव मोठ्या प्रमाणात वाढला आहे. यामुळे डेंग्यू, मलेरिया यांसारख्या साथीचे आजार फैलावण्याचा धोका निर्माण झाला आहे.

यासंदर्भात नागरिकांकडून वारंवार तक्रारी करूनही आरोग्य विभाग व संबंधित अधिकारी कोणतीही ठोस कारवाई करत नाहीत. क्वचित प्रसंगी फवारणी होते, पण तीदेखील केवळ फोटो सेशनसाठीच केली जाते, असा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे. महानगर पालिका आयुक्त सौम्या शर्मा कार्यरत असून अनेक ठिकाणी चांगले काम सुरु आहे, मात्र त्यांचेच काही सहकारी आरोग्यअधिकारी आणि ठेकेदार पूर्णपणे अकार्यक्षम असल्याचे चित्र या परिसरात दिसून येत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

अशा निष्क्रिय अधिकारी व मनमानी करणाऱ्या ठेकेदार विरोधात त्वरित कारवाई करणे अत्यावश्यक आहे. अन्यथा नागरिकांकडून महापालिका कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा नागरिकांकडून देण्यात आला आहे.

संबंधित प्रशासनाला वारंवार सुचना देऊन प्रभागातील समस्येकडे दुर्लक्ष केले असुन जोपर्यंत नाली सफ़ाई व फ़वारणी नियमित होत नाही तोपर्यंत घरटैक्स न भरण्याचे आवाहन सामाजिक कार्यकर्ता घनश्याम डकरे यांनी केले आहे.

## थोडक्यात



### प्रतिभा फाउंडेशनतर्फे धनज येथील शाळेत मार्गदर्शन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ :** उमरखेड तालुक्यातील धनज येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळेत प्रतिभा फाउंडेशनच्या वतीने विद्यार्थ्यांना शैक्षणिक, कायदेशीर आणि पर्यावरणविषयक मार्गदर्शन करण्यात आले. फाउंडेशनच्या संस्थापिका इंजिनिअर प्रतिभा पवार यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत त्यांच्यात जागरूकता निर्माण केली. यावेळी वृक्षारोपणही करण्यात आले. येथील मॉडेल स्कूलच्या बांधकाम पाहणीसाठी आल्या असता, इंजिनिअर प्रतिभा पवार यांनी शाळेतील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी शिक्षणाचे आणि पर्यावरणाचे महत्त्व, गुरुजनांचा आदर आणि अभ्यास कसा करावा, यावर विद्यार्थ्यांना मोलाचा सल्ला दिला. शाळेचे मुख्याध्यापक जोशी आणि सर्व शिक्षकांनी पवार यांचे स्वागत केले.



### घाटंजी येथे 'राजस्व समाधान शिबिर' यशस्वी

**घाटंजी :** नागरिकांच्या समस्या एकाच ठिकाणी आणि तातडीने सोडवण्यासाठी घाटंजी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज राजस्व समाधान शिबिर' नुकतेच उत्साहात पार पडले. आमदार प्रा. राजू तोडसाम यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या शिबिरात अनेक तक्रारी जागेवरच निकाली काढण्यात आल्या. येथील संत मारोती महाराज सांस्कृतिक भवनात झालेल्या या शिबिराचे उद्घाटन आमदार तोडसाम यांच्या हस्ते झाले. 'प्रत्येक तक्रारीचे तातडीने निवारण व्हायलाच हवे,' असा सज्जड इशारा त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना दिला. शासकीय योजनांची माहिती देणारे फलक कार्यालयांबाहेर लावावेत, जेणेकरून नागरिकांचे हेलपाटे वाचतील, असेही ते म्हणाले. शिबिरात तहसीलदार विजय साळवे, मुख्याधिकारी राजू घोडके, पोलीस निरीक्षक केशव ठाकरे, गटविकास अधिकारी गजानन पिल्लेवाड, वनपरिक्षेत्र अधिकारी चेतन नेहारे व गजानन राठोड आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. साईनाथ भोसीकर आदी प्रमुख अधिकारी उपस्थित होते. महसूल, वन, आरोग्य, ग्रामविकास अशा विविध विभागांनी नागरिकांच्या समस्या ऐकून घेत त्यावर तात्काळ कार्यवाही केली. या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रुपेश कावलकर यांनी केले.



### कृषिमंत्री कोकाटेंच्या राजीनाम्यासाठी राष्ट्रवादीचा राळेगावात एल्गार

**राळेगाव :** शेतकऱ्यांविषयी अपमानास्पद वक्तव्ये केल्याच्या आरोपावरून कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने राळेगावात आक्रमक पवित्रा घेतला. पक्षाने उपविभागीय अधिकाऱ्यांमार्फत शासनाला निवेदन देत तीव्र आंदोलनाचा इशारा दिला आहे. कोकाटे यांनी शेतकऱ्यांना 'भिकारी' संबोधले, तसेच ते विमा न भरता लग्नांवर खर्च करतात, असे अपमानकारक विधान केल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. विधानसभेत 'रमी' खेळल्याने त्यांच्यावर टीकेची झोड उठली आहे. 'शेतकऱ्यांच्या भावनांची जाण नसलेल्या मंत्र्याला पदावर राहण्याचा अधिकार नाही,' असे पक्षाने म्हटले. राजीनामा न घेतल्यास रस्त्यावर उतरून आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही देण्यात आला. यावेळी 'कोकाटेंचा राजीनामा झालाच पाहिजे' अशा घोषणा देण्यात आल्या. निवेदन देताना पक्षाचे तालुकाध्यक्ष दिलीप कन्नाके, महिला तालुकाध्यक्ष वंदना काकडे, शहराध्यक्ष प्रकाश खुडसंगे, गौतम तागडे, प्रवीण काकडे, सूर्यभान लांजेवार, संजय भोरे, दिगंबर वडुळकर, सुभाष कोहले, नारायणराव धानोरकर, पुरुषोत्तम बेंबारे, नागोराव कुमरे, गजानन धोटे, किशोर चांदेकर यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

### जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये 'इन्व्हेस्टिचर' समारंभ संपन्न

**यवतमाळ :** येथील जाजू इंटरनॅशनल स्कूलमध्ये नव्याने निवडलेल्या विद्यार्थी परिषदेचा भव्य शपथविधी आणि पदग्रहण समारंभ (इन्व्हेस्टिचर) उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत नवनिर्वाचित सदस्यांना सॅश व बॅचेस प्रदान करून पदभार देण्यात आला. विद्यार्थ्यांनी यावेळी शपथ घेतली. या कार्यक्रमापूर्वी शाळेत इलेक्ट्रॉनिक मतदान पद्धतीने निवडणूक घेण्यात आली होती. या निवडणुकीत वीर बेलोर्कर याची हेड बॉय, तर गुंजन अग्रवाल हिची हेड गर्ल म्हणून निवड झाली. डेप्युटी हेड बॉय म्हणून वेद तेलेवार आणि डेप्युटी हेड गर्ल म्हणून लब्धी कोठारी यांनी शपथ घेतली. या समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक दीपमाला भेंडे, शुभांगी गुल्हाणे, माधुरी उमबरकर, सहायक पोलीस निरीक्षक संतोष मनवर, अभयकुमार गुप्ता आणि ज्येष्ठ अधिवक्ता राजेश कोडापे उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश जाजू, सचिव आशिष जाजू आणि डायरेक्टर-प्रिन्सिपल शिल्पा जाजू यांच्यासह व्यवस्थापनाचे सदस्यही उपस्थित होते. मान्यवरांनी विद्यार्थ्यांना उत्तम नागरिक बनून देशाचे नेतृत्व करण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांनी यावेळी गीत-नृत्य सादर केले. यशस्वीतेसाठी शिक्षक व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# राजकीय वादातून कुटुंब संपविण्याचा कट

## विजेचा धक्का देऊन महिलेची हत्या; दाराला जोडला होता करंट, दोन आरोपी अटकेत

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**घाटंजी, दि. २७: ग्रामपंचायत निवडणुकीच्या वादातून संपूर्ण कुटुंबाला संपवण्याचा कट रचून, घराच्या दरवाजाला करंट लावून महिलेची हत्या केल्याची धक्कादायक घटना आर्णी तालुक्यातील अंजी (नाईक) येथे घडली आहे. याप्रकरणी पतीच्या तक्रारीवरून घाटंजी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पळून जाण्याच्या तयारीत असलेल्या दोघांना अटक करण्यात आली आहे.**



मिळालेल्या माहितीनुसार, मनेश देवराव पवार (वय ४४, रा. अंजी नाईक) यांचा गावातील सहा संशयित आरोपींसोबत ग्रामपंचायत निवडणुकीवरून अनेक वर्षांपासून वाद सुरू होता. या पूर्ववैमनस्यातून यापूर्वीही त्यांच्यात भांडणे झाली असून, त्याबाबत पोलिस ठाण्यात गुन्हे देखील नोंद आहेत. याच वादातून आरोपींनी पवार कुटुंब संपवण्याचा कट रचला. पती मनेश पवार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, २५ जुलैच्या रात्री आरोपींनी त्यांच्या घराच्या दरवाजाला बाहेरून विजेची तार जोडून ठेवली होती. त्यांचा उद्देश मनेश पवार किंवा त्यांच्या कुटुंबातील कोणालातरी जीवे मारण्याचा होता. या घटनेत, त्यांची पत्नी सविता मनेश पवार (वय ३७) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. याप्रकरणी घाटंजी पोलिस ठाण्याचे ठाणेदार केशव ठाकरे यांनी तातडीने कारवाई करत दोन आरोपींना अटक केली असून, त्यांना न्यायालयात हजर करण्यात आले आहे. या घटनेमुळे ग्रामपंचायत निवडणुकांमधील वाद किती टोकाला जाऊ शकतात, हे पुन्हा एकदा समोर आले असून, गावात तणावाचे वातावरण आहे.

### या सहा जणांवर खुनाचा गुन्हा

याप्रकरणी पोलिसांनी इंदल मोतीराम राठोड, सुदाम जयराम चव्हाण, गणेश केशव राठोड, विनोद रामकृष्ण चव्हाण, राजू कवडू जाधव आणि चेतन निवृत्ती चव्हाण या सहा जणांविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. यापैकी, पळून जाण्याच्या तयारीत असलेले राजू कवडू जाधव आणि इंदल मोतीराम राठोड यांना घाटंजी पोलिसांनी अटक केली आहे. उर्वरित चार फरार आरोपींना शोध घेण्यासाठी पोलिस पथके रवाना झाली आहेत.

### पहाटेच्या सुमारास घडला थरार

२५ जुलैच्या रात्री जेवण करून पवार कुटुंब झोपी गेले होते. पहाटे अडीच वाजता, सविता पवार या लघुशंकेसाठी बाहेर जाण्याकरिता उठल्या. त्यांनी घराचा दरवाजा उघडताच, त्यांना विजेचा तीव्र धक्का बसला आणि त्या खाली कोसळल्या. यावेळी पती मनेश पवार यांनाही विजेचा धक्का बसला. त्यांनी आरडाओरड केल्यानंतर शेजारी धावून आले. मात्र, त्यांना आर्णी येथील रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी सविता यांना मृत घोषित केले.

# खातेरा ते अडेगाव रस्ता मृत्यूचा सापळा

## दोन फुटी खड्ड्यांमुळे अपघाताला निमंत्रण, बांधकाम विभागाच्या दुर्लक्षाचा फटका

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**झरीजामणी, दि. २७ :** तालुक्यातील खातेरा ते अडेगाव मार्गाची पावसाळ्यामुळे अक्षरशः चाळण झाली असून, हा रस्ता मृत्यूचा सापळा बनला आहे. रस्त्यावर पडलेल्या दोन-दोन फुटी खड्ड्यांमुळे अपघाताचा धोका वाढला असून, बांधकाम विभागाने याकडे तात्काळ लक्ष द्यावे, अन्यथा तीव्र आंदोलन करण्याचा इशारा गावकऱ्यांनी दिला आहे.



खातेरा गावाजवळ पैनगंगा नदीवर नुकताच मोठा पूल झाल्याने या मार्गावरील वाहतूक प्रचंड वाढली आहे. हा मार्ग आता चंद्रपूर, आंध्र प्रदेशसह अनेक जिल्ह्यांना जोडत असल्याने दररोज शेकडो वाहने येथून ये-जा करतात. मात्र, रस्त्याची अवस्था इतकी दयनीय झाली आहे की, वाहनधारकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. खातेरा गावातील अनेक शाळकरी विद्यार्थी शिक्षणासाठी मुकुटबण येथे ऑटो आणि बसने प्रवास करतात. या खड्ड्यांमुळे एखादा ऑटो उलटून मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. विशेष म्हणजे, या रस्त्याची मुदत ३१ मार्च २०२६ पर्यंत आहे. सहा वर्षांची मुदत असताना चार वर्षांतच रस्त्याची अशी दुरवस्था कशी झाली, असा प्रश्न उपस्थित करत कामाच्या गुणवत्तेवर शंका व्यक्त केली जात आहे. संबंधित ठेकेदाराने रस्त्याची तात्काळ डागडुजी करून तो वाहतुकीसाठी सुरक्षित करावा, अशी मागणी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक सचिन टाले यांनी केली आहे. प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केल्यास गावकऱ्यांच्या वतीने आंदोलन केले जाईल, असेही सांगण्यात आले.

# भाजपच्या सरचिटणीसपदी अजाब चिंचोरकर यांची निवड

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**नेर (परसोपंत), दि. २७ :** भारतीय जनता पार्टीच्या नेर शहर शाखेच्या सरचिटणीसपदी सामाजिक कार्यकर्ते अजाब शंकरराव चिंचोरकर यांची नुकतीच निवड करण्यात आली आहे. त्यांच्या संघटनात्मक कार्याची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर ही महत्वाची जबाबदारी सोपवली आहे. शहराध्यक्ष आशिष खोडे यांनी ही घोषणा केली.



अजाब चिंचोरकर हे विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय उपक्रमांमध्ये नेहमीच सक्रिय असतात. त्यांनी विशेषतः सौंदर्य व्यवसायाशी संबंधित समाजासाठी अनेक महत्वपूर्ण उपक्रम राबवले आहेत. त्यांची प्रामाणिक धडपड आणि लोकसेवेतील आस्था लक्षात घेऊन पक्षाने त्यांची या पदावर निवड केली. आपल्या निवडीनंतर बोलताना, 'पक्षाच्या विचारसरणीवर श्रद्धा ठेवून मी समाज आणि कार्यकर्त्यांसाठी सदैव सक्रिय राहीन व दिलेली जबाबदारी कर्तव्यनिष्ठेने पार पाडेन, असे चिंचोरकर यांनी सांगितले. त्यांनी आपल्या निवडीचे श्रेय राज्य परिषद सदस्य सुनील धोटकर, शिक्षण आघाडी अध्यक्ष कानतोडे, माजी शहराध्यक्ष राजू देऊळकर, माजी तालुकाध्यक्ष योगेश दहेकर, तालुकाध्यक्ष निलेश राठोड आणि शहराध्यक्ष आशिष खोडे या वरिष्ठ नेत्यांच्या मार्गदर्शनाला दिले. त्यांच्या निवडीचे सर्व स्तरांतून स्वागत होत आहे.

# अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ :** साहित्य सम्राट लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५व्या जयंतीनिमित्त, यवतमाळात भव्य सामान्य ज्ञान स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा दोन गटांत होणार असून, विजेत्यांना हजारो रुपयांची रोख बक्षिसे दिली जाणार आहेत. स्पर्धा सर्वांसाठी निःशुल्क खुली आहे.

अण्णाभाऊ साठे स्मारक समिती, यवतमाळच्या वतीने आयोजित ही स्पर्धा रविवार, ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १० वाजता बाबाजी दाते कला व वाणिज्य महाविद्यालयात होईल. ५ वी ते ७ वी आणि ८ वी ते १२ वी अशा दोन गटांत ही परीक्षा घेतली जाईल. ५० बहुपर्यायी प्रश्नांची ही परीक्षा अण्णाभाऊ साठे यांचे जीवनकार्य आणि चालू घडामोडी यावर आधारित असेल. वरिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला १० हजार, तर कनिष्ठ गटातील प्रथम विजेत्याला ५ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाईल. यासह इतरही अनेक बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ १० ऑगस्ट रोजी नंदुरकर विद्यालयात होणार आहे. ही स्पर्धा विद्यार्थ्यांसाठी एक मोठी संधी असून, यात सहभागी होण्यासाठी मनोज रणखांब, ॲड. सुरज पाखरे, संजय कांबळे, गणेश भांडवले आणि पंडित वानखडे यांच्याशी संपर्क साधून नावनोंदणी करण्याचे आवाहन समितीने केले आहे.

### वीजबिलाचे पैसे कर्मचाऱ्याच्या खिशात

**मंगरुळ, दि. २७ :** येथील एका ग्राहकाने वीजबिल भरण्यासाठी दिलेले पैसे कर्मचाऱ्याने स्वतःच्या खिशात ठेवल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे मंगरूळ येथील रहिवासी सुरेश पांडे यांनी त्यांचा वीजबिल भरणा करण्यासाठी १०२० रुपये मांगलादेवी केंद्रातील कनिष्ठ तंत्रज्ञ अनिल राठोड यांच्याकडे दिले होते. मात्र, पैसे भरले न गेल्याने ती रक्कम पुढील बिलात लागून आली. पांडे यांनी वरिष्ठ अभियंता अगम यांच्याकडे तक्रार केली असता, त्यांच्यासमोरच राठोड याने 'तुमच्याकडून जे होते ते करा,' अशी धमकी दिली. राठोड अनेक ग्राहकांचे पैसे परस्पर खर्च करून पगार झाल्यावर भरतो, असे लेखी पत्रही त्याने कार्यालयाला दिल्याचे समोर आले आहे. तो अनेकदा कार्यालयात दारूच्या नशेत असतो आणि ग्राहकांशी उद्धटपणे बोलतो, असाही आरोप पांडे यांनी केला आहे.

# शिवसेना निवडणुका पूर्ण ताकदीने लढवेल

## राजुदास जाधव : महायुतीचा निर्णय शिरोधार्य मानू

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**आर्णी, दि. २७ :** आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका शिवसेना पूर्ण ताकदीने लढवेल, मात्र महायुतीचा निर्णय झाल्यास तो मान्य असेल, अशी भूमिका नवनियुक्त शिवसेना जिल्हाप्रमुख राजुदास जाधव यांनी आज पत्रकार परिषदेत मांडली. पक्ष संघटना मजबूत करणे हे आपले मुख्य लक्ष असल्याचेही त्यांनी सांगितले.





मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात आणि पालकमंत्री संजय राठोड यांच्या मार्गदर्शनात आपली निवड झाल्याचे सांगत, राजुदास जाधव यांनी आपल्या कार्याची दिशा स्पष्ट केली. जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद आणि सहकार क्षेत्रातील सर्व निवडणुका लढण्याची शिवसेनेची तयारी असल्याचे ते म्हणाले. त्यांनी एकनाथ शिंदे सरकारच्या 'माझी लाडकी बहीण' आणि 'एक रुपयात पीक विमा' यांसारख्या लोकप्रिय योजनांचा उल्लेख केला. पालकमंत्री संजय राठोड यांच्या आरोग्य व शिक्षण क्षेत्रातील कार्याचेही त्यांनी कौतुक केले. या पत्रकार परिषदेला उपजिल्हा प्रमुख विष्णू उकंडे, तालुकाप्रमुख राजेंद्र जाधव, जीवन जाधव, शाम ठाकरे, निलेश गावंडे, रवि राठोड, प्रमोद कुदळे, अनुप जाधव, अश्विन जाधव, अंबादास शिंदे, गौरव बोरकर, उत्तम राठोड, अश्विनी देशमुख, संध्या मुनेश्वर आदी उपस्थित होते.

# महावितरणची थकबाकी पोहोचली १५६ कोटींवर

## वसुलीसाठी अधीक्षक अभियंतेही फिल्डवर, महावितरणचा थकबाकीदारांना निर्वाणीचा इशारा

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २७ : महावितरणच्या अमरावती परिमंडळातील वीज बिलांची थकबाकी १५६ कोटी रुपयांवर पोहोचल्याने प्रशासनाची झोप उडाली आहे. मार्चअखेर ७५ कोटी असलेली थकबाकी चार महिन्यांत दुप्पट झाली आहे. या गंभीर परिस्थितीमुळे, आता अधीक्षक अभियंत्यांपासून जनमित्रांपर्यंत सर्वांना वसुलीचे उद्दिष्ट देत, थकबाकीदारांचा वीजपुरवठा खंडित करण्याचा निर्वाणीचा इशारा देण्यात आला आहे.**



महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसुलावरच अवलंबून आहे, परंतु मार्च २०२५ नंतर प्रत्येक महिन्यात वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण न झाल्याने थकबाकीचा डोंगर वाढतच चालला आहे, अशी माहिती अमरावती परिमंडळाच्या मुख्य अभियंत्यांनी दिली. ही बाब महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी अत्यंत गंभीर असून, वीजबिल वसुलीशिवाय अन्य पर्याय नाही. त्यामुळे, ग्राहकांच्या बिल भरण्याबाबतच्या उदासीनतेमुळे, नाईलाजास्तव वीजपुरवठा खंडित करण्याची कारवाई तीव्र करण्यात आली आहे. वसुलीसाठी आता वरिष्ठ अधिकारीही फिल्डवर उतरले आहेत. परिमंडळात १ लाख रुपयांपेक्षा जास्त थकबाकी असलेल्या ग्राहकांची संख्या ११५७ असून, त्यांच्याकडे ३२ कोटी ६७ लाख रुपये थकीत आहेत. यात अमरावती जिल्ह्यातील ४७२ ग्राहकांकडे १४.१७ कोटी, तर यवतमाळ जिल्ह्यातील ६५५ ग्राहकांकडे १८.५५ कोटी रुपये थकीत आहेत. आगामी सणासुदीचे दिवस लक्षात घेता, ग्राहकांनी कटू कारवाई टाळण्यासाठी वेळेत बिल भरून सहकार्य करावे, असे आवाहन महावितरणने केले आहे.

### थकबाकीत यवतमाळ आघाडीवर

परिमंडळातील एकूण १५६ कोटी रुपयांच्या थकबाकीपैकी यवतमाळ जिल्ह्यातील १ लाख ९० हजार ४७० ग्राहकांकडे सर्वाधिक ८८ कोटी ८१ लाख रुपये थकले आहेत. तर, अमरावती जिल्ह्यातील १ लाख ९० हजार ९३६ ग्राहकांकडे ६७ कोटी ३९ लाख रुपयांची थकबाकी आहे. दोन्ही जिल्ह्यांतील एकूण ३ लाख ८१ हजार ४०६ ग्राहक थकबाकीदार आहेत.

### पदनिहाय वसुलीचे उद्दिष्ट

वसुलीसाठी आता पदनिहाय जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. १ लाखावरील थकबाकीदारांची तपासणी अधीक्षक अभियंता, तर ५० हजार ते १ लाखांपर्यंतची वसुली कार्यकारी अभियंता करणार आहेत. उपकार्यकारी अभियंता (२५-५० हजार), शाखा अभियंता (५-२५ हजार) आणि जनमित्र (५ हजारांपर्यंत) यांनाही त्यांच्या स्तरावरील थकबाकी वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.




**यवतमाळ :** येथील श्री. समर्थ प्राईड अ‍ॅण्ड लॉन येथे रविवारी पार पडलेल्या चिंतन बैठकीस उपस्थित जिल्ह्यातील दुस-या फळीतील काँग्रेस पदाधिकारी व दुस-या छायाचित्रात उपस्थित कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना देवानंद पवार व उपस्थित मान्यवर.

# दुसऱ्या फळीतील नेत्यांचा ज्येष्ठांविरोधात एल्गार!

## यवतमाळात प्रथमच काँग्रेसची चिंतन बैठक, स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत ज्येष्ठांची लुडबूड नको

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि.२७:** यवतमाळ जिल्हा काँग्रेसमधील अंतर्गत खदखद आज चव्हाट्यावर आली असून, दुसऱ्या फळीतील अनेक नेत्यांनी पक्षातील ज्येष्ठांविरोधात एल्गार पुकारला आहे. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास हे ज्येष्ठांविरोधात एकप्रकारचे 'बंड' म्हटले तरी वावगे ठरणार नाही. ज्येष्ठ नेत्यांच्या पुत्रप्रेमामुळे आणि स्वार्थीपणामुळे पक्ष रसातळाला जात असल्याचा आरोप करीत, सुमारे २५० कार्यकर्त्यांनी चिंतन बैठकीत काँग्रेस पक्षाला 'संजीवनी' देण्याचा निर्धार केला आहे.

जिल्हा काँग्रेसमध्ये प्रथमच अशा प्रकारचा उघड बेबनाव रविवारी (दि. २७) दिसून आला. येथील आर्णी रोडवरील समर्थ प्राइड अँड लॉन येथे, दुसऱ्या फळीतील सुमारे अडीचशे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी एकत्र येत चिंतन बैठक घेतली. नरेंद्र ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत, पक्षातील ज्येष्ठ नेत्यांच्या कार्यपद्धतीवर जोरदार टीका करण्यात आली. देवानंद पवार यांनी ज्येष्ठांच्या चुकांचा पाढा वाचताना म्हटले की, हे नेते स्वतःच्या निवडणुका कार्यकर्त्यांच्या जिवावर लढतात आणि कार्यकर्त्यांच्या निवडणुकीच्या वेळी बेइमानी करतात. आता हे चालणार नाही, असा इशारा यावेळी देण्यात आला. या बैठकीला बैठकीला देवानंद पवार, प्रवीण देशमुख, मनीष पाटील, नरेंद्र ठाकरे (वणी), अरुण राऊत, अरविंद वाढोणकर, कृष्णा कडू, प्रकाश कासावार, प्रकाश मानकर, विजय चालबर्डीकर, शिवाजीराव सवनेकर, सुनील भेले, शैलेश इंगोले, सुदाम पवार, राजू बुटले, अतुल राऊत, साहेबराव खडसे, अरुण राऊत, धर्मेंद्र दुधे, पुष्पा नागपुरे, ताराबाई गवार्ले, संजीवनी कासार, उषा दिवटे, अनिल गायकवाड, राकेश खुराणा, ओम ठाकूर, राजा पाथ्रडकर, गौरी शंकर खुराणा, राजू तेलंगे, महादेवराव काळे, दत्ता चांदोरे, चंद्रशेखर चांदोरे, अशोक पाटील वानखेडे, चंदू चौधरी, लोकेश इंगोले, दिगांबर बुटले, राजू विरखेडे, गणेश मोरे, संजय खाडे, विजय पाटील, राजू गावंडे, रमेश राऊत, विजय घाटे, सलीम पटेल, मनमोहनसिंग चव्हाण, शैलेश इंगोले, शालीक चवरडोल, सय्यद रफिक बाबू आदींच्या या बैठकीला उपस्थिती होती.

### 'घरचा आहेर'! ज्येष्ठांवर हे आहेत आरोप

**ज्येष्ठ नेत्यांनी पुत्रप्रेमापोटी सक्षम असूनही दुसऱ्या फळीतील नेतृत्वाला संधी दिली नाही. स्वतः वारंवार पराभूत होऊनही त्यांनी नेतृत्व सोडले नाही. उलट, आपल्या पराभवाचे खापर कार्यकर्त्यांवर फोडून त्यांनाच 'गद्दार' ठरविले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत ते दुसऱ्या फळीतील कार्यकर्त्यांना मदत करीत नाहीत, असा घणाघाती आरोप चिंतन बैठकीत करण्यात आला. पक्षात हुजरेगिरी करणाऱ्यांनाच पदे दिली जातात, असाही आरोप त्यांच्यावर आहे.**

### या ज्येष्ठ नेत्यांना कार्यकर्त्यांचा विरोध

**दुसऱ्या फळीतील नेत्यांच्या निशाण्यावर प्रामुख्याने काँग्रेसचे माजी प्रदेशाध्यक्ष माणिकराव ठाकरे, माजी मंत्री शिवाजीराव मोघे, माजी मंत्री प्रा. वसंतराव पुरके, माजी आमदार वामनराव कासावार आणि विद्यमान आमदार बाळासाहेब मांगुळकर हे जिल्ह्यातील पहिल्या फळीतील नेते म्हणून ओळखले जातात. याच नेत्यांमुळे पक्षाची जिल्ह्यात वाताहत झाली असून, आता त्यांचे नेतृत्व मान्य नसल्याचे या बैठकीत स्पष्ट सांगण्यात आले.**

## थोडक्यात

### अपघातात एकाचा मृत्यू

**लाडखेड :** येथे भरधाव दुचाकी घसरल्याने झालेल्या अपघातात चालकाचा मृत्यू झाला. अशोक मोतीराम काकडे (वय ५०) असे मृत चालकाचे नाव आहे. ११ जुलै रोजी चाणी-बोरी अरब मार्गावर हा अपघात घडला. सागर किशनराव काकडे यांच्या तक्रारीवरून, पोलिसांनी मृत अशोक काकडे यांच्याविरुद्ध निष्काळजीपणे वाहन चालवल्याचा गुन्हा नोंदवला आहे.

### महिलेवर अपहाराचा गुन्हा

**दिग्रस :** वापरण्यासाठी दिलेला दीड तोळ्याचा सोन्याचा नेकलेस परत न देता अपहार केल्याप्रकरणी महिलेवर गुन्हा दाखल झाला आहे. तहीना नाज सैयद अलतमश यांनी सोफीया मोबीन शहा यांना १.१० लाखांचा नेकलेस दिला होता. तो परत न देता 'तुझ्याकडून जे होते ते कर' अशी धमकी दिली. याप्रकरणी पोलिसांनी सोफीया शहाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

### स्टीलच्या ग्लासने हल्ला

**महागाव :** येथे दारू पिण्याच्या कारणावरून झालेल्या वादातून एका युवकाला मारहाण करण्यात आली. ही घटना २४ जुलै रोजी घडली. रोहन राजु हनवते यांच्या तक्रारीवरून, गौरव दिगांबर कदम व दिलीप दिगांबर भामरकर यांच्यावर गुन्हा दाखल झाला. आरोपींनी संगनमत करून हनवते यांना स्टीलच्या ग्लासने डोक्यावर, कपाळावर मारून जखमी केले व शिवीगाळ केली.

### भरधाव स्कॉर्पिओची दुचाकीला धडक

**पांढरकवडा :** पत्नी व मुलीसह दुचाकीने जात असताना भरधाव स्कॉर्पिओने धडक दिल्याने पती-पत्नी जखमी झाले. ही घटना २५ जुलै रोजी घडली. दिनेश रंगराव कुमरे यांच्या तक्रारीनुसार, ते कोंघारा येथे जात होते. पांढऱ्या रंगाच्या अज्ञात स्कॉर्पिओ चालकाने त्यांच्या दुचाकीला धडक दिली. पोलिसांनी अज्ञात चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

CAPTION 'मॉन्सून मॅरेथॉन'चा उत्साह...




**यवतमाळ :** दिवंगत डॉ. महेश पटेल यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी आयोजित मॉन्सून मॅरेथॉन या स्पर्धेत नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. आयपीएलपटू अक्षय कर्णेवार आणि रणजी कर्णधार अक्षय वाडकर यांच्या प्रमुख उपस्थितीने धावपटूंचा जोश वाढवला. निरोगी जीवनाचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाने पावसाळी सकाळ अविस्मरणीय केली.

# रेती तस्करीचा टिप्पर पकडला

## २५ लाखांचा मुद्देमाल जप्त, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**वणी, दि. २७ :** वणी पोलिसांनी शहरात रेतीच्या अवैध वाहतुकीवर मोठी कारवाई करत सुमारे २५ लाख ४२ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रात्रीच्या गस्तीदरम्यान विनापरवाना सात ब्रास रेतीची वाहतूक करणारा टिप्पर पकडण्यात आला असून, चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

उपविभागीय पोलिस अधिकारी किंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि पोलिस निरीक्षक उंबरकर यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली. पोलिस कर्मचारी श्याम राठोड हे २५ जुलै रोजी रात्री ११:३० वाजताच्या सुमारास रविनगर परिसरात गस्त घालत होते. यावेळी त्यांना टाटा टिप्पर (क्र. एमएच ३४ बीजी १५९६) संशयास्पदरीत्या जाताना दिसला. त्यांनी वाहन थांबवून पाहणी केली असता, त्यात अंदाजे ४२ हजार रुपये किमतीची सात ब्रास रेती आढळून आली. चालक मुशीर खान रशीद खान पठाण (वय २९) याच्याकडे रेती वाहतुकीचा कोणताही परवाना नव्हता. पोलिसांनी २५ लाखांचा टिप्पर आणि रेती असा एकूण २५ लाख ४२ हजारांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी पोलिस शिपाई श्याम राठोड, भानुदास हेपट, नंदकुमार पुप्पुलवार, अरविंद बच्चे आणि राहुल बोंडे यांच्या पथकाने ही कामगिरी केली. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक अंकुश वडतकर करत आहेत.

# अंगावर विजेची तार कोसळल्याने बैल ठार

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**दिग्रस, दि. २७ :** येथील शेतकरी ओमप्रकाश अट्टल यांच्या शेतात विजेचा तार तुटून अंगावर पडल्याने त्यांच्या बैलाचा जागीच मृत्यू झाला. रविवारी सकाळी ११ वाजता ही दुर्दैवी घटना घडली. ऐन शेतीच्या हंगामात झालेल्या या अपघातामुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे.

ओमप्रकाश अट्टल यांनी आपला बैल शेतातील गोठ्याबाहेर बांधला होता. यावेळी अचानक उच्चदाब वाहिनीचा विद्युत तार तुटून थेट बैलाच्या अंगावर पडला, ज्यामुळे त्याचा जागीच मृत्यू झाला. या बैलाची अंदाजे किंमत ८० हजार रुपये आहे. घटनेची माहिती मिळताच दिग्रस पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. बीट जमादार कैलास देवकर, पटवारी अशोक साबळे आणि महावितरणचे अभियंता अंकित पाटील यांनी घटनास्थळाचा पंचनामा केला. शॉर्टसर्किटमुळे तार तुटला असावा, असा प्राथमिक अंदाज पाटील यांनी व्यक्त केला. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. अरुण जाधव, जुनेद आणि सलीम शेख यांनी बैलाचे शवविच्छेदन केले. ऐन हंगामात बैल दगावल्याने शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला असून, शासनाने तत्काळ मदत करावी, अशी मागणी ओमप्रकाश अट्टल यांनी केली आहे.

# रेमंड कामगारांचे जिल्हाधिकारी कार्यालयात आंदोलन

## २९ जुलैला तोडगा निघण्याची शक्यता, पालकमंत्री संजय राठोड, बच्चू कडूंच्या मध्यस्थीने होणार बैठक

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २७ :** वेतन करारासाठी सात दिवसांपासून संप पुकारलेल्या रेमंड कामगारांनी रविवारी थेट जिल्हाधिकारी कार्यालय गाठून आंदोलन केले. यानंतर, पालकमंत्री संजय राठोड यांनी मध्यस्थी करत २९ जुलै रोजी तोडगा काढण्यासाठी बैठक बोलावली आहे. त्यामुळे सात दिवसांपासूनची कोंडी आता फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

१६ महिन्यांपासून वेतन करार प्रलंबित असल्याने रेमंडमधील १,७८५ कामगार आक्रमक झाले आहेत. आतापर्यंत पाच बैठका होऊनही तोडगा न निघाल्याने, कामगारांनी रविवारी जिल्हाधिकारी विकास मीना यांच्या दालनात आंदोलन केले. यावेळी जिल्हाधिकाऱ्यांनी पाच प्रतिनिधींचे निवेदन स्वीकारून लवकर तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. यानंतर, पालकमंत्री संजय राठोड यांनी भ्रमणध्वनीवरून संघटनेच्या अध्यक्षांशी बोलून, २९ जुलैला निर्णायक बैठक बोलावल्याचे सांगितले. या आंदोलनात जनाक्रोश कामगार संघटनेचे अध्यक्ष अक्षय यादव, भारतीय विश्वकर्मा मिल मजदूर संघटनेचे विजय लंगोटे, प्रहार कामगार संघटनेचे अध्यक्ष सचिन देशमुख, तसेच माजी प्रतिनिधी राजू तांडरा, विकास जोमदे आणि रतन अंडेलवार उपस्थित होते. सहा दिवसांपूर्वी, करारास विलंब होत असल्याचा जाब विचारल्याने, मान्यताप्राप्त संघटनेने मारहाणीची तक्रार दाखल केली. यानंतर कंपनीने सहा कामगारांना निलंबित केल्याने संप चिघळला. या कामगारांचे निलंबन मागे घेणे, ही आता आंदोलकांची प्रमुख मागणी बनली आहे.

### बच्चू कडू कडाडले

**माजी मंत्री बच्चू कडू यांनी रेमंड व्यवस्थापनावर जोरदार टीका केली. कामगारांच्या प्रश्नावर तोडगा निघत नसेल, तर तसे कंपनीने लिहून द्यावे, असे आव्हान त्यांनी दिले. अन्यथा, अमरावती येथील रेमंड कामगारही यवतमाळच्या कामगारांच्या समर्थनार्थ रस्त्यावर उतरतील, असा सज्जड दम त्यांनी दिला. ते स्वतः २९ जुलै रोजी होणाऱ्या बैठकीला यवतमाळमध्ये उपस्थित राहणार आहेत अशी माहिती प्रहार जिल्हाध्यक्ष बिपिन चौधरी यांनी दिली.**

# उमरखेड-महागाव मतदारसंघातील वीजसमस्या सुटणार

## 'दोन दशकांचा अंधार'संपणार; आमदार वानखेडे, नितीन भुतडांच्या प्रयत्नांना यश

दै. अजिंक्य भारत | प्रतिनिधी

**उमरखेड, दि.२७: उमरखेड-महागाव विधानसभा मतदारसंघातील गेल्या दोन दशकांपासूनची विजेची समस्या आता सुटण्याच्या मार्गावर आहे. आमदार किसनराव वानखेडे आणि भाजप जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांच्या प्रयत्नातून, अनेक नवीन पॉवर ट्रान्सफॉर्मर आणि उपकेंद्रांना मंजुरी मिळाली आहे. यामुळेनागरिकांना अखंडित वीजपुरवठा करणे सोपे होणार आहे.**



गेल्या वीस वर्षांपासून, २००३ सालच्या ग्राहकसंख्येनुसार बनविलेल्या विद्युत केंद्रांवर अतिरिक्त भार येत आहे. त्यामुळे, उमरखेड-महागाव मतदारसंघातील नागरिक विजेच्या लपंडावाने त्रस्त होते. या समस्येची दखल घेऊन आमदार किसनराव वानखेडे आणि भाजपचे यवतमाळ-पुसद जिल्हा समन्वयक नितीन भुतडा यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे, अनेक महत्त्वपूर्ण कामांना मंजुरी मिळाली आहे. महागाव तालुक्यातील गुंज ते मुडाणा नवीन ३३ केव्ही लाइनचे काम पूर्णत्वास आले आहे, ज्यामुळे अतिभाराची समस्या सुटेल. तसेच, काळी टेंभी व पेठ येथे नवीन ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर झाले असून, लवकरच कामाला सुरुवात होणार आहे. उमरखेड शहरासाठी नवीन फीडरचे काम पूर्ण झाले आहे. यासोबतच, कुपटी (मरसूळ) आणि उमरखेड एमआयडीसीसाठी नवीन उपकेंद्रांचा पाठपुरावा सुरू आहे. कुपटी येथील सब-स्टेशनसाठी दोन एकर जमीन महावितरणला हस्तांतरितही करण्यात आली आहे. दराटी येथेही नवीन ३३ केव्ही उपकेंद्र मंजूर करण्यासाठी ऊर्जामंत्र्यांकडे मागणी करण्यात आली आहे, असे नितीन भुतडा यांनी सांगितले.



**'अल्पावधीत सामान्य नागरिकांच्या वीजेसंदर्भातील बहुतांश समस्या सोडवण्यात यश आले आहे. पुढील दोन वर्षांत शहरांसह ग्रामीण भागातील प्रत्येक खेड्यागावात अखंडित विद्युत पुरवठा मिळवून देण्याचा आमचा मानस आहे. या कामांमुळेशेतकरी आणि लघु व्यावसायिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.**

**-नितीन भुतडा,**
**जिल्हा समन्वयक, भारतीय जनता पक्ष.**

### उमरखेड तालुक्यात कामांचा धडाका

**उमरखेड शहरातील महागाव रोड उपकेंद्रात ५ एमव्हीए क्षमतेचा ट्रान्सफॉर्मर बदलून १० एमव्हीए क्षमतेचा बसविला जात आहे. तसेच तिवडी फाटा येथेही ५ एमव्हीएचा नवीन ट्रान्सफॉर्मर उभारण्याचे काम प्रगतिपथावर आहे. यासोबतच कुपटी आणि 'एमआयडीसी'मध्ये नवीन उपकेंद्रांसाठी पाठपुरावा सुरू आहे. या कामांची पाहणी नितीन भुतडा, माजी आमदार विजयराव खडसे आणि विवेक कण्णवार यांनी केली.**